CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

आसमंतसह

सोलापूर | रविवार, ९ फेब्रुवारी २०२५ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ९३ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com





सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# पासवान यांनी अयोध्या पराभवाचे उट्टे काढले

## उत्तरप्रदेशातील मिल्किपुरात भाजपाचा दणदणीत विजय

◆ **अयोध्या, ८ फेब्रुवारी**

उत्तरप्रदेशातील मिल्किपूर विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपाने दणदणीत विजय मिळवला. तिथे भाजपाचे उमेदवार चंद्रभानू पासवान यांनी खासदारपुत्र अजित प्रसाद यांचा ६० हजारांपेक्षा जास्त मतांनी पराभव करीत लोकसभा निवडणुकीतील अयोध्येचे उट्टे काढले. सपाचे प्रमुख अखिलेश यादव यांना हा पराभव जिव्हारी झोंबला आहे. अयोध्या पोलिस प्रशासनाने निवडणुकीत गोंधळ केल्याचा आरोप अखिलेश यादव यांनी केला.

मिल्किपूर पोटनिवडणुकीत भाजपाने धुरंधरांऐवजी चंद्रभानू पासवान या नवीन चेहऱ्यावर डाव लावला. समाजवादी पार्टीने येथील खासदार अवधेश प्रसाद यांचा मुलगा अजित प्रसादला उमेदवारी जाहीर केली होती. अवधेश प्रसाद यांच्या प्रमाणेच चंद्रभानू पासवान हे पासी समाजाचे आहे. पेशाने वकील असलेले चंद्रभानू पासवान अयोध्येच्या रुदौली येथून दोन वेळा जिल्हा पंचायतचे सदस्य म्हणून निवडून आले होते. सध्या त्यांची पत्नी जिल्हा पंचायत सदस्य आहे. २०२४ मध्ये लोकसभा निवडणुकीत ते अनुसूचित जाती संपर्क प्रमुख होते. त्यांचे वडील बाबा रामलखन दास ग्राम प्रधान आहेत.


गदा उंचावून विजयाचा आनंद साजरा करताना योगी आदित्यनाथ आणि विजयी उमेदवारासह अन्य नेते

मिल्किपूर मतदारसंघातून निवडणूक लढवण्यासाठी जवळपास सहा ते सात उमेदवारांनी दावा केला होता. त्या सर्वांना धक्का देत चंद्रभानू पासवान यांनी उमेदवारी मिळवली होती. मिल्किपूर मतदारसंघात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक मंत्र्यांनी जोरदार प्रचार केला होता. सपानेही संपूर्ण ताकद झोकली होती. अखिलेश यादव, डिंपल यादव यांच्यासह पक्षातील मोठ्या नेत्यांनी अजित प्रसाद यांच्या समर्थनार्थ सभा आणि रोडशो आयोजित केले. मात्र, शेवटी ही जागा भाजपाने जिंकली. हा विजय म्हणजे लोकसभा निवडणुकीत फैजाबाद लोकसभा निवडणुकीतील पराभवाचे भाजपाने काढलेले उट्टे मानले जात आहे. ◂(वृत्तसंस्था)

# भ्रष्टाचाराचा ‘शिशमहल’ उद्ध्वस्त

## विजयानंतर अमित शाह यांचा केजरीवालांवर निशाणा

◆ **नवी दिल्ली, ८ फेब्रुवारी**

दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपाला निर्विवाद बहुमत मिळाले. अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाचा दारुण पराभव झाल्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी एक्सवर पोस्ट लिहीत कार्यकर्त्यांचे अभिनंदन करताना, दिल्लीत भ्रष्टाचाराचा ‘शिशमहल’ उद्ध्वस्त झाला, असा जोरदार निशाणा साधला.



निवडणूक निकालावर भाष्य करताना एक्सवर लिहिलेल्या पोस्टमध्ये शाह म्हणाले की, दिल्लीच्या हृदयात पंतप्रधान नरेंद्र मोदीच असल्याचे स्पष्ट झाले आहे. येथील जनतेने खोटारडेपणा, धोकेबाजी आणि भ्रष्टाचाराचा ‘शिशमहल’ उद्ध्वस्त करीत दिल्लीला संकटमुक्त केले आहे. जे लोक दिलेली आश्वासने पाळत नाहीत, अशा लोकांना जनतेने धडा शिकवला. दिल्लीत आता विकास आणि विश्वासाचे एक नवे युग सुरू होणार आहे. दिल्लीत असत्यावर आधारित सरकारचा शेवट झाला. हा अहंकार आणि अराजकतेचा पराभव आहे. दिल्लीवासीयांनी मोदींची गॅरंटी आणि मोदींच्या विकासाच्या व्हिजनवर दाखवलेल्या विश्वासाचा विजय आहे. ◂(वृत्तसंस्था)



### जगातील सर्वोत्तम राजधानी बनवण्यासाठी कटिबद्ध

पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वात भाजपा सर्व आश्वासनांची पूर्तता करून दिल्लीला जगातील सर्वोत्तम राजधानी बनवण्यासाठी कटिबद्ध आहे. लोकांनी मतदानातून दूषित झालेली यमुना नदी, पिण्याचे अस्वच्छ पाणी, खराब रस्ते आणि गल्लोगल्ली निर्माण झालेल्या दारूच्या अड्ड्यांविरोधात आपला रोष व्यक्त केला, अशी टीका अमित शाह यांनी आम आदमी पक्षावर केली. महिलांचा सन्मान, कॉलोनीवासीयांचा स्वाभिमान आणि स्वयंरोजगाराच्या संधींसह मोदींच्या नेतृत्वात दिल्ली आता एक आदर्श राजधानी होईल, असा विश्वास शाह यांनी व्यक्त केला. ■

## राहुल गांधींची अप्रत्यक्ष भाजपाला मदत : केटी रामाराव

◆ **हैदराबाद, ८ फेब्रुवारी**

नवी दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपाच्या झालेल्या विजयाबद्दल अभिनंदन करताना बीआरएस पक्षाचे कार्याध्यक्ष के. टी. रामाराव यांनी एक्सवर पोस्ट लिहीत म्हटले की, काँग्रेसने स्वबळावर निवडणूक लढवून भाजपाला विजयी करण्यासाठी एकप्रकारे मदतच केली, त्यामुळे विजय भाजपाचा, पण अभिनंदन मी राहुल गांधी यांचे करतो.

रामाराव यांनी म्हटले की, दिल्लीतील निवडणुकीने पुन्हा एकदा सिद्ध केले की, राहुल गांधी भाजपाला पराभूत करण्यास असमर्थ आहे. स्वतः जिंकू शकत नाहीत आणि प्रादेशिक पक्षांना कमकुवत करतात आणि अप्रत्यक्षपणे भाजपाला मदत करतात. मी राहुल गांधींचे अभिनंदन करतो की, त्यांनी आणखी एक विजय भाजपाला मिळवून दिला आहे. काँग्रेस पूर्णतः कोसळली असून, यापुढे हा पक्ष कुठल्याही राज्यात सत्ता मिळवू शकणार नाही. ◂(वृत्तसंस्था)

# आपच्या विजयाची जबाबदारी आमची नव्हती: काँग्रेस

◆ **नवी दिल्ली, ८ फेब्रुवारी**

आम आदमी पक्षाला विजय मिळवून देणे ही आमची जबाबदारी नव्हती, काँग्रेस आपच्यासोबत असती तर असा निकाल लागला नसता, असे मित्रपक्षांकडून करण्यात येणारी टिप्पणी योग्य नसल्याचे काँग्रेस प्रवक्त्या सुप्रिया श्रीनेत म्हणाल्या.

दिल्ली विधानसभेत आप व काँग्रेसच्या पराभवावर बोलताना श्रीनेत म्हणाल्या, आम आदमी पक्षाला विजयी करण्याची जबाबदारी आम्ही उचललेली नाही. आम्ही काही एनजीओ नाही, आम्हीही राजकीय पक्ष आहो. दिल्लीतील जनतेची साथ आमच्यासोबत असल्याचे पक्षाने केलेल्या सर्वेक्षणातून दिसून आले, त्यामुळे आम्ही स्वबळावर निवडणूक लढवली. आता कोण काय म्हणते, याचा आम्हाला काही फरक पडत नाही. आम आदमी पक्ष हा त्यांच्या कर्मामुळे पराभूत झाला. ◂(वृत्तसंस्था)

## आणखी लढा, एकमेकांना संपवा! : ओमर अब्दुल्ला

◆ **श्रीनगर, ८ फेब्रुवारी**

आम आदमी पक्षासाठी अस्तित्वाची लढाई, तर भाजपाची प्रतिष्ठा पणाला लागलेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीचे निकाल स्पष्ट झाले. भाजपाने येथे आपला धूळ चारली, तर काँग्रेसची कामगिरी एकदमच निराशाजनक राहिली. मतमोजणी सुरू असताना नॅशनल कॉन्फरन्सचे नेते आणि जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी आणखी लढा, एकमेकांना संपवा, असे पोस्ट ‘एक्स’वर करीत मनातील उद्वेग व्यक्त केला. ◂(वृत्तसंस्था)

# मद्यधोरणात आप बुडाली, पैशांवर होते लक्ष

## अण्णा हजारे यांचा घणाघात

◆ **मुंबई, ८ फेब्रुवारी**

दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपाने २६ वर्षांपेक्षा जास्त कालावधीनंतर सत्ता प्राप्त केली. या पक्षाने आम आदमी पार्टीचा दणदणीत पराभव केला. कधीकाळी अरविंद केजरीवाल यांचे गुरू राहिलेले ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी आपच्या पराभवावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. हा पक्ष मद्यधोरणात बुडाला. या पक्षाचे केवळ पैशांवर लक्ष होते, असे अण्णा हजारे म्हणाले.

उमेदवाराचे चारित्र्य स्वच्छ असले पाहिजे आणि त्याला त्यागाचे गुण माहीत असले पाहिजे, असा घणाघात अण्णा हजारे यांनी केजरीवालांवर केला.



अण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचारविरोधी लढ्यातून जन्मलेला आम आदमी पार्टीचा भाजपाने दिल्ली विधानसक्षभेच्या निवडणुकीत दारुण पराभव केला.

मद्यधोरणाच्या मुद्यात पैसा आला, त्यावेळी केजरीवालांचा पक्ष त्यात बुडाला आणि या पक्षाची प्रतिमा खराब झाली. अरविंद केजरीवाल यांच्या स्वच्छ चारित्र्याबद्दल लोक बोलायचे, आता ते मद्यधोरणाबद्दल बोलतात, असे अण्णा हजारे यांनी राळेगण सिद्धी येथे पत्रकारांसोबत चर्चा करताना सांगितले. निःस्वार्थपणे लोकांची सेवा करण्याची गरज आपने समजून घेतली नाही, या पक्षाने चुकीचा मार्ग धरला. पैशाने आघाडी घेतली, त्यामुळे त्यांचा पराभव झाला, असे अण्णा हजारे यांनी म्हटले.

**२०१२ मध्ये मार्ग वेगळा**

अरविंद केजरीवाल यांनी २०१२ मध्ये आम आदमी पार्टी स्थापन करण्याचा निर्णय घेतल्यानंतर अण्णा हजारे आणि त्यांचा मार्ग वेगळा झाला होता. आपची स्थापना झाल्यानंतर मी राजकारणापासून दूर राहिलो, असे हजारे म्हणाले. मी सुरुवातीपासूनच सांगत आलो की, जेव्हा कुणी निवडणूक लढवतो, तेव्हा त्याचे चारित्र्य स्वच्छ आणि निष्कलंक असले पाहिजे. उमेदवाराला त्यागाचे गुण माहिती असले पाहिजे आणि अपमान सहन करण्याची क्षमता हवी, असे अण्णा हजारे यांनी सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

# दुर्योधनाचा अंत झाला : कुमार विश्वास

◆ **नवी दिल्ली, ८ फेब्रुवारी**

भाजपा नेते प्रवेश वर्मा यांनी आपचे संयोजक आणि माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचा नवी दिल्ली मतदारसंघात पराभव करताच, आपचे माजी नेते व प्रसिद्ध कवी डॉ. कुमार विश्वास यांनी अत्यंत बोचरी प्रतिक्रिया व्यक्त करीत दुर्योधनाचा अंत झाला असे म्हटले आहे. लक्षवेधी ठरलेल्या नवी दिल्ली मतदासरंघात अरविंद केजरीवाल यांचा पराभव झाला आहे. या मतदारसंघात भाजपा उमेदवार प्रवेश वर्मा यांचा विजय झाला. केजरीवाल यांना ३,१३८ मतांनी पराभव स्वीकारावा लागला आहे.

मी विजयाबद्दल भाजपाचे अभिनंदन करतो. दिल्लीच्या लोकांसाठी ते काम करतील, अशी अपेक्षा आहे, असे कुमार विश्वास म्हणाले. माझ्यावर राम आणि कृष्णाची कृपा असल्याने मी या सर्कसमधून (आम आदमी पार्टी) बाहेर पडू शकलो, अशी टीका त्यांनी केली. मनीष सिसोदिया यांचा जंगपुरा मतदारसंघातून पराभव झाल्याचे कळताच माझ्या पत्नीच्या डोळ्यातून आनंदाश्रू आले. कारण, माझ्याकडे शक्ती आहे, असे मनीष सिसोदिया यांनी मंत्रिपद मिळाल्यानंतर माझ्या पत्नीला म्हटले होते. शक्ती सतत सोबत नसते, असे उत्तर त्यावेळी माझ्या पत्नीने सिसोदियांना दिले होते, असे विश्वास म्हणाले.

वैयक्तिक महत्त्वाकांक्षेसाठी अण्णा हजारे यांच्या आंदोलनातून बाहेर पडलेल्या लाखो कार्यकर्त्यांच्या स्वप्नांचा चुराडा करणाऱ्या व्यक्तीबद्दल मला कोणतीही सहानुभूती नाही. ◂(वृत्तसंस्था)




## खासदार अनुराग ठाकूर यांनी केले संगमात स्नान

जगातील सर्वांत मोठ्या सांस्कृतिक मेळाव्या महाकुंभात माजी केंद्रीय मंत्री आणि खासदार अनुराग ठाकूर यांनी त्यांच्या पत्नीसह संगमात स्नान केले. महाकुंभाचे वर्णन दिव्य आणि भव्य असल्याचे सांगून त्यांनी त्याला ‘एकतेचा



महाकुंभ’ म्हटले. गंगे च यमुने चैव गोदावरी सरस्वती, नर्मदे सिंधू कावेरी जलेस्मिन् सन्निधीम कुरु, असे खासदार अनुराग ठाकूर यांनी त्यांच्या अधिकृत एक्स खात्यावर स्नानाचे फोटो शेअर करीत लिहिले. यावेळी त्यांनी गंगा, यमुना आणि सरस्वती या दिव्य प्रवाहांच्या संगमावर पूजा केली आणि सर्वांच्या कल्याणासाठी प्रार्थना केली.

अनुराग ठाकूर यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, आई गंगा, यमुना आणि सरस्वतीच्या आशीर्वादाने सर्वांचे जीवन सुख, समृद्धी आणि सौभाग्याने भरले जावो. त्यांनी महाकुंभाचे वर्णन ‘एकतेचा महाकुंभ’ असे केले. महाकुंभ हे भारतीय संस्कृती आणि श्रद्धेचे प्रतीक असल्याचे त्यांनी म्हटले. आतापर्यंत ४० कोटींहून अधिक भाविकांनी महाकुंभात पवित्र स्नान केले. या ऐतिहासिक कार्यक्रमात देशाच्या विविध भागातील साधू, संत, राजकारणी, सामाजिक कार्यकर्ते आणि सामान्य लोक श्रद्धेने सहभागी होत आहेत. प्रयागराजचा हा महाकुंभ जागतिक स्तरावर सनातन संस्कृतीच्या अविरत प्रवाहाचे गौरव करत आहे. ■

# ‘चांदणा’नंतर नवीन सरकारने आखाड्याचे काम घेतले हाती

### आठ श्रीमहंत आणि आठ उपमहंत निवडले

शुक्ल पक्षाच्या नवमीला नवीन सरकारने शैव आखाड्यांचे काम हाती घेतले. आठ कौशल्यांमधून निवडलेल्या श्रीमहंतांना ‘चंदन’ म्हणजेच टिळक-चंदनाच्या लेपाने अभिषेक केल्यानंतर आखाड्याची जबाबदारी देण्यात आली. हे अष्ट कौशल पुढील सहा वर्षे आखाड्याचे कामकाज पाहतील. नवीन आठ कौशल्ये अस्तित्वात येताच छावणी देवता आणि धर्माच्या स्तुतीच्या जयघोषाने दुमदुमून गेली. आवडत्या देवतेची पूजा केली. अष्ट कौशलच्या नवनियुक्त श्री महंतांनी धर्मध्वजाचे दोर सोडले आणि कुंभ नगरीतून आखाडा निघण्याची घोषणा केली.

आखाड्यांचे कामकाज अष्ट कौशल यांच्यामार्फत चालते. आठ उप-महंत आहेत, ज्यात आठ श्री महंतांचा समावेश आहे. महाकुंभाच्या प्रारंभासह, निरंजनी, महानिर्वाणी आणि जुना आखाडा ही आठ कौशल्ये नष्ट झाली. त्यांच्या जागी, एक समिती आखाड्याचे कामकाज पाहत होती. परंपरेनुसार, तिसऱ्या अमृतानंतर नवीन अष्ट कौशलमधून श्रीमहंताची निवड केली जाते. नवव्या दिवशी नवीन



अष्टकौशल तयार होते.

आखाड्यातील सर्व मंदिरांना प्रतिनिधित्व देण्यात आले. शुक्रवारी सकाळी देवतेच्या पूजेनंतर धार्मिक ध्वजाखाली प्रार्थना करून प्रक्रिया सुरू झाली. महानिर्वाणी आखाड्याचे सचिव श्रीमहंत यमुना पुरी यांच्या मते, श्रीमहंत रवींद्र पुरी, श्रीमहंत रमेश गिरी, वंशीपुरी, विनोद गिरी, मृत्युंजय भारती, मनोज गिरी, प्रेम गिरी यांच्यासह आठ उपमहंत दिगंबर शिवपुरी, रवी गिरी, विश्वनाथ गिरी, रामशंकर गिरी, मनसुख गिरी, ब्रह्मनारायण पापुरी, उमाशंकर गिरी यांचा नवीन अष्ट कौशलमध्ये समावेश करण्यात आला आहे. त्यांची निवड झाल्यानंतर संतांनी त्यांना पुष्पहार घालून अभिनंदन केले. ज्येष्ठ संतांच्या उपस्थितीत गुरुकुटीजवळ चंदन म्हणजेच चंदनाचा टिळक लावून त्यांना अष्ट कौशल पदावर विराजमान करण्यात आले. ■

## महाकुंभात विश्व हिंदू परिषदेची वार्षिक बैठक सुरू

### लव्ह जिहादसह ८ प्रमुख मुद्यांवर होणार चर्चा


विश्व हिंदू परिषदेच्या विश्वस्त मंडळ आणि केंद्रीय व्यवस्थापन समितीची वार्षिक बैठक प्रयागराज महाकुंभात सुरू आहे. तीन दिवसीय चालणाऱ्या या वार्षिक सभेत जगभरातून विश्व हिंदू परिषदेशी संबंधित प्रतिनिधी सहभागी होणार आहेत.

बैठकीत वक्फ बोर्ड रद्द करणे, लव्ह जिहाद, हिंदूंची घटती लोकसंख्या, तरुणांमध्ये विकृतीचा प्रसार, बांगलादेशातील हिंदूंवर होणारे अत्याचार, मठ आणि मंदिरांची सरकारी नियंत्रणातून मुक्ती, अयोध्येनंतर काशी आणि मथुराची संपूर्ण मुक्ती आदी प्रमुख विषयांवर चर्चा करून निर्णय घेण्यात येणार आहे. सोबतच विश्व हिंदू परिषद वर्षभरात कोणते कार्यक्रम राबवणार आणि कोणत्या प्रकारच्या मोहिमा राबवणार, याची रूपरेषाही बैठकीत ठरविण्यात येणार आहे. या बैठकीत अनेक देशांचे प्रतिनिधी सहभागी झाले आहेत. महाकुंभात विश्व हिंदू परिषदेचे शिबिर सेक्टर १८ मध्ये स्थित आहे. या शिबिरात पहिल्या दिवसाची सभा छोट्या पंडालमध्ये तर दुसऱ्या आणि तिसऱ्या दिवसाचे कार्यक्रम मोठ्या पंडालमध्ये होणार आहे. सभेसाठी विश्व हिंदू परिषदेच्या शिबिरात विशेष तयारी करण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून विश्व हिंदू परिषदेच्या शिबिरात अनेक महत्वाच्या बैठका झाल्या आहेत. ■

# महाकुंभात बॉलिवूड स्टार्सचा संगम

अभिनेत्री नीना गुप्ता आणि संजय मिश्रा यांनी शुक्रवारी महाकुंभाच्या कार्यक्रमात बॉलिवूडच्या चेहऱ्यावर आपले नाव जोडले. दोन्ही कलाकारांनी महाकुंभमेळ्याला भेट दिली आणि संगमात पवित्र स्नान करण्यासोबतच गंगा मातेलाही नमस्कार केला आणि त्यांच्या आगामी चित्रपटाच्या यशासाठी शुभेच्छा दिल्या.

आगामी वध-२ या चित्रपटाच्या प्रमोशनच्या निमित्ताने दोघेही प्रयागराजला पोहचल्याचे सांगितले. नीना म्हणाल्या की, गंगा मातेच्या पवित्र पाण्यात स्नान करण्याची संधी म्हणजे एक आध्यात्मिक प्रवास वाटला. महाकुंभात संजय मिश्रा भगव्या कपड्यात दिसून आले. ते म्हणाले की, गंगा यमुना आणि पौराणिक सरस्वती नद्यांच्या संगमावर आयोजित महाकुंभमेळ्याचा भाग असणे हा एक सुखद अनुभव आहे. सोबतच अभिनेता राजकुमार रावही पवित्र स्नान करण्यासाठी प्रयागराज महाकुंभाला पोहोचला.



प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना महाकुंभ परिसराच्या हवेत पसरलेल्या अध्यात्माची भावना आणि लाखो-कोटी लोक कुंभस्नान करताना पाहून ते भारावून गेले. राव हे परमार्थ निकेतन आश्रमात थांबले आहे. ते म्हणाले की, आपण खूप भाग्यवान आहोत की, आपल्याला या महाकुंभात स्नान करण्याची संधी मिळाली. ■



# भाजपा मुख्यालयात विजयाचा जल्लोष

**नवी दिल्ली, ८ फेब्रुवारी,**

दिल्ली विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या विजयाने भाजपाचा दिल्लीतील जवळपास २७ वर्षांचा राजकीय वनवास संपला. त्यामुळे दिल्लीतील भाजपाच्या कार्यालयांत या विजयाचा प्रचंड जल्लोष करण्यात आला. भाजपासाठी हा विजय ‘न भुतो न भविष्यती’ असा आहे.

मतमोजणीच्या पहिल्या तासातच भाजपाला बहुमत मिळणार हे स्पष्ट झाले होते. त्यामुळे पंडित पंत मार्गावरील दिल्ली प्रदेश भाजपाच्या तसेच पंडित दीनदयाल उपाध्याय मार्गावरील भाजपाच्या राष्ट्रीय मुख्यालयात भाजपा नेते आणि कार्यकर्त्यांचे येणे सुरू झाले. दहा वाजताच्या सुमारास भाजपाची बहुमताच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. दुपारी १२ वाजता भाजपाला बहुमत मिळणार, हे स्पष्ट झाले. भाजपा कार्यालयात हजारो कार्यकर्ते गोळा झाले आणि त्यांनी जल्लोष सुरू केला. पेढे आणि बुंदीच्या लाडवांनी एक-दुसऱ्याचे तोंड गोड केले जाऊ लागले. गुलाल उधळण्यात आला, संदल आणि बॅण्डच्या तालावर भाजपाचे ध्वज हातात घेत भाजपा कार्यकर्ते नाचू लागले. बॅण्डही साधा नव्हता, तर घोडेवाला बॅण्ड होता. महिलांनी फुगड्या सुरू केल्या. मोदी जिंदाबादच्या घोषणांनी आसमंत दुमदुमून गेला.

### दिशाभूल करण्याच्या परंपरेचा आज अंत झाला

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपच्या झालेल्या विजयावर आनंद व्यक्त केला आहे.



दिल्ली विधानसभा निवडणुकीतील विजयामुळे अरविंद केजरीवाल यांचा बुरखा फाटला असून, खोटी आश्वासने देऊन लोकांची दिशाभूल करण्याच्या परंपरेचा आज अंत झाला आहे, असे ते म्हणालेत. दिल्लीकरांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर विश्वास दाखवला. या विजयामुळे आम आदमी पार्टीचे नेते अरविंद केजरीवाल यांचा बुरखा फाटला आहे. त्यांनी सातत्याने खोटी आश्वासने देऊन आणि लोकांची दिशाभूल करत ज्या प्रकारे राज्य केले, त्या परंपरेचा आज अंत झाला आहे.

# कारच्या धडकेत सहा वर्षीय मुलगा ठार

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, ८ फेब्रुवारी,**

येथील अन्नछत्र पार्किंगचे जवळील रस्त्यावर शनिवारी ८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वा. चे सुमारास कारची धडक ६ वर्षीय मुलगा ठार झाला. हाजी मुमताज सय्यद (वय ६ वर्षे, रा.कांदा बाजारजवळ, अक्कलकोट) असे मयत मुलाचे नांव आहे.

आरोपी कार चालक प्रभु किसन आवार, (वय-३५ वर्षे) रा. मालेवाडी, ता.गंगाखेड, जि.परभणी याचे विरुध्द समोरुन जोराने धडक देवुन मुलास गंभीर जखमी करुन त्याचे मरणास कारणीभुत झाला म्हणून गुन्हा दाखल झाला. याबाबत कारचालक यांच्या विरोधात उत्तर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला आहे. फिर्याद मयताचा मामा दौला गफुर सय्यद, (वय ३४ वर्षे), व्यवसाय मजुरी, रा. कांदा बाजार जवळ, अक्कलकोट यांनी दिली. उपचाराकरिता ग्रामीण रुग्णालय अक्कलकोट येथे नेले असता तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी त्यास तपासुन तो उपचारापुर्वीच मयत झालेचे सांगितले. अधिक तपास पोलीस करत आहेत.

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | रविवार, ९ फेब्रुवारी २०२५
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# कमळाची कमाल, ढासळली केजरी'वॉल'!

## ● दिल्ली 'आप'दामुक्त; आर्यभटाने लावलेला शोध काँग्रेसला भावला

- ४८ जागा जिंकून भाजपाचे २७ वर्षांनंतर जोरदार पुनरागमन
- अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया यांचा 'दारू'ण पराभव
- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्या दिल्लीवासीयांना शुभेच्छा



**नवी दिल्ली, ८ फेब्रुवारी-** दिल्ली विधानसभा निवडणुकीचा निकाल शनिवारी जाहीर झाला. सर्व वृत्तवाहिन्यांनी दिलेल्या एक्झिट पोलनुसारच निवडणुकीचा निकाल लागला. ७० सदस्यीय विधानसभेत भाजपाने ४८ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळविले आणि २७ वर्षांचा वनवासही संपविला.



चौथ्यांदा सत्तेचा दावा करणारे अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पार्टीला फक्त २२ जागांवर समाधान म ानावे लागले. इतकेच नाही तर, राजीनामा देऊन आतिशी यांना मुख्यमंत्री बनविणारे आणि पुन्हा मुख्यमंत्री म्हणून परत येण्याचा दावा करणारे केजरीवाल यांना दारुण पराभवाचा सामना करावा लागला. त्यांच्यासोबतच मनीष सिसोदिया आणि आपच्या अन्य दिग्गज नेत्यांचाही पराभव झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या विजयासाठी भाजपा कार्यकर्त्यांचे अभिनंदन करताना दिल्लीवासीयांना शुभेच्छा दिल्या. विशेष म्हणजे, अस्तित्वाची लढाई लढणाऱ्या काँग्रेसला सलग तिसऱ्यांदा भोपळाही फोडता आला नाही. २020 च्या तुलनेत भाजपाने या निवडणुकीत घवघवीत यश मिळविले. भाजपाने ४८ जागा जास्त जिंकल्या. ही निवडणूक भाजपाला २७ वर्षांचा वनवास संपवून सत्तेत येण्यासाठी, आम आदमी पार्टीला चौथ्यांदा सत्ता काबीज करण्यासाठी आणि काँग्रेसला स्वत:चे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी अतिशय महत्त्वाची होती. मद्य धोरण घोटाळ्यात अरविंद केजरीवाल यांच्यासह आपच्या अनेक नेत्यांना अटक झाली होती. भाजपाने हाच मुद्दा निवडणूक प्रचारात शस्त्रासारखा उचलला. सोबतच, विकासाच्या मुद्यावरही विशेष भर दिला. याशिवाय, यमुना नदीचे दूषित झालेले पाणी, हवेची सातत्याने ढासळत असलेली गुणवत्ता आणि दिल्लीत सर्वत्र दिसत असलेले कचऱ्याचे ढीग हे मुद्देही प्रचारात भाजपाने प्रभावीपणे उचलून धरले. सोबतच, स्वत:ला आम आदमी म्हणत सत्तेत आलेल्या केजरीवालांनी त्यांच्या शासकीय निवासस्थानाला शिशमहल बनविण्याचा मुद्दा दिल्लीकरांची प्रचंड नाराजी ओढविण्यासाठी कारणीभूत ठरला.

### केजरीवाल यांची पहिली प्रतिक्रिया

आपच्या दारुण पराभवावर अरविंद केजरीवाल यांनी पहिली प्रतिक्रिया दिली. मी सर्व विजेत्यांचे अभिनंदन करतो. मला आशा आहे की, विजयी उमेदवार लोकांच्या अपेक्षा पूर्ण करतील. गेल्या १० वर्षांत जनतेसाठी केलेले काम त्यांच्यासमोर आहे. जनतेचा निर्णय आम्ही मान्य करतो. आम्ही आता सक्षम विरोधी पक्षाची भूमिका बजावू, असे केजरीवाल म्हणाले.


### काँग्रेसच्या पराभवाची 'हॅट्ट्रिक'

७० सदस्यीय दिल्ली विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने पराभवाची 'हॅट्ट्रिक' केली. या पक्षाचे अनेक दिग्गज नेते आपटले. या निवडणुकीतही पक्षाने सुमार कामगिरी केली असली, तरी मतांच्या टक्केवारीत किंचित झालेल्या सुधारणेवर त्यांना समाधान मानावे लागले. २०३० मध्ये होणाऱ्या निवडणुकीत लोकांचा विश्वास पुन्हा मिळवू असा अतिआत्मविश्वास या पक्षाच्या नेत्यांनी व्यक्त केला. शीला दीक्षित यांचे पुत्र संदीप दीक्षित नवी दिल्ली मतदारसंघात तिसऱ्या क्रमांकावर फेकले गेले. या मतदारसंघात प्रवेश वर्मा यांनी आपचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांचा तीन हजारपेक्षा जास्त मतांनी पराभव केला. वर्मा यांना २५,०५७, केजरीवाल यांना २२,०५७ मते मिळाली. संदीप दीक्षित यांना केवळ ३,८७३ मतांवर समाधान मानावे लागले. हा शीला दीक्षित यांच्या गौरवशाली परंपरेला मोठा धक्का आहे.









## रोखठोक

दिनेश गुणे


# चघळलेल्या विनोदाची नवी चिपाडे...

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत नवे मतदार कोठून आले, ते कसे आले, त्यांची नावे कशा प्रकारे समाविष्ट झाली, याची सर्व उत्तरे केंद्रीय निवडणूक आयोगाने अगोदरच दिलेली आहेत, आता पुन्हा राहुल गांधी यांनी जुनाच मुद्दा पुन्हा समोर आणून दिल्ली विधानसभेतील संभाव्य पराभवापासून पळ काढण्यासाठी त्यांचा प्रयत्न सुरू असून, दिल्लीमध्ये पक्षाचे अस्तित्वदेखील उरणार नसल्याचे लक्षात आल्याने नवा नॅरेटिव्ह तयार करण्याचा सराव त्यांनी सुरू केला आहे, अशा जोरदार शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी राहुल गांधी यांच्या पत्रकार परिषदेनंतर दिलेल्या प्रत्युत्तरामुळे, जुन्या विनोदाला नवा मुलामा देण्याच्या राहुल गांधी यांच्या प्रयत्नांचा एक प्रकारे पर्दाफाशच झाला आहे. एकच विनोद पुन्हा पुन्हा केला, तर त्यामधील गंमत निघून जाते, आणि वारंवार त्यावर हसूदेखील येत नाही हे फडणवीस यांचे म्हणणे शुक्रवारी अनेकांस अक्षरशः पटले असेल. काँग्रेसचे सर्वेसर्वा, लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसच्या नेतृत्वाची पालखी वारसा हक्काने खांद्यावर घेतलेले खासदार राहुल गांधी यांनी शुक्रवारी पत्रकार परिषद घेऊन पहिल्यांदाच गौप्यस्फोट केल्याच्या आवेशात काही जुनेच मुद्दे पुन्हा एकदा माध्यमांसमोर मांडले. फरक एवढाच होता, की या वेळी निवडणूक आयोगाशी अगोदर केलेल्या पत्रव्यवहाराबाबत आणि त्यासंदर्भात आयोगाकडून वेळोवेळी स्पष्ट झालेल्या खुलाशाबाबत त्यांनी बरेच बोलके मौन पाळलेले दिसत होते. त्याशिवाय, या पत्रकार परिषदेत त्यांनी शरद पवार गटाच्या राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष असलेल्या संसदरत्न खासदार सुप्रिया सुळे आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेना गटाचे प्रवक्ते, राज्यसभेचे सदस्य संजय राऊत यांनाही पत्रकार परिषदेत आपल्या शेजारी स्थानापन्न होण्याची संधी देऊन इंडिया आघाडीच्या संकुचित संघटितपणाचा पुरावादेखील माध्यमांसमोर मांडला. त्या पत्रकार परिषदेत राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगासमोर माध्यमांच्या साक्षीने उपस्थित केलेले काही सवाल पहिल्यांदाच उघड झाल्याप्रमाणे माध्यमांनीही त्यास जोरदार प्रसिद्धी दिली असली, तरी राहुल गांधी यांच्या मुखातून निघालेले जवळपास सारे सवाल महाराष्ट्रातील काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी पूर्वीच उपस्थित केले होते, याचा अनेक माध्यमांना विसर पडला. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीनंतर याच मुद्यावरून राज्यात गदारोळ माजविण्याचा प्रयत्न काँग्रेसच्या नेतृत्वाखालील इंडिया आघाडीने, विशेषतः काँग्रेसने करून पाहिला होता. त्यासंदर्भात काँग्रेसने निवडणूक आयोगाशी केलेल्या पत्रव्यवहाराचा तपशीलही त्या वेळी उघड झाला होता आणि आयोगाने त्या वेळी केलेल्या पत्रव्यवहाराद्वारे केलेला खुलासाही उघड झाला होता. इतकेच नव्हे, तर इंडिया आघाडीच्या व विशेषतः काँग्रेसच्या त्या आक्षेपांस बळ देण्यासाठी गेल्या वर्षी नोव्हेंबरच्या अखेरीस पुण्यातील वयोवृद्ध समाजसेवक बाबा आढाव यांनीही वयाच्या ९३ व्या वर्षी आत्मक्लेश उपोषणाचे अस्त्रदेखील उगारून काँग्रेसचेच आक्षेपाचे मुद्दे उपस्थित केले आणि लगोलग महाराष्ट्रातील महाविकास आघाडीच्या नेत्यांची आढाव यांच्या मनधरणीसाठी पुण्यात रीघही लागली होती. शुक्रवारच्या पत्रकार परिषदेतील राहुल गांधी यांच्या विवेचनाचा भर प्रामुख्याने निवडणूक आयोग, नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांतील महाविकास आघाडीच्या दारुण पराभवानंतरच्या आक्षेपांचा पुनरुचार, मतदानाची वाढलेली टक्केवारी व मतदारांची वाढलेली संख्या यांवरच होता. राहुल गांधी यांचे वक्तव्य म्हणजे जुन्याच विनोदाचा पुनरुच्चार असल्याचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले असले, किंवा अशा विनोदाची धार आता बोथट झाली असली तरी गांधी, राऊत आणि सुळे यांच्या संयुक्त पत्रकार परिषदेच्या निमित्ताने या आक्षेपांच्या इतिहासाकडे नव्याने पाहणे गरजेचे झाले आहे.

दिल्ली विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर होण्याच्या जेमतेम एक दिवस अगोदर राहुल गांधी यांनी घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेचे पडसाद एका दिवसापुरते माध्यमांतून उमटले. शनिवारी निवडणुकीची मतमोजणी सुरू झाली आणि देशाच्या राजधानीच्या या महानगरात काँग्रेसला मतदारांनी पराभव चाखण्यास भाग पाडल्याचे स्पष्ट होऊ लागले. पहिले काही कल उघड होत असताना, दिल्लीच्या ७० विधानसभा मतदारसंघांपैकी कोणत्याच मतदारसंघात काँग्रेसचे अस्तित्वदेखील उमटल्याचे दिसत नव्हते. त्यामुळे, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निकालाच्या एक दिवस अगोदर व्यक्त केलेल्या प्रतिक्रियेची आठवण होणे साहजिकच होते. दिल्ली विधानसभेत काँग्रेसचा दारुण पराभव होणार असल्याने तो पचविण्याचा पर्याय म्हणून राहुल गांधी यांनी जुन्या विनोदाला नवा मुलामा देण्याचा प्रयत्न करून नवा नॅरेटिव्ह निर्माण करण्याचा प्रयत्न केला असावा ही फडणवीस यांची प्रतिक्रिया पटण्यासारखेच चित्र दिल्लीच्या निकालांनी स्पष्ट केले आहे. हा लेख वाचकांसमोर येईल, तेव्हा या चित्राचे रंग फारसे बदललेले नसतील. त्यामुळे, दिल्लीतील आम आदमी पार्टीची सद्दी संपवून सत्तेच्या दिशेने कौल मिळालेल्या भाजपाच्या विजयावर काही जुनी प्रश्नचिन्हे पुन्हा उमटविण्याची पूर्वतयारी म्हणूनच ती संयुक्त पत्रकार परिषद झाली असावी, असे मानता येऊ शकते. आता त्याची प्रचीती येण्यास सुरुवातदेखील होईल, म्हणूनच, शिळ्या कढीला ऊत आणून पुन्हा एकदा नव्याने जनतेच्या मनात संभ्रम पसरविण्याच्या या प्रयत्नांचा मागोवा घेणे आणि लोकशाहीतील जनसहभागाच्या उत्स्फूर्त प्रतिसादावर संशय व्यक्त करून व्यवस्थेला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे किती सयुक्तिक ठरते याचीदेखील चर्चा होईल.

महाराष्ट्रातील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीतील मतदारयाद्या मिळाव्यात अशी मागणी वारंवार निवडणूक आयोगाकडे करूनही त्याकडे आयोगाने दुर्लक्ष केले, असा राहुल गांधी यांचा आक्षेप होता. या याद्यांवर मतदारांची छायाचित्रे आणि त्यांचे पत्तेही असावेत, असा काँग्रेसचा आग्रह होता, हेही त्यांच्या आक्षेपातून स्पष्ट झाले. नव्या मतदारांची पडताळणी करण्यासाठी ही माहिती काँग्रेसला हवी असून, लोकसभा ते विधानसभा या दोन निवडणुकांदरम्यानच्या जेमतेम पाच महिन्यांत महाराष्ट्रात लाखो मतदार नव्याने कसे समाविष्ट झाले या सवालाचा पुनरुच्चार करून सनसनाटी निर्माण करण्याच्या राहुल गांधी यांच्या प्रयत्नांत या वेळी ठाकरे गट आणि शरद पवार गटदेखील सहभागी झाल्याने, महाराष्ट्राच्या निवडणुकांचा वाद नव्याने केंद्रस्थानी आणणे हाच त्यांचा स्पष्ट उद्देशही उघड झाला.

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांची पूर्वतयारी निवडणूक आयोगाने खऱ्याअर्थाने सप्टेंबर २०२४ मध्ये सुरू केली. निवडणुकांच्या पृष्ठभूमीवर सरकारी अधिकाऱ्यांच्या बदल्या, नियुक्त्यांबाबतचा संपूर्ण तपशील आयोगास कळवावा, अशा सूचना राज्याच्या मुख्य सचिवांना दिल्या. २० नोव्हेंबर २०२४ रोजी होणाऱ्या निवडणुकांसाठी २२



ऑक्टोबर २०२४ रोजी अधिसूचनेद्वारे २८८ मतदारसंघांतील निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला. त्याआधी जाहीर करण्यात आलेल्या तपशिलानुसार, महाराष्ट्रातील मतदारयाद्यांतील मतदारांची संख्या नऊ कोटी ६४ लाख ८५ हजार ७६५ एवढी होती, आणि १ जानेवारी २०२४ ते १ जुलै २०२४ या कालावधीत राज्यात १८ वर्षांवरील मतदानास पात्र असलेल्या २० लाख ९३ हजार नवमतदारांची नोंदणी झाली होती. विहित वयोमानानुसार १ जुलै २०२४ रोजी मतदानाचा अधिकार प्राप्त होणाऱ्या असलेल्या प्रत्येक मतदाराची मतदारयादीत नाव नोंदणी झाली पाहिजे, यासाठी निवडणूक आयोग आग्रही होता, आणि त्यानुसार मतदार नोंदणीच्या मोहिमादेखील हाती घेण्यात आल्या होत्या. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने तसेच विविध राजकीय पक्षांनीदेखील मतदार नोंदणीचे कार्यक्रम हाती घेतले होते. मतदारयादीत नाव समाविष्ट असलेल्या प्रत्येक मतदारास त्याचे मतदार ओळखपत्र मिळावे यासाठी आयोगाने संपूर्ण यंत्रणा कार्यान्वित केली होती. मतदारयादीतील आपला क्रमांक मिळविण्यास मतदारांना समस्या येऊ नये यासाठी मतदाराचे मतदान केंद्र, मतदानाची तारीख, वेळ इत्यादी तपशील असलेल्या चिठ्ठ्या मतदारांस वितरित करण्याच्या सूचनाही आयोगाने दिल्या होत्या. मतदानाच्या तारखेपूर्वी पाच दिवस अगोदर या चिठ्ठ्या मतदारापर्यंत पोहोचल्या पाहिजेत, अशा सूचनाही आयोगाने दिल्या होत्या. मतदारयादीतील पत्त्यांवर न आढळणाऱ्या मतदारांची माहिती संकलित करून, पत्ता बदलल्याने किंवा हयात नसल्याने ज्यांची नावे मतदारयादीतून वगळली गेलेली नाहीत त्याचा तपशीलही स्वतंत्रपणे तयार करण्याच्या तसेच मतदान केंद्रावर मतदाराची ओळख पटविण्यासाठी आवश्यक पुरावे तपासण्याच्या सूचनाही आयोगाने दिल्या होत्या. २०१९ च्या निवडणुकांकरिता महाराष्ट्रात ९६ हजार ६५३ मतदान केंद्रे स्थापन करण्यात आली होती. २०२४ च्या विधानसभेतील वाढीव मतदारसंख्या लक्षात घेऊन मतदान केंद्रांची संख्यादेखील १ लाख १८६ पर्यंत वाढविण्यात आली होती. मतदान केंद्रावरील प्रत्येक संवेदनशील घडामोडींचे चित्रीकरण करण्याची जबाबदारी आयोगाने जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांवर सोपविली होती. विशेष म्हणजे, निवडणुकीच्या प्रत्येक टप्प्यावरील प्रत्येक प्रक्रिया पारदर्शक राहावी यासाठी यामध्ये राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींचा सहभाग असावा याचीही खबरदारी निवडणूक आयोगाने घेतली होती. राज्यात कोणताही अनुचित प्रकार न घडता ६५.०२ टक्के मतदार लोकशाहीच्या या महोत्सवात शांततेने सहभागी झाल्याबद्दल आयोगाने समाधानही व्यक्त केले आणि २९ नोव्हेंबर २०२४ रोजी काँग्रेसने पत्राद्वारे काही गंभीर मुद्दे उपस्थित करून निवडणूक आयोगाकडे काही आक्षेप नोंदविले.

राहुल गांधी यांनी दोन दिवसांपूर्वी संयुक्त पत्रकार परिषदेत उपस्थित केलेले मुद्दे दोन महिन्यांपूर्वीच आयोगाच्या निदर्शनास आणून दिले गेले होते आणि त्यातील प्रत्येक मुद्यावर आयोगाने पत्राद्वारे तपशीलवार स्पष्टीकरण दिले होते. मतदारयाद्यांमधून मनमानीपणाने मतदारांची नावे वगळली, सायंकाळी पाच वाजल्यानंतर अचानक मतदान केंद्रांवरील मतदानात वाढ होऊन रात्री अकरा वाजेपर्यंत त्याच्या टक्केवारीत अनाकलनीय वाढ झाली, असे आक्षेप त्या पत्रात काँग्रेसने नोंदविले होते. मतदारयाद्या तयार करण्याची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे आणि राजकीय पक्षांच्या सहभागानेच पार पाडली जाते व या प्रक्रियेत काँग्रेसचाही सहभाग होता. या याद्यांचा मसुदा राजकीय पक्षांना देण्यात येतो व त्याच्या छाननीच्या प्रत्येक टप्प्यावरील प्रत्येक प्रक्रियेत सर्व राजकीय पक्षांना सहभागी करून घेतले जाते. त्यामुळे आयोगाकडून काँग्रेसच्या आक्षेपांची दखल घेतली जाईल व त्यानुसार तसे कळविले जाईल, असे आयोगाने या उत्तराद्वारे स्पष्ट केले. सायंकाळी पाचनंतर रात्री अकरा वाजेपर्यंतच्या काळात वाढलेल्या मतदानाबाबत आयोगाने अनेकदा जाहीर स्पष्टीकरणे दिली असून काँग्रेसलाही तसे स्पष्टीकरण दिले आहे, असा खुलासाही त्या वेळी आयोगाने केला होता. याबाबत काँग्रेसच्या शिष्टमंडळाशी चर्चा करण्याची आयोगाची तयारी असून ३ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी पाच वाजता शिष्टमंडळाची भेट घेतली जाईल, असेही आयोगाने त्या पत्रोत्तराद्वारे काँग्रेस समितीचे वकील ओमर होडा यांना कळविले होते.

या पत्रानुसार, ३ डिसेंबर रोजी काँग्रेसच्या शिष्टमंडळाने आयोगाची भेट घेऊन या आक्षेपांचा पुरुच्चारही केला. मतदारयाद्या शुद्ध, पारदर्शक आणि समावेशक असाव्यात यासाठी राज्यघटना व लोकप्रतिनिधी कायद्याच्या चौकटीचे पुरेपूर पालन आयोगाने केले असून नियमांचे कोठेही उल्लंघन झालेले नाही अशी ग्वाही या भेटीत आयोगाकडून काँग्रेसच्या शिष्टमंडळास देण्यात आली होती. प्रत्येक निवडणुकीदरम्यान होणाऱ्या छाननी प्रक्रियेत सर्व राजकीय पक्षांना संपूर्ण सहभागी करून घेतले जात असते, त्यामुळे या प्रक्रियेबाबत राजकीय पक्ष अनभिज्ञ नाहीत. मतदारयादीतील प्रत्येक नवी नोंद, नावे वगळणे, बदलणे याबाबत पूर्वसूचना जारी केली जाते, त्यावरील आक्षेप असल्यास जनसुनावणी घेतली जाते, असेही आयोगातर्फे स्पष्ट करण्यात आले. राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसमवेत वेळोवेळी बैठका घेणे, राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना मतदान केंद्रांतील प्रक्रियेत सहभागी करून घेणे, त्यांना वेळोवेळी तेथील घडामोडींची माहिती देणे, प्रत्येक मतदान केंद्रावर बुथ स्तरावर राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची नेमणूक करून प्रक्रिया पारदर्शक राहावी यासाठी दक्षता घेणे, मतदारयाद्यांमधील बदलानुसार त्याचा तपशील दरमहा आयोगाच्या माहिती जालावर प्रसिद्ध करणे, मतदारयादीचा मसुदा व अंतिम यादी आयोगाच्या संबंधित माहिती जालावर आणि सूचना फलकांवरही प्रसृत करणे, मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना विभागशः या याद्या मोफत उपलब्ध करून देणे, त्याबाबत आलेले आक्षेप किंवा दावे दर आठवड्यास राजकीय पक्षांच्या माहितीसाठी उपलब्ध करून देणे आदी अनेक बाबी या शिष्टमंडळासोबतच्या चर्चेत स्पष्ट करण्यात आल्या. मतदारयाद्या तयार करण्याची संपूर्ण प्रक्रिया आयोगाच्या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आल्याचेही आयोगाने या शिष्टमंडळाच्या निदर्शनास आणून दिले व त्याचे लेखी स्पष्टीकरणही जारी करण्यात आले. ५० विधानसभा मतदारसंघांतील मतदारयाद्यांमध्ये जुलै २०२४ ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत सरासरी ५० हजार नावे समाविष्ट करण्यात आल्याचा काँग्रेसचा आरोप दिशाभूल करणारा व वस्तुस्थितीला धरून नाही, असेही आयोगाने तेव्हा स्पष्ट केले होते.

५० मतदारसंघांत नव्हे, तर केवळ सहा मतदारसंघांतील याद्यांमध्ये ५० हजार नावे समाविष्ट झाली असली तरी त्यामुळे सत्ताधारी पक्षाचा ४७ जागांवर विजय झाल्याचा दावाही आयोगाने खोडून काढला होता. आयोगाच्या महाराष्ट्र शाखेने मतदारयाद्यांचा मसुदा, दावे आणि आक्षेपांचा तपशील आदी सर्व माहिती काँग्रेसला पुरविली असून या प्रक्रियेत काँग्रेसचे प्रतिनिधी सहभागी होते, असेही आयोगाने काँग्रेसचे ओमर होडा यांना लिहिलेल्या या पत्रात स्पष्ट केले होते.

दिल्ली विधानसभेच्या निवडणुका आता पार पडल्या आहेत. या विधानसभेत काँग्रेसचे नेमके स्थान कोठे आहे, हेदेखील स्पष्ट झाले आहे. राहुल गांधी यांनी नव्याने उपस्थित केलेल्या जुन्याच प्रश्नांची उत्तरेही त्यांना अगोदरच दिली गेलेली आहेत. तरीही ठाकरे गट आणि शरद पवार गटाच्या नेत्यांसोबत पत्रकार परिषदेत त्यांनी या मुद्यांचा पुनरुच्चार करून काय साधले, त्याचीही चर्चा तर होणारच आहे. दिल्लीतील पराभवापासून पळ काढण्यासाठी नवा नॅरेटिव्ह निर्माण करण्यापलीकडे त्यांचा फारसा वेगळा हेतू नसावा, या देवेंद्र फडणवीस यांच्या मताशी या चर्चेचा बराचसा निष्कर्ष मिळताजुळता ठरू शकतो.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### विदर्भाच्या चौफेर विकासाचे स्वप्न सत्यात उतरणार

ॲडव्हान्टेज विदर्भ २०२५- खासदार औद्योगिक महोत्सवाचे भव्य व यशस्वी आयोजन विदर्भाच्या विकासाला आता दे डबल धक्का देणार हे नक्की.

कारण अभ्यासू, कार्यतत्पर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विकास कामाचाच ध्यास घेऊन पुढच्या २० वर्षांचा अभ्यास व नियोजन करणारे कार्यनिपुण केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि जिंदाल ग्रुप, लॉयड्स ग्रुप, एचसीएलसारख्या मातब्बर उद्योग समूहाचे सज्जन जिंदाल, प्रभाकरन्, नाडर मॅडम व इतरही मोठमोठे उद्योजक जेव्हा जाहीरपणे आपले विदर्भाच्या सर्वांगीण विकासाचे नियोजन सांगतात तेव्हा विदर्भाचा चौफेर विकास हे आता स्वप्न सत्यात उतरणार याची खात्री पटते. वेगवेगळ्या देशांचे राजनीतिक व औद्योगिक क्षेत्रातील अधिकारी, विदर्भातील प्रमुख उद्योगप्रमुख, मंत्रिगण, खासदार यांची मंचावरील उपस्थिती या विधानाला दुजोराच देते. दावोसच्या एमओयूची टवाळी करणारे ॲडव्हान्टेजच्या जाहीर संबोधनाने चांगलेच तोंडावर पडले आहेत. नितीन गडकरींचे मुद्देसूद संबोधन, जिंदाल, प्रभाकरन्, नाडर मॅडमच्या विदर्भाकरिता भविष्यातील योजना, गडचिरोली हा महाराष्ट्राचा शेवटचा जिल्हा नव्हे तर पहिला जिल्हा आहे व भविष्यातील पोलादाचा जागतिक केंद्रबिंदू होणार हे सज्जन जिंदाल यांचे उद्गार बरेच काही सांगून जाते.

ॲडव्हान्टेज विदर्भच्या निमित्ताने सुरू असलेल्या प्रदर्शनात विविध माहितीपर, अभ्यासपूर्ण चर्चासत्रात अनुभवी मान्यवरांचे विचार ऐकण्यासारखे होते. इतर राज्यांप्रमाणे आता ॲडव्हान्टेज विदर्भामुळे ही भूमी सुजलाम सुफलाम होईल, यात शंका नाही.

**रवी वाघमारे**/नागपूर

### अरविंद केजरीवालांना भाजपाचा जोरदार धक्का

दिल्ली विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर झाले असून या निवडणुकीत आम आदमी पार्टीद्वारा सलग तिसऱ्यांदा सत्ता स्थापन करण्याचा दावा व्यक्त केला जात होता. पण या दाव्याला धक्का देत भाजपाने सत्तावीस वर्षांनी दिल्लीची सत्ता आपकडून आपल्याकडे खेचून घेतली आहे. अरविंद केजरीवाल हे समाजसेवक अण्णा हजारे यांच्या इंडिया अगेन्स्ट करप्शन मोहिमेचा भाग होते. या माध्यमातून अरविंद केजरीवाल हे प्रसिद्धीच्या झोतात आले होते. मला राजकारणात बदल घडवायचा आहे त्यासाठी आपण प्रयत्न करीत आहोत अशी त्यांनी प्रतिमा तयार करत त्यांनी दिल्लीची सत्ता हस्तगत केली होती. अरविंद केजरीवाल यांचे राजकारण मुख्यतः विकास आणि 'बाकी सर्व पक्ष चोर आहेत' या संकल्पनेवर उभे होते.

दिल्लीसारख्या राज्यात जेथे केंद्राचा पैसा सुद्धा विकास कामांना वापरला जातो, पण या ठिकाणी सुद्धा आम्हीच विकास केला असे केजरीवाल सांगत होते, पण सर्वसामान्यांना कोण विकास करत हे समजत होते. या विधानसभा निवडणुकीत केजरीवाल यांच्याकडे देण्यासारखे आणि सांगण्यासारखे काही नव्हते. मोहल्ला क्लिनिक, सरकारी शाळांमधील सुधारणा आणि वीज तसेच पाणी बिलामध्ये सबसिडी या चार मुद्यांच्या जोरावर आम आदमी पार्टीने गेली दहा वर्षे दिल्लीमध्ये सत्ता उपभोगली. पण आता त्याची पोलखोल झाली होती. राजकारणात उतरताना अरविंद केजरीवाल यांचा मफलर गुंडाळलेला फोटो सर्वसामान्यांना आपला वाटत होता पण त्या मफलरचा त्यांनी नंतर त्याग केला होता. तसा हा बदल क्षुल्लक वाटणारा असला तरी यामुळे सर्वसामान्य मतदारांत एक संदेश गेला की अरविंद केजरीवाल आज पूर्वीचे राहिले नाही. राजकारणात बदल करायला आलो आहे हा संदेश नंतर दहा वर्षांत त्यांच्या सरकारमध्ये दिसला नाही.

अरविंद केजरीवाल यांच्या दिल्ली सरकारने दिल्लीत नवीन मद्य धोरण लागू केले. यामध्ये झालेल्या शंभर कोटींच्या भ्रष्टाचारामध्ये त्यांना झालेली अटक यामुळे त्यांच्या प्रतिमेला, राजकारणाला मोठा धक्का बसला होता. केजरीवाल यांना असे वाटले की भ्रष्टाचारावरून झालेली अटक आपणास राजकीयदृष्ट्या फायदेशीर ठरेल. पण लोकसभा निवडणुकीच्या निकालात त्याचा फायदा दिसून आला नाही. कारण दिल्लीच्या सर्व सात लोकसभा मतदारसंघात भाजपा जिंकली होती.

अरविंद केजरीवाल या निवडणुकीतही आपली सत्ता कायम रहावी म्हणून, आम आदमी पार्टीने अनेक योजनांची खैरात मांडली होती. त्यामध्ये, प्रामुख्याने 'लाडली बहन' या योजनेचा समावेश होता. केजरीवाल यांनी एक नवीन आरोप केला. हरयाणातील भाजपा सरकारने यमुनेच्या माध्यमातून दिल्लीत पुरवठा केल्या जाणाऱ्या पाण्यात विष मिसळले आहे. पण दिल्ली जल बोर्डाच्या अभियंत्यांचे आभार अशासाठी की त्यांनी वेळीच हे रोखले आणि पाणीपुरवठा थांबवला. अन्यथा मोठ्या प्रमाणात नरसंहार झाला असता असा आरोपही त्यांनी केलेला होता. अरविंद केजरीवाल यांचा हा आरोप हास्यास्पद होता.

दिल्लीतील मध्यमवर्गीय मतदार सामान्यतः लोकसभा निवडणुकीत भाजपाला मतदान करतो. केंद्र सरकारने नुकताच जाहीर केलेल्या अर्थसंकल्पात मध्यमवर्गीयांना तसेच वरिष्ठ नागरिकांना मोठा दिलासा दिला आहे. या मध्यमवर्गीयांनी विधानसभेत भाजपाला मतदान केले त्याचा फटका आप पक्षाला बसला आणि भाजपाने सत्तावीस वर्षांनी दिल्ली परत एकदा काबीज केली आहे.

**अविनाश देशपांडे**/९४२२९५०७५०

### प्लॅस्टिक वापराचे दुष्परिणाम

प्लॅस्टिक वस्तू अथवा पिशव्या हा आधुनिक युगात एक अत्यंत महत्त्वाचा घटक बनला आहे. त्याचा वापर आपण दैनंदिन जीवनात अनेक प्रकारे करतो. अनेक सुविधांच्या बाजूने याचा वापर वाढत असल्यामुळे पर्यावरणात अनेक समस्या उद्भवत आहेत.

पूर्वीच्या काळी म्हणजे फार मागे न जाता २५ ते ३० वर्षांपूर्वी देखील प्लॅस्टिक वापराचे प्रमाण अत्यल्प होते. घरची भांडी, प्लेट्स, चमचे, वाटी, फुलपात्र, डबे प्लॅस्टिकची नसत. त्यामुळेच कदाचित कॅन्सरसारखे आजार कमी प्रमाणात होत होते. परंतु पाश्चात्त्य देशातून आलेली ही वावटळ संपूर्ण जगात वेगाने पसरली आणि सोईचे तसेच वापरा आणि फेका या कृतीमुळे सर्रास वापर वाढू लागला. यात प्लॅस्टिक पिशव्यांचा सुळसुळाट झाला. त्याचा पुनर्वापर नसल्याने तसेच विरघळणारी वस्तू नसल्याने त्याचा निचरा होत नाही. त्यामुळे कित्येक घन मेट्रिक कचऱ्याने नदी-नाले तुंबले जाऊ लागले. पशु, पक्षी, प्राणी यांच्या पोटात प्लॅस्टिक गेल्याने त्यांच्या प्रकृतीवर प्रतिकूल परिणाम झालेत. इतकेच काय गाईच्या पोटातून ऑपरेशन दरम्यान प्लॅस्टिक पिशव्या जशाच्या तशा आढळून आल्यात.

त्याच्या अतिरेकाचे दुष्परिणाम ओळखून पाश्चात्त्य देश लगेच सावध झालेत आणि त्यांनी यावर कायद्याने बंदी आणली आणि कागदी पिशव्यांचा वापर सुरू केला. भारत सरकारने देखील कडक पावले उचलली. त्यामुळे वापरावर बऱ्यापैकी आळा बसला. परंतु तोपर्यंत जनता या गोष्टीची गलाम होऊन बसली. भाजीवाले, किराणा दुकानात छुप्या पद्धतीने प्लॅस्टिक पिशव्या पुरवल्या जातात कारण नाही दिल्या तर त्यांचा व्यवसाय होत नाही असे त्यांचे म्हणणे आहे.

आता प्रश्न आपल्यासारख्या सुशिक्षित लोकांचा आहे. याचे दुष्परिणाम माहीत असूनही आपण बाहेर जाताना कापडी पिशवी घेऊन जात नाही. प्लॅस्टिक डब्यांचा, बाटल्यांचा वापर करतोच. सकाळी दुधाच्या पिशवीपासून प्लॅस्टिकचा वापर सुरू होतो. हल्ली लग्न वा इतर छोट्यामोठ्या समारंभात छोट्या प्लॅस्टिकच्या पाण्याच्या बाटल्या ठेवल्या असतात. त्या रिकाम्या बाटल्या मग इकडे तिकडे पडलेल्या दिसतात. कशावरून रस्त्यावरचे प्लॅस्टिक गोळा करणारे कामगार त्याचा पुनर्वापर करत नसतील?

अशा अनेक समस्या आहेत. आरोग्याला अपायकारक असे याचे अनेक गंभीर परिणाम समोर येत आहेत, जे थेट प्राणिमात्रांच्या मृत्यूचे कारण होऊ शकते. प्लॅस्टिक पिशव्या अथवा अन्य जीवनोपयोगी वस्तू याला पर्यायी व्यवस्था आल्याशिवाय संपूर्णपणे याचा वापर नष्ट होऊ शकत नाही. परंतु एक सुजाण नागरिक या नात्याने स्वतःपुरता तरी 'मी हा वापर कमीत कमी करेन' असे ठरवून सतर्क राहिल्यास पुढील संभाव्य धोके काही प्रमाणात नक्कीच टाळू शकतो.

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

### मनाची गती ओळखणे आवश्यक

मन हे फार गुंतागुंतीचे व अगाध शक्तीने ओतप्रोत भरले आहे. मनाच्या अवस्थेचा थांगपत्ता लागणे हे कठीणच कार्य आहे. आपले मन हे फार चंचल असते. त्याची गती देखील तीव्र असते. मनोवेग हा सर्वांत जास्त वेग म्हणून मान्य आहे. त्याचप्रमाणे या मनावर षडरिपूचा अंमल असला किंवा यावर नियंत्रण नसले की ते कुठेही कानात वारे शिरल्याप्रमाणे धावू लागते. संत कबीर म्हणतात की, 'मन गया तो जाने दे।' म्हणजे जरी मनावर नियंत्रण शक्य नाही, तरी हरकत नाही परंतु 'मत जाने दे शरीर' म्हणजे प्रत्यक्ष कृती (कर्म) पासून दूर राहणे हेच श्रेयकर आहे. हे वाईट किंवा पापकर्म (निषेध) याबद्दलच अपेक्षित आहे. मनात वेगळे, वाईट, वैचारिक किंवा षडरिपुयुक्त विचार आले असता त्याच्या कृतीनेच त्या विचाराचा भोग पेता येतो. मन वासनामय असले की या प्रकारचे विचार बळावतात व त्यांचा उपभोग घेण्याकरिता मन हे शरीराला निर्देश देऊन ते विचार प्रत्यक्ष कृतीत आणण्यास बाध्य करते. परिणामांचा विचार न करता क्षणिक सुख, भोग किंवा लालसा उपभोग करण्याकरिता देहाकडून प्रत्यक्ष कृती केली जाते आणि नंतरच मन व देह तृप्त होतो. हा मनोवेग वेळीच रोखला नाही तर 'विनाशकाले विपरीत बुद्धी' या न्यायाने विनाशाची मुहूर्तमेढ रोवली जाते. हे क्षणात होत नाही. यामागे त्या विचारांचा पगडा किती कसा प्रबळ आहे त्यावर अवलंबून असते.

काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे प्रधान षडरिपू आहेत. नियंत्रणात असल्यास वैचारिक द्वंद निर्माण न होता मनावर ताबा राहतो. पर्यायाने कृती होत नाही व त्या कृतीच्या परिणामांचा विचार मनावर न होता ते तणावरहित राहून मानसिक अवस्था सामान्य राहते. हेच मन चांगल्या विचारांनी प्रेरित असले तर याच देहाकडून सत्कर्म होते, कृती होते व त्याचा परिणाम म्हणून आनंद प्राप्त होतो. त्याला 'पुण्य' म्हणतात. संत तुकाराम महाराजांनी 'पुण्य पर उपकार, पाप पर पीडा ।' असे म्हटले आहे. उपकार म्हणजे मदत, सहकार्य किंवा सहयोग. हे सद्गुण अंगी बाळगून व्यक्ती किंवा समूहाच्या उपयोगी पडले तर त्याचे फल म्हणजे 'पुण्य' आणि षडरिपूंनी युक्त विचार कृतीत उतरविले तर नुकसान, हिंसा, चोरी, हानी, अपमान इ. दुर्गुणामार्फत कती होऊन पीडा प्राप्त होऊ शकते. हेच पाप होय.

भारत भूमीत आजपर्यंत हजारो संत, योगी, ऋषी, आचार्य, तत्त्वज्ञ, आदींनी जन्म घेऊन महान तत्त्वज्ञानाला खतपाणी घालून जगात आदर्श निर्माण केला. संपूर्ण जीवनभर या तत्त्वज्ञानाचा अंगीकार करून समाजाला दिशादर्शन देणाऱ्यांची ही भारत कर्मभूमी म्हणूनच श्रेष्ठ ठरली आहे.

भारतीय तत्त्वज्ञानात कर्माला अनन्यसाधारण महत्त्व आहे. चांगल्या कर्माशिवाय गती प्राप्त होत नाही, हा धर्माचा उपदेश आहे. चांगले कर्म करण्याकरिता शरीर, मन व बुद्धी यांचा समन्वय असणे महत्त्वपूर्ण आहे. ज्ञानाची लालसा उत्पन्न होऊन अज्ञानाचा नाश केल्याने मनाची स्थिरता उत्पन्न होते व अहित-हित हे द्वंद्व दूर होऊन विवेकपूर्ण आचरण होते मग चंचल स्वभावाचे मनही अभ्यासाने, काही प्रयत्नाने त्या हिताच्या ठिकाणी एकाग्र करता येते, स्थिर ठेवता येते. संत वचनाप्रमाणे कर्म हे हितकारी असले तरच सज्जनांना संतोष प्राप्त होतो. म्हणून समर्थ रामदास स्वामी म्हणतात की, 'तुझे कारणी देह घडावा' सर्वांच्या कामासाठी शरीर कष्टवीत जावे.

**संजय पाठक**/नागपूर

### शिक्षणातून व्यक्तीचा सर्वांगीण विकास शक्य

शिक्षणातून व्यक्तीचा सर्वांगीण विकास अपेक्षित असतो. या सर्वांगीण विकासात बोधात्मक, क्रियात्मक विकासाचा समावेश करण्यात आलेला आहे. कोणतीही व्यक्ती शारीरिक, भावनिक आणि बौद्धिकदृष्ट्या सक्षम होणे हे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासामध्ये अपेक्षित असते. याचसाठी लहानपणापासून मुलांवर सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने चांगले संस्कार केले जातात. जेवढी सक्षम व सुज्ञ पिढी आपण घडवू तेवढा समाजसुद्धा बलवान होणार असतो. व्यक्ती व्यक्तींनी मिळूनच समाज आकाराला आलेला असतो. म्हणून प्रत्येक व्यक्तीच्या कृतीचा प्रत्यक्ष-प्रत्यक्ष परिणाम समाजहितावर पडत असतो ही बाब लक्षात घेतली पाहिजे. आपल्या एकट्याच्या चुकीच्या वागण्यामुळे एवढा काय फरक पडणार. नियमांनुसार वागावे ते इतरांनीच आपण नाही. अशा प्रकारची विस्मयकारक विधाने आपल्याला ऐकवण्यात येतात. ते स्वतःपासून समाजाची निर्मिती झाली आहे, ही मूळ संकल्पना लक्षात घेत नाहीत. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासातील भावनिक विकासावर अलीकडे विशेष काम करण्याची गरज निर्माण झाली आहे. भावनाशून्य पिढी निर्माण होत आहे की काय, अशी भीती अनेक जण अनेक उदाहरणाद्वारे मांडत असतात. हे सारे नीटपणे अभ्यासले तर असे होण्याचे काही कारण असेल तर आज समाजात व्यापलेले व वेगाने पसरत चाललेले सदोष विचार हेच आहे हे मान्य होण्यासारखे आहे.

अगदी इतिहासकाळापासून सबंध जगात सदोष स्वकेंद्रित विचारप्रणालीचा अतिरेक जेव्हा जेव्हा ज्यांनी केला तेव्हा तेव्हा ते प्रथमतः स्वतः आणि अंतिमतः समाज अडचणीत व संकटात सापडलेली आपल्याला अनेक उदाहरणे पाहावयास मिळतील. बुद्धिवंतांनी लोकांची ही सदोष स्वकेंद्रित विचारसरणी दूर करण्यावर त्या त्या काळात मोलाचे काम केले तेव्हा समाजहिताचे परिवर्तन घडल्याचे आपणास पाहावयास मिळते. जगातील कुठलाही मनुष्य मूलतः चांगला किंवा वाईट असण्याचा किंवा वाईट घडण्याला त्याने बाळगलेले त्याचे विचार कारणीभूत असतात. माहिती तंत्रज्ञानाच्या स्फोटामुळे या माहिती तंत्रज्ञानाच्या फायद्यासह आलेल्या तोट्यांमुळे जनसामान्यांचा जाणारा बळी वेळीच रोखण्यासाठी नेटक्या जनजागृतीची हीच वेळ आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

# सर्वाधिक घरांसाठी महाराष्ट्र गतिमान

'सर्वांसाठी घरे' हे राज्य शासनाचे धोरण आहे. त्यानुसार राज्यातील बेघर तसेच कच्च्या घरात वास्तव्यास असणाऱ्या लाभार्थींना स्वतःचे हक्काचे घर मिळावे असा प्रयत्न आहे. ही महत्त्वपूर्ण योजना मिशन मोडवर राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थींकडे स्वतःची जागा आहे अशांना २६९ चौरस फूट चटई क्षेत्र घरकूल बांधकामासाठी १ लाख ३० हजार रुपयांपर्यंत अर्थसाहाय्य देण्यात येत आहे. प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेमध्ये नागपूर विभागासाठी ५ लाख ३३ हजार ६२५ घरे मंजूर करण्यात आली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये हा विभाग राज्यात आघाडीवर आहे.




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र शासनाने महाराष्ट्राला प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेअंतर्गत २० लाख घरे मंजूर केली आहे. या व्यतिरिक्त १३.५ लाख घरे मंजूर केल्यामुळे राज्यातील ग्रामीण भागातील जनतेच्या घराचे स्वप्न साकार होणार आहे. आतापर्यंत सर्वाधिक घरे महाराष्ट्राला मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र शासनाचे आभार मानले आहेत.

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण ही १ एप्रिल २०१६ पासून सुरू झाली आहे. ग्रामीण भागातील सर्व बेघर कुटुंबांना आणि कच्च्या आणि मोडकळीस आलेल्या घरांमध्ये राहणाऱ्यांना मूलभूत सुविधेसह एक पक्के घर देण्याचा यामार्फत संकल्प आहे. स्वच्छ अन्न शिजविण्यासाठी समर्पित क्षेत्रासह २५ चौरस मीटर किमान घरकूल उपलब्ध करून देण्यात येत आहे. या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये केंद्र शासनाचा ६० टक्के तर राज्य शासनाचा ४० टक्के निधी राहणार आहे. आवास २०१८ या सर्वेक्षणाच्या आधारे घरांना मंजुरी दिली जात असून, आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी एकत्रित लक्ष्य ९९ लाख ६६ हजार ७६७ ठरविण्यात आले आहे. त्यामुळे राज्याच्या ग्रामीण भागात २ कोटी पक्की घरे, तर शहरी भागात १ कोटी घरे बांधली जाणार आहेत. राज्याला अतिरिक्त १३.५ लाख घरे मंजूर झाली असून, यासाठी नोंदणीला सुरुवात झाली आहे. राज्यात आतापर्यंत २६ लाख लोकांची नोंदणी ही ऐतिहासिक कामगिरी ठरली आहे.

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण योजनेअंतर्गत नागपूर विभागात ५ लाख ३३ हजार २२५ घरांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. टप्पा एक अंतर्गत २ लाख ८५ हजार ११८ मंजूर झालेल्या घरांच्या बांधकामाला सुरुवात झाली आहे. टप्पा दोनमध्ये ८० हजार ४१४ घरांना मंजुरी देण्यात आली असून, अतिरिक्त १ लाख ६८ हजार ०९३ घरांच्या लाभार्थींच्या नोंदणीला सुरुवात झाली आहे.

विभागात कायम प्रतीक्षायादीत २ लाख ३५ हजार ५५२ कुटुंबांची संख्या असून, यातील १ लाख ६८ हजार ०९३ घरांच्या बांधकामाचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. याअंतर्गत १ लाख ४० हजार ६६९ लाभार्थींची नोंदणी पूर्ण झाली आहे. भंडारा, गोंदिया, नागपूर व वर्धा जिल्ह्यात सरासरी शंभर टक्के नोंदणीचे उद्दिष्ट पूर्ण झाले असून, गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातील लाभार्थींची नोंदणी लवकरच पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांनी दिली.

प्रधानमंत्री आवास योजना टप्पा एकमध्ये विभागाला २ लाख ८५ ११८ घरांच्या बांधकामांचे उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यापैकी २ लाख ७३ हजार ४२८ घरांचे बांधकाम पूर्ण झाले. त्यामुळे विभागाने ९५.९० टक्के काम पूर्ण करून राज्यात उत्कृष्ट अंमलबजावणी केली आहे. गोंदिया जिल्ह्यात उद्दिष्टापैकी ९८.९० टक्के, वर्धा ९५.४६ टक्के, गडचिरोली ९५.४५ टक्के, भंडारा ९५.३ टक्के, चंद्रपूर ९३.४२ टक्के, तर नागपूर जिल्ह्यात ९२.९६ टक्के घरकुले पूर्ण झाली आहेत.

प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेअंतर्गत १६ लाख ८० हजार ९३ घरांचे उद्दिष्ट देण्यात आले असून त्यापैकी १ लाख ४० हजार ६६९ लाभार्थींची नोंदणी पूर्ण झाली आहे. प्रधानमंत्री आवास योजनेत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर, अल्पसंख्यक तसेच अपंगांसाठी घरकूल राखीव आहेत. सामाजिक, आर्थिक आणि जात जनगणना निकष वापरून लाभार्थींची निवड केली जाते आणि निवडलेल्या लाभार्थींची यादी ग्रामसभेद्वारा मंजूर केली जाते. लाभार्थींना घरकूल अनुदान थेट लाभार्थींच्या लिंक केलेल्या बँक खात्यात अथवा पोस्ट ऑफिस खात्यात जमा केले जाते. ग्रामीण भागातील बेघर कुटुंबासाठी हक्काचा निवारा या योजनेमुळे मिळत असल्याने ग्रामीण भागातील नागरिकांचाही सहभाग वाढत आहे.

**अनिल गडेकर**
९४०३६२४४४२

## संक्षिप्त वृत्त



### समता सैनिक दलाच्या वतीने रमाई आंबेडकर जयंती साजरी

**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

समता सैनिक दल शहर जिल्हा सोलापूर यांच्यावतीने समता परिवार न्यू बुधवार पेठ या ठिकाणी माता रमाईच्या प्रतिमेचे पूजन करून समता सैनिक दल तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान मॉर्निंग महिला ग्रुप यांच्या वतीने मानवंदना देण्यात आली. समता सैनिक दलाचे जीओसी अंबादास कदम, ज्येष्ठ सल्लागार अण्णासाहेब भालशंकर यांनी मातोश्री रमाई आंबेडकर यांच्या त्यागावर प्रकाश टाकला. सचिव अनिल जगझाप यांनी आभार मानले. यावेळी चंद्रकांत कोळेकर, गौतम चंदनशिवे, संभाजी तळभंडारे, मुकुंद चंदनशिवे, रत्नदीप कांबळे, विनोद जाधव, सत्यजित वडाराव, चंद्रकांत सुरवसे, बबलु काकडे आदित्य दनाने, प्रेम कांबळे अभिषेक सातपुते, निशांत जाधव, लकी घाटांगरे, अजय सोनवणे, बेलभंडारे, प्रेपोवेल जाधव बाबासाहेब वाघमारे, रितेश कसबे, मनीषा सरवदे, मंगल दोड्यांनूर, मालिनी, सुमित्रा जाधव, सुजाता कांबळे, कल्पना सुरवसे, मुक्ताताई बनसोडे, मंगल, रमा डावरे, सरोजिनी जानराव, सुरेखा रोकडे ,लक्ष्मी पात्रे, रुक्मिणी बनसोडे, सुरेखा रोकडे ,सुरेखा जाधव,रेखा पात्रे, मंदाकिनी शिंगे, हेमा वाघमारे, ज्योती वाघमारे, कल्पना अडगळे, वनिता गायकवाड, नंदिनी नवगिरे उपस्थित होत्या.




### नियमित तपासणी अन् उपचाराने कॅन्सर १०० टक्के बरा होतो : डॉ. कुमठेकर

**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

निरोगी जीवनशैली, नियमित तपासणी व उपचाराने कॅन्सर आजार १०० टक्के बरा होतो; असे मत डॉ. शिरीष कुमठेकर यांनी व्यक्त केले. जागतिक कॅन्सर दिनाचे औचित्य साधून भारतीय जैन संघटना आणि जेनस्को यांच्या संयुक्त विद्यमाने महावीर सांस्कृतिक भवन येथे आयोजित मार्गदर्शन शिबिरात बोलत होते. या मार्गदर्शन कार्यक्रमाची सुरुवात पंकजा पंडित यांनी णमोकार महामंत्राने केली. या कार्यक्रमास श्याम पाटील, अभिनंदन विभुते, माया पाटील, विक्रांत बशेट्टी, महावीर नळे, अजितकुमार शहा- भूमकर, नंदकुमार कंगळे, प्रशांत वायकसकर, रेवती शहा-भूमकर, विमलनाथ गुमते उपस्थित होते. यावेळी डॉ. विपुल दोशी म्हणाले की, आधुनिक उपचार, नवीन औषधे, स्क्रीनिंग टेस्टमुळे कॅन्सर बरा होतो. तसेच डॉ. योगेश बंग यांनी केमोथेरेपीचे महत्त्व सांगितले. डॉ. सरिता कोठाडिया यांनी स्त्रियांना स्तनाचे व गर्भाशयाचे कॅन्सर होण्याची शक्यता असते, त्यासाठी नियमित तपासणी करुन, त्यावर उपचार केल्यास आजार बरा होतो, असे मत व्यक्त केले. स्वागत जिल्हाध्यक्ष देशभूषण व्हसाळे यांनी केले. राज्याध्यक्ष केतन शहा यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन राज्य सचिव संतोष बंब यांनी केले तर जैनस्कोचे कोषाध्यक्ष अरुणकुमार धुमाळ यांनी आभार मानले.



### अंजुमन-ए-इस्लाम शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी -**

अंजुमन- ए- इस्लाम इंग्लिश मीडियम शाळेत संस्थेचे कोऑर्डिनेटर रियाज पिरजादे यांच्या मार्गदर्शनाखाली वार्षिक स्नेहसंमेलन, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पुणे येथील पर्सिस्टंट सिस्टम कंपनीचे इंजीनियरिंग लीड असिस्टंट मॅनेजर जाहिद पिरजादे, व्यापारी असोसिएशनचे इम्तियाज कमिशनर, कार्यालयीन प्रमुख इम्तियाज हंजगीकर, प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख रियाज जमादार, केंद्रप्रमुख इरफान सय्यद आणि शहबाज शेख उपस्थित होते. यावेळी १०० विद्यार्थ्यांना संस्थेच्यावतीने भेटवस्तू देण्यात आल्या. यावेळी प्राचार्या मेराज करजगीकर, रफत शेख, तस्लिम शेख, सबा शेख, फरीदा शेख, नसरीन शेख, अल्फा शेख, सुल्ताना शेख उपस्थित होते. प्रास्ताविक इम्तियाज हंजगीकर, सूत्रसंचालन शिक्षिका सादिका कुरेशी, इरफान सय्यद आणि बिल्कीस सय्यद यांनी तर आभार शिक्षिका रुकसाना लालशेरी यांनी मानले.

### छावा चित्रपट करमुक्त करा; संभाजी ब्रिगेडची मुख्यमंत्र्याकडे मागणी

**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी -**

मराठा सम्राट छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित आगामी भारतीय हिंदी भाषेतील ऐतिहासिक चित्रपट छावा हा येत्या १४ फेब्रुवारी २०२५ रोजी सर्व चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाची उत्सुकता अनेकांना लागलेली असून छत्रपती संभाजी महाराज यांच्या जाज्वल्य जीवन चरित्रावरील हा चित्रपट महाराष्ट्रातील जनतेला पाहण्यासाठी कर मुक्त करावा अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने संभाजी ब्रिगेडची पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष शाम कदम यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ई-मेल द्वारे केली आहे. शिवपुत्र 'संभाजी महाराज एक छावाच होते महाराष्ट्राला हे नव्याने; पण पुरेपूर उमजले आहे. 'छावा'चा ट्रेलरचे जोरदार स्वागताने ते सिद्धही झाले आहे. एकदोन नव्हे; तर एकाचवेळी पाच आघाड्यांवर निकराची पंजेफाड करणारा हा सेनाधुरंधर! मराठ्यांच्या इतिहासात असा सेनापती एकमेव 'संभाजी' च होऊन गेला. जंजिरेकर सिद्दी, गोव्याचे फिरंगी, मुंबईचे टोपीकर आणि तीस लाखांची फौज व चौदा कोटींचा खजिना घेऊन मराठ्यांचे पारिपत्य करण्यासाठी दक्षिणेत उतरलेला अवाढव्य औरंगजेबालाही दोन हात केले. यामुळे हा चित्रपट करमुक्त करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

# कृषी, शिक्षण, ग्रामपंचायत सेवकांची आर्थिक परिस्थिती बनली बेताची

- राज्यातील ग्रामसेवक, शिक्षणसेवक व कृषीसेवकांचे मानधन कलावधी रद्द करावे
- ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्र्यांना ग्रामसेवक, कृषीसेवक, शिक्षणसेवक कृती समितीचे निवेदन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

राज्यातील गाव पातळीवर काम करणारे ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक तसेच कृषी क्षेत्रातील कृषीसेवक व शिक्षण क्षेत्रातील काम करणारे शिक्षणसेवकांना आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने संसाराचा गाडा चालवणे अवघड होत आहे.

राज्यातील विविध विभागातीलइतर शासकिय भरती प्रमाणे नियुक्तीनंतर मुळ वेतनाप्रमाणे आमचे वेतन काढले पाहिजे. अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. राज्यात कार्यरत असणाऱ्या शिक्षण सेवक ग्राम सेवक कृषी सेवक एप्रिल २०२५ पासून मानधनपद सरकारने आता रद्द करावेत.

नियुक्ती पासून फक्त एक वर्षाचा (प्रोबेशन) परिविक्षीदन कालावधी ठेवावा. याकालावधीत नियमित कर्मचारी प्रमाणे पूर्ण पगार व सेवानिवृत्ती लाभ मिळावा. ती सेवा निवृत्ती वेतनासाठी ग्राह्य धरण्यात यावी. अशी मागणी यावेळी करण्यात आली आहे. दरम्यान, शिक्षणसेवक, ग्रामसेवक कृषीसेवक ऐवजी (प्रशिक्षणार्थी शिक्षक -ग्रामविकास अधिकारी- कृषीविकास अधिकारी) हे शब्द वापरावेत, प्रशिक्षणार्थी सेवक कालावधी फक्त एक वर्षाचा करावा. सेवा निवृत्ती वेतनासाठी ग्राह्य धरण्यात यावी. या कालावधीत दरवर्षी वेतन वाढ लक्षात घेऊन वेतन श्रेणी नुसारच्या ७० टक्के मूळ वेतन द्यावे.असेही यावेळी सांगण्यात आले आहे. राज्यातील कृषीसेवक ग्रामसेवक व शिक्षणसेवक निवड झालेल्या उमेदवारांना तीन वर्षे कार्यकाळात १६ हजार मानधनावर काम करावे लागत आहे.एखाद्या कर्मचारी कडून चूक झाली तर तीन वर्षाच्या मानधनाच्या कार्यकाळात त्यांना कायमस्वरूपी नोकरीवरून काढण्याची शक्यता असल्यामुळे एक प्रकारे मानधनवर तुटकुंजा मानधनावर संसाराची गाडा चालवणे आणि वर तीन वर्षाच्या कार्यकाळामध्ये चांगल्या पद्धतीने सेवा बजावणे आणि आपली नोकरी वाचवणे याही गोष्टीचा परिणाम या सेवकावर होत आहे.

शासनाच्या विविध विभागातील परीक्षा हे वेळेवर होत नाहीत झाली तरी नियुक्ती रखडली जात आहे. त्यामुळे उमेदवारांचे वय वाढले आहे. सद्य परिस्थितीत सरासरी सर्वच सेवकांचे वय ३५ ते ३८ वय असल्यामुळे शासकिय सेवा त्यांना कमी कालावधीच्या मिळाल्या आहे. त्यात ही तीन वर्षाचा मानधन कालावधी असल्यामुळे एक प्रकारे वाढत्या वयाबरोबर मानधन कालावधी कमी झाल्यामुळे मानसिक ताणतणाव वाढला आहे. त्याचबरोबर आर्थिक परिस्थितीलाही सामोरे जावे लागत आहे. राज्यातील भरती वेळेवर होत नसल्यामुळे उमेदवारांनी ज्या ठिकाणी पदे जास्त असतील अशा जिल्ह्यातीलही फॉर्म भरून परीक्षा दिली. त्याची नियुक्ती झाली परंतु स्वतःचा जिल्हा सोडून इतर जिल्ह्यात जीवन जगत असताना मुलाबाळांच्या शिक्षणाचा खर्च संसाराचा खर्च याचा ताळमेळ करता करता येत नाही. अशी व्यथा मांडण्यात येत आहे.

**सन २०20-२०२४ याकाळातील ग्रामसेवक, कृषीसेवक व शिक्षण सेवक, त्यांचे पदे**

**▸▸ग्रामसेवक**
सरळसेवा परीक्षा पदभरती- २१००
अनुकंपा तत्वावर भरती पद-२७०
एकूण पदे- २३७०

**▸▸कृषीसेवक**
सरळसेवा परीक्षा पदभरती -१८००
अनुकंपा तत्त्वावर भरती-१६६
एकूण-१९३६

**▸▸शिक्षणसेवक**
सरळसेवा परीक्षा पदभरती-२५०००
अनुकंपा तत्वावर भरती-१०९
अल्पसंख्यांक व अल्पभाषिक संस्थेत भरती -५०००
एकूण शिक्षणसेवक पद-३१०००

**सोलापूर जिल्ह्यात ग्रामसेवक, कृषी सेवक, शिक्षण सेवकांची पदे, कृषीसेवक सरळसेवा व अनुकंपामार्फत**
**▸▸पदभरती - ६७**
ग्रामसेवक सरळसेवा व अनुकंपामार्फत पदभरती - ८७
शिक्षण सेवक सरळ सेवा अनुकंपा व अल्पभाषिक अल्पसंख्यांक संस्थेच्या माध्यमातून भरती - ७६०

**शासनाने आमच्या वयाचं आणि पुढील सेवेचा विचार करून मानधन कालावधी रद्द करावा**

आज आम्ही वर्षानुवर्षी अभ्यास करून सर्व शिक्षक पात्रता परीक्षा सिद्ध करून सुद्धा वयाच्या ३०-३५ ला नोकरी लागल्यावर पुढे तीन वर्ष अजून आम्हाला मानधनावर काम करत लागत असल्यामुळे आर्थिक व मानसिक परिस्थिती ठासळत आहे. दुसऱ्या जिल्ह्यातून येऊन सुद्धा आम्हाला सोलापूर जिल्ह्यात १६ हजारावर संसाराचा गाडा चालवणे मुलांचे शिक्षण यासाठी काट्याची कसरत करावी लागत आहे. शासनाने आमच्या वयाचं पुढील सेवेचे विचार करून मानधन कालावधी रद्द करावे. आम्हाला मूळ वेतनावर समवून घ्यावे.

**-रविना राठोड, शिक्षणसेविका**

**महागाईच्या काळात जीवन जगणे अवघड होतेय**

मी मुळ धारशिव जिल्ह्यांतील असून माझी निवड रायगड जिल्ह्यात झाली आहे. सरळसेवा परीक्षा उत्तीर्ण होऊन परत ३ वर्षे मानधनावर काम करत आहे. महागाईच्या काळात जीवन जगणे अवघड होत चालले आहे. आमची आर्थिक परिस्थिती बेताची होत असल्यामुळे यांचा गंभीर्य विचार करून मुळवेतनावर घ्यावी अशी मागणी आहे. आम्हाला न्याय द्यावी.

**- प्रतिक्षा गाडवे-जाधव, ग्रामसेविका**

**मूळ वेतनावर नियुक्ती न झाल्यामुळे आर्थिक संकटांना समोर जावे लागते**

एक तर अनेक वर्षे परीक्षा होत नाहीत उमेदवरांचे वय वाढला आहे. सर्व परीक्षा पात्रता उत्तीर्ण होऊन सुद्ध ३ वर्षे मानधनावरचं काम करावे लागत आहे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार राज्यात शिक्षणसेवक पद रद्द करावी अशी स्पष्ट आदेश असताना सुद्धा शिक्षणसेवकांना मानधनावर काम करावे लागत आहे. त्याचप्रमाणे कृषी सेवक ग्रामसेवकांना सुद्धा मानधना संदर्भात काही तरतुदी नसताना सुद्धा सेवक म्हणून काम करावं लागत आहे. शासनाच्या विविध विभागातील पदभरतीनुसार त्यांना मूळ वेतनावर त्यांचे नियुक्ती होती परंतु, या तीनच विभागात मूळवेतनावर नियुक्ती न झाल्यामुळे आर्थिक संकटांना समोर जावे लागत आहे. राज्यातील ३५ ते ४० हजार कर्मचाऱ्यांचा विचार करून शासनाने मानधन कलावधी रद्द करावे.

**- प्रशांत शिरगुर,**
**राज्य उपाध्यक्ष, स्पर्धा परीक्षा विद्यार्थी असोसिएशन तथा ग्रासेवक, कृषीसेवक, शिक्षणसेवक कृती समिती**

॥ जो जे वांछिल तो ते लाहो ॥
मनोरमा परिवार अंतर्गत
अंकुर सर्व व्यावसायिक नागरी सह. पतसंस्था मर्या., सोलापूर
विमल कॉम्प्लेक्स, माशाळ वस्ती, विजापूर रोड, सोलापूर
ग्राहकांच्या आग्रहास्तव खास ठेव योजना
९० दिवसांसाठी ९.००% व्याजदर
६० दिवसांसाठी ८.००% व्याजदर
९१ महिन्यात दामदुप्पट ठेव योजना
अधिक महितीसाठी संपर्क
श्री. राचण्णा माळसिध्दप्पा कटारे, व्हा. चेअरमन (मो. ९४२१०७५४९८)
प्राची अनिल गोसावी, व्यवस्थापिका (मो. ७०५८९५५९८०)

## मुंबई उच्च न्यायालयाकडून हद्दपारीचा आदेश रद्द

- पोलिसांना हद्दपारीवर ट्रेनिंग देण्याची गरज
- याचिकेच्या सुनावणीवेळी उच्च न्यायालयाची टिप्पणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी -**

सोलापूर ग्रामीण पोलिसांनी दिलेला हद्दपारीचा आदेश उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती आर एन लड्डा यांनी रद्द केला. मुंबई उच्च न्यायालयाने रोहित ऊर्फ अण्णासाहेब विठोबा आसबे आणि तानाजी विठोबा आसबे यांच्यावरील सोलापूर पोलीस अधिक्षकांचे हद्दपारीचा आदेश न्यायमूर्ती आर. एन. लड्डा यांच्या एकल खंडपीठाने निर्णय दिला.

यात हकीकत अशी की, हद्दपार प्राधिकरण तथा तत्कालीन पोलीस अधीक्षक सरदेशपांडे यांनी दोन्ही याचिकाकर्ते हे सराईत गुन्हेगार आहेत, तसेच कलम ३७९ गुन्हात शिक्षा लागलेली आहे, त्यांच्यामुळे समाजात भीतीची वातावरण निर्माण झाली आहेत म्हणून १४ ऑगस्ट २०२४ रोजी सोलापूर शहर आणि जिल्ह्यातून हद्दपार केले होते.

त्यावर आसबे यांनी पुणे येथे विभागीय आयुक्तांकडे अपील दाखल केले होते, परंतु पुणे येथील विभागीय आयुक्त यांनी सदरचे अपीलामध्ये तथ्य नाही म्हणून अपील फेटाळले होते. त्यामुळे आसबे यांनी मुंबई उच्च न्यायालयात ॲड. मंजुनाथ कक्कळमेली यांचे मार्फत दाद मागितली होती.

त्यावर सुनावणी दरम्यान युक्तिवाद करताना, ऍड कक्कळमेली यांनी याचिकाकर्ते यांच्या विरोधात ७ गुन्हे प्रलंबित असेल तरी ते फक्त एका पोलीस स्टेशन मधले आहेत व कलम ३७९ खाली शिक्षा झाली असेल त्यास स्टे आहे. त्यामुळे सोलापूर पोलीस अधीक्षक पोलीस अधिनियम नुसार सोलापूर शहर हद्दपार करू शकत नाहीत. सदरचे गुन्हे हे जीवितास हानी पोचवणारे नाहीत. एकूण ७ गुन्हे प्रलंबित असेल तरी त्यांना तडीपार करणेस कुठलेही कारण त्या गुन्हेमुळे बनलेले नाही, शो कॉज नोटीस ही पूर्णतः बेकायदेशीर व अन्यायकारक आहे असा युक्तीवाद केला. त्यावर न्यायमूर्ती आर. एन. लड्डा यांनी विभागीय आयुक्तांचे आदेश तथा सोलापूर पोलीस अधिक्षांचे आदेश रद्द बातल ठरविले.

यावेळी सुनावणी दरम्यान याचिककर्त्यांच्या नोटीसवर टिप्पणी करताना न्यायमूर्ती आर. एन. लड्डा यांनी ''पोलिसांना हद्दपारी वरती ट्रेनिंग देण्याची गरज'' असे तोंडी निरीक्षण नोंदविले असल्याचे ॲड. कक्कलमेली यांनी सांगितले.यात सरकारकडून ॲड. योगेश दाबके यांनी तर याचिककर्ते कडून ॲड. मंजुनाथ कक्कळमेली यांनी काम पाहिले. यावेळी मंगळवेढा पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक विजय पिसे हजर होते.

## शुध्द आचरणाने जीवनात गोडवा वाढवा : प्रा. पठाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**



संत रामदास स्वामी यांनी रचलेले मनाचे श्लोक मानवी मनाला मार्गदर्शन करतात. त्यानुसार प्रत्येकाने वृत्तीच्या संक्रमणाद्वारे चांगले बोलणे अन् आचरणातून जीवनात गोडवा वाढवावा, असे आवाहन संत साहित्यिक प्राचार्या डॉ.नसीमा पठाण यांनी केले.

येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेच्या महिला शाखेच्या वतीने दत्त चौकातील संस्थेच्या समर्थ सभागृहात हळदी कुंकू व तिळगुळ समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ.पठाण यांचे 'संक्रांति सणाचे महत्व' या विषयावर व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी महिला शाखेच्या अध्यक्षा हेमा चिंचोळकर होत्या. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर, उपाध्यक्ष विजय कुलकर्णी, कार्यवाह श्याम जोशी, खजिनदार सतीश पाटील, ॲड. मंगला जोशी, अलका काकडे, ॲड. स्वाती कुरनुरकर, माजी अध्यक्षा कौमुदी देशमुख, चारुताई बेंबळकर, मीरा धामणगांवकर, अश्विनी जोशी, विदुला कुलकर्णी, मंजू पवार, वर्षा अतनुरे, प्रमिला तुपलवंडे, ॲड. करिमुन्निसा बागवान, सुमन जाधव, यांच्यासह युवक शाखाध्यक्ष सुशांत कुलकर्णी, रविंद्र तुळजापूरकर, रविंद्र नाशिककर, श्रीकांत कुलकर्णी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात समर्थ रामदास स्वामींच्या प्रतिमा पूजनासह प्रा. मधुरा वडापुरकर, व स्मिता देशपांडे यांच्या गीत गायनाने झाली. डॉ. येळेगावकर यांनी संस्थेच्या उपक्रमांची माहिती दिली. कार्यवाह डॉ. नभा काकडे यांनी प्रास्ताविक केले.

## शहरात सार्वजनिक ठिकाणी थुंकणाऱ्या ७६ जणांवर दंडात्मक कारवाई

**पान दुकान, हॉटेल चालकांसह नागरिकांकडून ९,४०० रुपयांचा दंड वसूल**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

शहरात विविध भागांमध्ये मावा, गुटखा, पान-तंबाखू खाऊन थुंकणाऱ्या नागरिकांवरील दंडात्मक कारवाईची मोहीम सुरू आहे. विशेष मोहिमेत शनिवारी शहरातील विविध भागांमध्ये थुंकणाऱ्या ७६ जणांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. पान टपऱ्या आणि चहा हॉटेल्स मालकांवर कारवाई करण्यात आली.

अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका घनकचरा व्यवस्थापन विभाग मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, अनिल चराटे यांच्या नियंत्रणाखाली आरोग्य निरीक्षक यांच्यासह कर्मचाऱ्यांच्या विशेष पथकाद्वारे ही शनिवारी पथकाने पान टपरी परिसर आणि विविध भागांमध्ये कारवाई केली. या कालावधीत ७६ जणांवर कारवाई करतानाच त्यांच्याकडून ९ हजार ४०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. ही कारवाई खडक गल्ली, अरविंद धाम, जुना पुना नाका, निराळे वस्ती, वसंत विहार, अवंती नगर, छत्रपती संभाजी चौक, लक्ष्मी लाँड्री, विडी घरकुल, मड्डी वस्ती, शेळगी, हैदराबाद रोड, अक्कलकोट रोड, गांधीनगर, बोरामणी नाका, दयानंद कॉलेज, जोडभावी पेठ, गुरुवार पेठ, मार्केट यार्ड, पद्मा नगर, चिप्पा मार्केट, अशोक चौक, नीलम नगर, सैफुल, विजापूर रोड, जुळे सोलापूर, सहारा नगर, मरीआई चौक, दमाणी नगर, विजापूर वेस, किडवाई चौक, सिद्धेश्वर पेठ, तेलंगी पाच्छा पेठ, कुंभार वेस, मोदी, दाजी पेठ सात रस्ता, मौलाली चौकासह विविध भागांमध्ये कारवाई करण्यात आली.

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

सोलापूर शहरातील तमाम लोकांस विशेषतः कोंडी, ता. उत्तर सोलापूर येथील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :**

(अ) डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर मौजे कोंडी येथील मिळकत यांसी गट नं.५८/२पै/पुर्वेकडील /गुरुनाथलगत यांसी क्षेत्र ०.०३.०० आर. यांसी आकार रू.०.०६ पैसे.

(ब) डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर मौजे कोंडी येथील मिळकत यांसी गट नं.६३/२बपैकी/१ पैकी पूर्वेची जागा यांसी क्षेत्र ३०.३२.८४ आर. यांसी आकार रू.६०.६६ पैसे.

वर नमूद दोन्ही मिळकती या निखील रविंद्रनाथ नरोटे व वैभव रविंद्रनाथ नरोटे यांचे मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीचे आहे. त्यांचे वैयक्तिक कारणाकरीता सदर दोन्ही मिळकती त्यांनी आमचे अशिलांना कायम खुषखरेदी देण्याचे ठरवुन इसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व निर्वाळा सदरहू मिळकत मालकांनी आमच्या अशिलांना दिला आहे. तसेच लवकरच खरेदीखताचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करणार आहेत.

तरी वर नमूद मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, बोजा, टाच, तारण गहाण, दान, लिज, वहिवाट, पोटगी, भाडेपट्टा, साठेखत, खरेदीखत, कोर्ट केसेस, इजमेंट राईट, बँकेचा बोजा, हितसंबध व इतर कोणतेही व्यवहार असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ८ दिवसाच्या आत कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचीही तक्रार व हरकत न आल्यास आमचे अशिल सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याचे ग्राह्य धरून सदर मिळकतीसंबधी खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मुदतीनंतर येणारी कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार व हरकत ही आमचे अशिलावर आणि त्यांनी घेतलेल्या मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली ता.०८/०२/२०२५

**सही/-**
**ॲड. अमीर आर. बागबान,**
**बी.ए. एलएल.बी, एलएल.एम.**
**रा. ४१२/१०, लक्ष्मी नगर, लिमयेवाडी,**
**सोलापूर, मो.नं.७६२०००३५२३**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः ता. बार्शी पैकी मौजे पानगांव येथील तसेच आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि.सोलापूर सब डि.व ता.बाशी पैकी मौजे पानगांव हद्दीतील गट नं. ६१७ याचे क्षेत्र याचे एकूण क्षेत्र २ हे.०२ आर आकार ५ रु.७५ पैसे यापैकी पश्चिम बाजुचे क्षेत्र० हे.४० आर आकार १ रु.१४ पैसे यासी चतुःसिमा पुर्वेस सदर गट नंबरपैकी उर्वरित जमीन, दक्षिणेस-सदर गट नंबरपैकी प्रमोद जंगलु काळे यांची जमीन, पश्चिमेस ग.नं.१३८ व उत्तरेस गाडीवाट येणेप्रमाणे जमीन अशी जागा आतील तदंगभूत वस्तुसह.

सदर मिळकत ही निलेश बाळासाहेब घायतिडक यांचे खरेदी मालकी कबजे वहिवाटीची व ७/१२ हवकपत्रकी नोंद असलेली अशी मिळकत असून सदर मिळकत त्यांनी त्यांचे कायदेशीर गरजेसाठी विक्रीस काढून ती आमचे खरेदीदार अशिलास कायम खुष खरेदी देणेचे ठरवले व उभयतांनी सदर मिळकतीची बाजारभावाने किंमत ठरवून व ती मान्य केली व सदर व्यवहाराचा भाग म्हणून आमचे अशिलाकडून इसाराची रक्कम स्विकारलेली आहे. तसेच बाजुही ठरलेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत असलेचा निर्वाळा विद्यमान मालकानी आमचे अशिलास दिलेला आहे.

सबब या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, याउपरही वर नमूद मिळकती संबंधाने जर कोणाचे कांही गहाण, दान, लिज, बोजा, टाच, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र वा तत्सम स्वरुपाचे कोणतेही हस्तांतर वा कर्जबोजाचे हक्क वा वहिवाटीचे हक्क अगर तत्सम कोणत्याही स्वरुपाचे हक्कअधिकार असतील तर संबंधीतानी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून १५ दिवसाचे आत आमचे खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी येवून आमची खात्री करुन द्यावी मुदतीत कोणाचीही हरकत आली नाही तर सदर मिळकत ही खरेदीयोग्य आहे असे समजून आमचे अशिल पुढील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणाचीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. ता. ०८/०२/२०२५

**सही/-**
**श्री. काकासाहेब दत्तु गुंड, ॲडव्होकेट**
**ऑ. गाळा नं. ४ छत्रपती शिवाजी महाराज शॉपींग सेंटर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर**
**मो.नं. ९८२२९९९०३८ ९५१८५८०५९०**
**(अशिलातर्फे ॲडव्होकेट)**

**सावधानतेची जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः मौजे लक्ष्याचीवाडी, ता. बार्शी येथील व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने आमचे खालील सही करणारे पक्षकार कळवू इच्छितात की,

डि.सोलापूर सबडि.व ता. बार्शी पैकी मौजे लक्ष्याचीवाडी येथील शेतजमीन ग.नं. ४२/२ याचे संपूर्ण क्षेत्र ०१ हे.०० आर, आकार ०१ रु.३८ पैसे आहे यासी चतुःसिमा पुर्वेस गट नं. ४२/२, दक्षिणेस- ग.नं.३५, पश्चिमेस ग.नं. ४२/३ व उत्तरेस- ग.नं. २८ आहे येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक संपूर्ण गटाची शेतजमीन यामध्ये एक चालु पाण्याची विहीर व आतील तदंगभूत वस्तुसह.

वर नमूद मिळकत ही प्रताप भुजाबा लोखंडे यांचे मालकी कबजे वहिवाटीची व ७/१२ हक्कपत्रकी नोंद असलेली मिळकत आहे सदर मिळकतीचे ७/१२ हक्कपत्रकी भोगवटदार २ अशी नोंद आहे. सदर मिळकत प्रताप भुजाबा लोखंडे यांनी त्यांचे कायदेशीर गरजेपोटी, बँकेचे कर्ज बेबाक करणेकरीता विक्रीस काढून ती आमचे खरेदीदार अशिलासोबत विक्रीचा व्यवहार ठरवून आमचे अशिलाकडून इसारादाखल रक्कम स्विकारुन इसारपावतीचा दस्त लिहून तो नोटरी अधिकारी बार्शी यांचेसमोर नोंदवून दिलेला आहे. सदर मिळकत ही भोगवटदार २ ची असलेने खरेदीखतास सक्षम महसूल अधिकारी यांची पुर्वपरवानगी असणे आवश्यक असलेने सदरील परवानगी आणलेनंतर खरेदीखत नोंदवणेचे ठरलेले आहे.

असे असताना सदर प्रताप भुजाबा लोखंडे हे आमचे अशिलाबरोबरचा व्यवहार इतराशी करण्याची शक्यता असलेने आमचे अशिलाचे हक्काबाबत सर्वत्रास माहिती होणे गरजेचे आहे सबब वर नमूद मिळकतीसंबंधाने सदर प्रताप भुजाबा लोखंडे रा. बार्शी यांचेशी कोणीही कसलाही हस्तांतर, कर्ज बोजा, खाजगी सावकारी, बटई, गहाण, तारण, साठेखत, बक्षिसपत्र अगर तत्सम स्वरुपाचा व्यवहार करु नये याउपर कोणी दस्त वा व्यवहार केलेस तो आमचे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही, संबंधीतावर आमचे पक्षकार जरुर ती कायदेशीर कारवाई करतील, याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होवू नये व आमचे अशिलाचे कायदेशीर हक्काची सर्वत्रास जाणीव करुन द्यावी म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. ता. ८/०२/२०२५.

**सही/-**
**ॲड. संजय प्रल्हादराव कोकाटे**
**अति. जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी**
**ता. बार्शी, जि. सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# भारताचे मालिका विजयाचे लक्ष्य

## रोहित शर्माच्या फॉर्मची चिंता अन् कोहलीच्या पुनरागमनाची आशा



◆ **कटक, ८ फेब्रुवारी**

रविवारी येथील बारबती स्टेडियमवर भारत आणि इंग्लंड यांच्यादरम्यान दुसरा एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना खेळला जाणार आहे. या सामन्यातील विजयासह तीन सामन्यांची वन-डे मालिका जिंकण्याचे भारताचे लक्ष्य आहे, मात्र कर्णधार रोहित शर्माचा वाईट फॉर्म व विराट कोहलीच्या संभाव्य पुनरागमन संघ व्यवस्थापनासाठी डोकेदुखी ठरत आहे. हीच बाब रविवारी इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारताच्या मालिका विजयाच्या प्रयत्नात मोठा अडथळा ठरू शकतात.

व्हीसीए जामठा, नागपूर येथे सलामीच्या सामन्यात ४ गड्यांनी विजय नोंदवून भारताने मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे, परंतु पहिल्या सामन्यात कर्णधार रोहित शर्मा केवळ दोन धावा काढून बाद झाला, त्यामुळे त्याच्या फॉर्मबद्दल तसेच कोहलीला उजव्या गुडघ्याच्या दुखापतीमुळे विश्रांती देण्यात आली होती, त्यामुळे त्याच्या तंदुरुस्तीबद्दल चिंता निर्माण झाली होती.

तथापि, कोहली दुसऱ्या सामन्यासाठी परत येऊ शकतो, असे संकेत उपकर्णधार शुभमन गिलने दिले होते. मात्र संघ निवडीच्या बाबतीत हे अडचणीचे ठरत आहे.

गत वन-डे सामन्यात ऐनवेळी दुखापत झाल्यामुळे कोहलीच्या जागी श्रेयस अय्यरला स्थान देण्यात आले होते. या संधीचे सोने करत श्रेयसने ३६ चेंडूंत ५९ धावांचे योगदान दिले होते, त्यामुळे त्याला वगळणे जवळजवळ अशक्य झाले आहे.

जर मागील नियमांचे पालन केले तर कोहली श्रेयसची जागा घेईल, परंतु यशस्वी जयस्वाल हा फलंदाजीचा आयकॉन असू शकतो अशी शक्यता जास्त आहे.

याचा अर्थ असा की गिल पुन्हा रोहितसोबत पहिल्या फळीत येऊ शकतो. यशस्वी जयस्वालनेही नागपूरमध्ये पदार्पणात चांगली कामगिरी केली होती.

डाव्या-उजव्या हाताच्या फलंदाजांच्या जोडीची आवड असलेल्या गौतम गंभीरच्या नेतृत्वाखालील संघ व्यवस्थापन या परिस्थितीत कसा मार्ग काढतो हे बघणे शिल्लक आहे.

संघ बांधणीचा मुद्दा बाजूला ठेवला, तर कोहलीला सुद्धा धावांची गरज आहे व जर तो खरोखरच पुनरागमन करेल तर त्याला येथे चांगली कामगिरी करावी लागेल.

एकदिवसीय क्रिकेट हा कोहलीचा मुख्य प्रकार आहे. सचिन तेंडुलकर (१८,४२६) व संगकारा (१४,२३४) नंतर या स्वरूपात १४,००० धावा पूर्ण करणारा तिसरा फलंदाज होण्यासाठी ३६ वर्षीय कोहलीला केवळ ९४ धावांची आवश्यकता आहे.

२८३ एकदिवसीय डाव खेळल्यानंतर, कोहली तेंडुलकर (३५० डाव) व संगकारा (३७८) यांच्यापुढे हा टप्पा गाठणारा सर्वात जलद फलंदाज होऊ शकतो.

**रोहितची कमकुवत धावसंख्या**

रोहित पहिल्या एकदिवसीय सामन्यात केवळ २ धावा काढून बाद झाला, पण ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी मालिकेतील दुर्दैवी धावसंख्या तो दूर करू शकला नाही. गत वर्षी ऑगस्टमध्ये कोलंबोमध्ये श्रीलंकेविरुद्ध तिसऱ्या सामन्यात ६४ धावा केल्यापासून मुंबईच्या रोहित शर्माने कोणत्याही स्वरूपात अर्धशतक केले नाही.

जर रोहित इंग्लंडविरुद्धच्या या दोन वन-डे सामन्यांमध्ये चांगली कामगिरी करू शकला नाही, तर त्याच्या फॉर्म व भविष्याबद्दल गंभीर चिंता निर्माण होऊ शकते.

**गोलंदाजीचे आक्रमण स्थिर**

भारताच्या गोलंदाजीचे आक्रमण स्थिरावलेले दिसत आहे. तंदुरुस्त झालेला वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी आपल्या आंतरराष्ट्रीय पुनरागमनानंतर हळूहळू स्थिरावत आहे. शमीने नागपूरमध्ये ८ षटकांत ३८ धावांत एका बळी टिपला. वेगवान गोलंदाज हर्षित राणाने फिल सॉल्ट, बेन डकेट आणि हॅरी ब्रुकला बाद करून सामन्याचा कल भारताच्या बाजूने वळवला. आघाडीचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह याच्या तंदुरुस्तीची चिंता कायम आहे.

**इंग्लंडसाठी 'करा अथवा मरा' स्थिती**

जोस बटलरच्या नेतृत्वाखालील इंग्लंड संघासाठी हा 'करा अथवा मरा' या उक्तीप्रमाणे सामना असेल. त्यामुळे इंग्लंडचा संघ आपल्या आक्रमक दृष्टिकोनात बदल करून अधिक समंजसपणे फलंदाजी करण्याचा प्रयत्न करू शकतात. इंग्लंडचे यश हे भारताच्या दर्जेदार फिरकी गोलंदाजांविरुद्ध त्यांच्या आक्रमक स्वरूपावर अवलंबून असेल. ◀(वृत्तसंस्था)

### भारत-इंग्लंड दुसररा वन-डे सामना

**स्थळ** : बारबती स्टेडियम, कटक
**वेळ** : दुपारी १:३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर



ओडिशातील पुरी येथील जगन्नाथ मंदिरात शनिवारी दर्शनासाठी आलेले भारतीय क्रिकेटपटू (डावीकडून) अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर आणि वरुण चक्रवर्ती. कटकमधील बाराबती स्टेडियमवर भारत इंग्लंडविरुद्ध दुसरा एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना खेळणार आहे

# भारताला हरवणे पाकिस्तानचे खरे काम : शाहबाज शरीफ

◆ **लाहोर, ८ फेब्रुवारी**

पाकिस्तानचे खरे काम केवळ आयसीसी चॅम्पियन्स चषक जिंकणेच नाही तर २३ फेब्रुवारी रोजी दुबईमध्ये पारंपरिक प्रतिस्पर्धी भारताला हरवणे आहे, असे प्रतिपादन पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी केले.

नूतनीकरण केलेल्या गद्दाफी स्टेडियमच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते.

पाकिस्तानच्या खेळाडूंनी भारताविरुद्ध आपले शानदार प्रदर्शन केले पाहिजे. आपल्याकडे खूप चांगला संघ आहे आणि त्यांनी अलिकडच्या काळात चांगली कामगिरी केली आहे, परंतु आता खरे काम म्हणजे केवळ चॅम्पियन्स चषक जिंकणेच नाही तर दुबईमध्ये होणाऱ्या आगामी अंतिम सामन्यात आपल्या पारंपरिक प्रतिस्पर्धी भारतालाही हरवणे आहे. संपूर्ण देश आपल्या क्रिकेट संघाच्या मागे उभा आहे, असेही शरीफ म्हणाले.

पाकिस्तान व भारताला क्रिकेटचा इतिहास आहे आणि साधारणपणे भारतीय संघाने नव्वदच्या दशकापासून आयसीसी स्पर्धांमध्ये आघाडी घेतली आहे.

पाकिस्तानने आयसीसी स्पर्धेत भारताविरुद्ध शेवटचा विजय २०२१ मध्ये नोंदवला होता. तेव्हा पाकिस्तानने दुबईमध्ये टी-२० विश्वचषक जिंकला होता.

भारताने चॅम्पियन्स चषकासाठी आपला संघ पाकिस्तानला पाठवण्यास नकार दिल्यामुळे आता भारताचे सामने दुबई खेळविले जाणार आहे. जवळजवळ २९ वर्षांनंतर आम्ही आयसीसीचा मोठा कार्यक्रम आयोजित करत आहोत, ही पाकिस्तानसाठी एक मोठी संधी आहे, असे शरीफ म्हणाले.

गद्दाफी स्टेडियमचे नूतनीकरण केवळ ११७ दिवसांत पूर्ण झाल्याबद्दल या समारंभात आनंद साजरा करण्यात आला. ◀(वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### सेहवाग, मिताली राज आज बुलढाण्यात



वीरेंद्र सेहवाग मिताली राज

**बुलढाणा** : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त धर्मवीर आमदार चषक आयोजित करण्यात आला आहे. या क्रिकेट स्पर्धेच्या अंतिमपूर्व व अंतिम सामन्यासाठी तसेच जिजामाता लॉन व प्रेक्षक गॅलरीत दिवस-रात्र उंच पथदिव्याचे भूमिपूजन सोहळ्यासाठी भारताचा माजी सलामीवीर फलंदाज वीरेंद्र सेहवाग व महिला क्रिकेट संघाची माजी कर्णधार मिताली राज येणार आहे. रविवार, ९ फेब्रुवारीला दुपारी १.३० वाजता जिजामाता क्रीडा व व्यापारी संकुलाच्या मैदानावर हा सोहळा होणार आहे. सोबतच आमदार संजय गायकवाड, युवा सेनाप्रमुख मृत्युंजय गायकवाड यांचीही उपस्थिती राहणार आहे. सोहळ्याला क्रिकेटप्रेमी नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन धर्मवीर आमदार चषक संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

### दिल्ली ओपनसाठी शशिकुमार रामनाथन, करणला वाईल्ड कार्ड

**नवी दिल्ली** : माजी जागतिक क्रमवारीत ३१ व्या स्थानावर असलेला लॉयड हॅरिस आणि २०१९ चा विम्बल्डन बॉईज सिंगल्स चॅम्पियन शिंतारो मोचीझुकी हे २०२५ दिल्ली ओपन टेनिस स्पर्धेत अव्वल ८ मानांकित खेळाडूंमध्ये असतील. ही एटीपी चॅलेंजर ७५ टेनिस स्पर्धा १० ते फेब्रुवारी दरम्यान डीएलटीए कॉम्प्लेक्स येथे होणार असून ही स्पर्धेची पाचवी आवृत्ती आहे. भारताचे मुकुंद शशिकुमार, रामकुमार रामनाथन आणि करण सिंग यांना टोगोविरुद्धच्या ४-० डेव्हिस चषक जागतिक गट एक प्लेऑफ विजयात देशाच्या कामगिरीनंतर वाईल्ड कार्ड मिळाले आहेत. हार्ड-कोर्ट टेनिस स्पर्धेत ३२ खेळाडूंचा स्पर्धात्मक एकेरी ड्रॉ असेल, यात २१ थेट प्रवेशिका, तीन वाईल्ड कार्ड आणि दोन विशेष सवलती असतील. मुकुंद, रामकुमार व करण घरच्या चाहत्यांसमोर डीएलटीए सेंटर कोर्टवर आपल्या विजयाची मालिका वाढवण्यास उत्सुक असतील. दक्षिण आफ्रिकेचा हॅरिस मुख्य ड्रॉमध्ये चौथा मानांकित असेल झेक प्रजासत्ताकचा विट कोप्रीवा अव्वल मानांकित म्हणून ड्रॉमध्ये आघाडीवर असेल.

### महाराष्ट्र पुरुष हॉकी संघाच्या बाद फेरीच्या आशा कायम

**डेहराडून** : अटीतटीत खेळल्या गेलेल्या सामन्यात महाराष्ट्राने यजमान उत्तराखंड संघावर २-१ अशी मात केली आणि ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत हॉकीमध्ये पुरुषांच्या गटात बाद फेरीच्या अशा कायम राखल्या. ऑलिम्पिकपटू व कर्णधार देवेंद्र वाल्मिकी याने दोन गोल करीत महाराष्ट्राच्या विजयात सिंहाचा वाटा उचलला. वाल्मिकी याने चौदाव्या मिनिटाला पेनॉल्टी कॉर्नर द्वारा गोल करीत महाराष्ट्राचे खाते उघडले. या गोलच्या जोरावर महाराष्ट्राने पहिल्या पंधरा मिनिटाच्या डावात आघाडी घेतली होती. पाठोपाठ दोन मिनिटांनी महाराष्ट्राने आणखी एक गोल करीत आपली बाजू बळकट केली. हा गोल वाल्मिकी याने पेनॉल्टी कॉर्नरचा फायदा उचलत नोंदविला. उत्तराखंड संघाने एक गोल केला. त्यांनी या सामन्यात बरोबरी साधण्यासाठी अनेक प्रयत्न केले परंतु महाराष्ट्राच्या बचाव फळीने त्यांचे हे प्रयत्न असफल ठरविले. साखळी गटात महाराष्ट्राने दोन सामने जिंकले असून एक सामना बरोबरीत सोडविला आहे. त्यांना शेवटच्या लढतीत हरियाणाविरुद्ध झुंजावे लागणार आहे. या लढतीवरच महाराष्ट्राच्या बाद फेरीच्या संधी अवलंबून आहेत.

### लॉकी फर्ग्युसन चॅम्पियन्स चषकाला मुकण्याची शक्यता

**दुबई** : पाकिस्तानविरुद्ध चॅम्पियन्स चषकाच्या पहिल्या सामन्याला अवघे ११ दिवस शिल्लक असताना न्यूझीलंडचा आघाडीचा वेगवान गोलंदाज लॉकी फर्ग्युसन दुखापतग्रस्त झाला. युएईमध्ये झालेल्या आयएल टी-२० सामन्यादरम्यान फर्ग्युसनच्या पायाला दुखापत झाली. त्यामुळे आता त्याच्या आयसीसी चॅम्पियन्स चषकात खेळण्याबाबत संशय व्यक्त करण्यात येत आहे.

### सराफा

| | |
|---|---|
| **सोने** (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | ८६,६७० रु. |
| **चांदी** (प्रतिकिलो) | ९९,५०० रु. |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| अकोला | ३५.० | १८.२ |
| अमरावती | ३२.४ | १५.५ |
| भंडारा | ३१.६ | १५.० |
| बुलडाणा | ३४.० | १७.८ |
| चंद्रपूर | ३२.८ | -.- |
| गडचिरोली | ३३.२ | १५.० |
| गोंदिया | ३०.६ | १६.८ |
| नागपूर | ३२.४ | १६.३ |
| वर्धा | ३२.० | १७.० |
| वाशीम | ३४.६ | २१.० |

# करुण नायर नाबाद १००

### रणजी करंडक : उपांत्यपूर्व सामना

### विदर्भ पहिला डाव ६ बाद २६४




◆ **नागपूर, ८ फेब्रुवारी**

प्रतिष्ठेच्या रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत कळमनाच्या व्हीसीए मैदानावर शनिवारपासून प्रारंभ झालेल्या तामिळनाडूविरुद्धच्या पाचदिवसीय उपांत्यपूर्व सामन्यात पहिल्या दिवशी करुण नायरने झळकावलेल्या नाबाद शतकाच्या बळावर विदर्भने पहिल्या डावात ८९ षटकांत ६ बाद २६४ धावा उभारल्या.

विदर्भ संघाचा कर्णधार अक्षय वाडकरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, परंतु विदर्भाची सुरुवात थोडी निराशाजनक झाली. सलामीवीर अथर्व तायडे (०), ध्रुव शोरी (२६) व आदित्य ठाकरे (५) हे तीन फलंदाज तामिळनाडूच्या मध्यम गती वेगवान गोलंदाजांच्या प्रभावी माऱ्याला बळी पडलेत.

विदर्भाच्या संघाला झटपट गुंडाळण्यासाठी तामिळनाडूने सहा गोलंदाजांचा वापर केला, परंतु त्यांना दिवसभराच्या खेळात केवळ सहा फलंदाजांनाच बाद कर□ण्यात यश आले. मात्र दानिश मालेवार व करुण नायर या गोलंदाजांवर भारी पडलेत. या दोघांनी तामिळनाडूच्या गोलंदाजांचा खरपूस समाचार घेत चौथ्या गड्यासाठी ९८ धावांची भागीदारी केली. अनुभवी गोलंदाज विजय शंकरने दानिशची घोडदौड थांबविली. दानिशने ११९ चेंडूंत १३ चौकारांच्या मदतीने ७५ धावांचे योगदान दिले.

पुढे यश राठोड (१३) करुण नायरसोबत दमदार कामगिरी करेल असे वाटत असतानाच तो मोहम्मद अलीच्या गोलंदाजीला बळी पडला. कर्णधार अक्षय वाडकर २४ धावा काढून बाद झाला.

करुण नायरने एक बाजू सांभाळत हर्ष दुबेच्या साथीने दिवस अखेरपर्यंत विदर्भाला ८९ षटकांत ६ बाद २६४ धावा उभारून दिल्या. करुण नायरने १८० चेंडूंत १४ चौकार व एका षट्कारसह नाबाद १०० धावांची, तर हर्ष दुबेने नाबाद १९ धावांची खेळी केली.

तामिळनाडूकडून विजय शंकरने २ बळी, तर मोहम्मद मोहम्मद, सोनू यादव, अजित राम व मोहम्मद अलीने प्रत्येकी १ बळी टिपला. ◀(वृत्तसंस्था)

# मुलानी, कोटियानचे अर्धशतक मुंबई ६ बाद २७८

**कोलकाता** : ईडन्स गार्डनवर खेळल्या जात असलेल्या हरयाणाविरुद्धच्या रणजी करंडक उपांत्यपूर्व सामन्यात शम्स मुलानी (९१) व तनुष कोटियानच्या (नाबाद ८५) अर्धशतकी खेळीच्या बळावर मुंबईने पहिल्या दिवस अखेर पहिल्या डावात ८१ षटकांत ८ बाद २७८ धावा काढल्या.

मुलानीचे थोडक्यात शहत हुकले, त्याने १७८ चेंडूंत १० चौकारांसह ९१ धावा केल्या. तनुष कोटियानने १५४ चेंडूंत ११ चौकारांसह नाबाद ८५ धावांची खेळी केली. हरयाणाकडून अंशुल कम्बोजने ३ ब ळी, सुमित कुमारने २ बळी टिपलेत.

# केरळच्या निधिशचे ५ बळी जम्मू-काश्मीर ८ बाद २२८

**पुणे** : येथे खेळल्या जात असलेल्या केरळविरुद्धच्या रणजी करंडक उपांत्यपूर्व सामन्यात जम्मू-काश्मीरने पहिल्या दिवस अखेर पहिल्या डावात ८६ षटकांत ८ बाद २२८ धावा केल्या. केरळच्या वेगवान गोलंदाज एम.डी. निधिशने ५६ धावांत ५ बळी टिपण्याची किमया केली. नेदुमनकुझी बासिल, बासिल थम्पी व आदित्य सरवटेने प्रत्येकी एक बळी टिपला.

जम्मबू-काश्मीरच्या फलंदाजांची पहिला फळी अपयशी ठरल्यानंतर कन्हैया वाधवन (४८), साहील लोत्रा (३५), लोनी नासीरने (४४) संघाचा डाव सावरला.

# चिराग जानीचे अर्धशतक, सौराष्ट्र सर्वबाद २१६

**राजकोट** : येथे सुरु असलेल्या रणजी करंडक उपांत्यपूर्व सामन्यात चिराग जानीच्या अर्धशतकाच्या बळावर सौराष्ट्रने गुजरातविरुद्ध पहिल्या डावात ७१.२ षटकांत सर्वबाद २१६ धावा केल्या. प्रत्युत्तरात पहिल्या दिवस अखेर गुजरातने ५ षटकांत बिनबाद २१ धावा केल्या. खेळ थांबला तेव्हा प्रियांक पांचाळ ११, तर आर्य देसाई १० धावांवर खेळत होते.

गुजरातने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि सौराष्ट्रला पहिल्या डावांत २१६ धावांत गुंडाळले. चिराग जानीने तेवढी १४८ चेंडूंत□११ चौकार व एका षट्कारसह ६९ धावांची एकाकी झुंज दिली. गुजरातकडून चिंतन गाजाने ४ बळी, जयमीत पटेल व सिद्धार्थ देसाईने प्रत्येकी २ बळी टिपले.

# श्रीलंकेविरुद्ध ऑस्ट्रेलिया विजयाच्या मार्गावर

### मॅथ्यू कुन्हेमनचे ४ बळी

◆ **गॅले, ८ फेब्रुवारी**

येथे सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात श्रीलंकेच्या पहिल्या डावातील २५७ धावांच्या प्रत्युत्तारत ऑस्ट्रेलियाने तिसऱ्या दिवशी १०६.४ षटकांत सर्वबाद ४१४ धावांचा डोंगर उभा केला. ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात १५७ धावांची आघाडी मिळवून सामन्यावर आपली पकड मजबूत केली. दिवस अखेर श्रीलंकेने दुसऱ्या डावात ६२.१ षटकांत ८ बाद २११ धावा केल्या. श्रीलंका सध्या ५४ धावांनी आघाडीवर आहे.

ऑस्ट्रेलियाच्या धावांच्या डोंगरात कर्णधार स्टीव्ह स्मिथ (१३१) व ॲलेक्स कॅरीने (१५६) दमदार शतकांचे योगदान दिले.

श्रीलंकेने दुसऱ्या डावात पिछाडी भरुन काढण्याचा कसोशीने प्रयत्न केला. अँजेलो मॅथ्यूज व कुसल मेंडिसने दुसऱ्या डावांत ७० धावांची उत्कृष्ट भागीदारी करून नवसंजीवनी मिळवली. पण खेळ थांबण्यापूर्वी ३० मिनिटांपेक्षा कमी वेळात मॅथ्यूजने ७६ धावांवर एकाग्रता गमावली आणि नॅथन लियोनला फाईन लेगवर स्वीप केले, तिथे वेबस्टरने त्याचा जबरदस्त झेल घेतला.

अँजेलो मॅथ्यूजने १४९ चेंडूंत ४ चौकार व १ षट्कारसह ७६ धावांचे योगदान दिले. कुसल मेंडिस ४८ धावांवर नाबाद राहिला. कुसलने ५० चेंडूंत ५ चौकार व एक षट्कार हाणला. ऑस्ट्रेलियाकडून मॅथ्यू कुन्हेमनने ४ बळी, नॅथन लियोनने ३ बळी, तर ब्यू वेबस्टरने एक बळी टिपला. दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत ऑस्ट्रेलिया सध्या १-० ने आघाडीवर आहे. आता ते हा कसोटी सामना जिंकून २-० ने मालिका जिंकण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. ◀(वृत्तसंस्था)

# महाराष्ट्राच्या पदकांचे शतक

### २५ सुवर्णांसह ४० रौप्य, ४५ कांस्य पदकांची लयलूट

### पदकतालिकेत तिसऱ्या स्थानावर

◆ **डेहराडून, ८ फेब्रुवारी**

येथे सुरु असलेल्या ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पुन्हा एकदा विजेतेपद जिंकण्यासाठी महाराष्ट्राने आपली पदकांची घोडदौड कायम ठेवली आहे. स्पर्धेच्या ११ व्या दिवशी महाराष्ट्राने पदकांचा शतकी पल्ला पार केला आहे. पदकांचे शतक साजरे करून महाराष्ट्राने शनिवारी सायंकाळच्या सत्रापर्यंत २५ सुवर्णांसह ४० रौप्य, ४५ कांस्य अशी एकूण ११० पदकांची लयलूट केली आहे.

३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र सर्वाधिक पदके जिंकून तिसऱ्या स्थानावर आहे. एकूण ६६ पदकांसह सेनादल प्रथम स्थानावर, तर ५७ पदकांसह कर्नाटक दुसऱ्या स्थानावरआहे . स्पर्धेत सर्वाधिक पदके जिंकण्याची परंपरा महाराष्ट्राने पहिल्या दिवसापासून कायम राखली होती. गत गोवा स्पर्धेत महाराष्ट्राने ८० सुवर्ण, ६७ रौप्य व ७९ कांस्य अशी एकूण २२८ पदकांची लयलूट करीत ऐतिहासिक कामगिरी केली होती.

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून महाराष्ट्र संघाचे अभिनंदन**

शंभर पदकांचा पल्ला पार केल्याबद्दल राज्याचे उपमुख्यमंत्री व महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष अजित पवार, क्रीडामंत्री दत्ता भरणे, महासचिव नामदेव शिरगावकर यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.

महाराष्ट्राच्या यशाबाबत पथकप्रमुख संजय शेटे यांनी सांगितले की, महाराष्ट्राने सेनादलाची तब्बल १६ वर्षांची मक्तेदारी मोडीत काढून गोवा येथे २०२३ मध्ये झालेल्या मागील ३७व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील अव्वल स्थान काबीज केले होते. स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यात महाराष्ट्राचे क्रीडापटू अव्वल स्थानासाठी शर्थ करीत आहेत.

उत्तराखंडातील स्पर्धेत महाराष्ट्राने जलतरणात ६ सुवर्णपदकांसह ३५ पदकांची कमाई केली आहे. सायकलिंगमध्ये ३, आर्चरीत ३, ट्रायथ्लॉनमध्ये २, नेमबाजीत २, खो-खोत २, स्क्वॅशमध्ये १, योगासनात १, टेनिसममध्ये १ , तायक्वांडोत २, ॲथ्लेटिक्समध्ये २ अशी एकूण २५ सुवर्णपदके पटकावली आहेत. कबड्डी, वुशु, रग्बी, भारोत्तोलन, रोईंग, रग्बी, बॅडमिंटन, मुष्टियुध्द खेळातही महाराष्ट्राने पदकांची कामगिरी केली आहे. एक स्पर्धाविक्रमही महाराष्ट्राच्या नावावर आहे. वैष्णव ठाकूर या २३ वर्षीय खेळाडूने भारोत्तोलनामध्ये राष्ट्रीय विक्रम नोंदवित रुपेरी कामगिरी केली आहे.



सुदेष्णा शिवणकर



संजीवनी जाधव



प्रणव गुरव

**सुदेष्णा वेगवान धावपटू, संजीवनीला सुवर्ण,**

**डेहराडून** : नाशिकची खेळाडू संजीवनी जाधव हिने दहा हजार मीटर्स धावण्याच्या शर्यतीत सुवर्णपदक जिंकून राष्ट्रीय क्रीडाच्या ॲथ्लेटिक्स स्पर्धेचा पहिला दिवस गाजविला. पुरुषांच्या गटात किरण मात्रे याने शर्यतीत रौप्य पदक पटकाविले. सातारा येथील खेळाडू सुदेष्णा शिवणकर हिने वेगवान धावपटूचा मान मिळविला, तर पुरुषांच्या गटात पुण्याचा खेळाडू प्रणव गुरव याला शंभर मीटर्स धावण्याच्या शर्यतीत रौप्यपदक मिळाले.

राजीव गांधी क्रीडा संकुलातील आंतरराष्ट्रीय ॲथ्लेटिक्स स्टेडियमवर आज या स्पर्धेचा पहिला दिवशी महाराष्ट्राच्या दृष्टीने आनंददायी ठरला. सुदेष्णा शिवणकर हिने १०० मीटर शर्यत ११.७६ सेकंदात जिंकली. प्रणव गुरव याने शंभर मीटर्स धावण्याची शर्यत १०.३२ सेकंदात पार केली.

सातारा येथे गेली आठ वर्षे मातीच्या मैदानावरच सराव करणार्या सुदेष्णा हिने कृत्रिम ट्रॅकवर सराव करणाऱ्या खेळाडूंना मागे टाकत स्पृहणीय यश मिळवले. तिचे हे दुसरे सुवर्णपदक आहे.

महिलांच्या दहा हजार मीटर शर्यत संजीवनी हिने ३३ मिनिटे ३३.४७ सेकंद या वेळेत पूर्ण केले. तिचे या स्पर्धेतील हे दुसरे सुवर्णपदक आहे. यापूर्वी तिने याच क्रीडा प्रकारात एक रौप्य व एक सुवर्णपदक जिंकले होते.

सुवर्णपदकासाठी चिवट लढत झाली असती तर विक्रमी वेळ नोंदविली असती. मोठी आघाडी होती तरीही सातत्यपूर्ण वेग ठेवला होता. असे संजीवनी हिने सांगितले.

रौप्यपदक विजेता किरण याने दहा हजार मीटर्सचे अंतर २९ मिनिटे ०४.७६ सेकंदात पार केले. हिमाचल प्रदेशचा बरवालने ही शर्यत २८ मिनिटे ४९.९३ सेकंदात पूर्ण करीत सुवर्णपदक जिंकले. ◀(वृत्तसंस्था)

# जिम्नॅस्टिक्सच्या एक्रोबॅटिक व एरोबिक्स प्रकारात महाराष्ट्र अंतिम फेरीत

◆ **डेहराडून, ८ फेब्रुवारी**

गतवर्षी पाच सुवर्णपदकांसह गोव्यातील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा गाजविणाऱ्या महाराष्ट्राने ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतही जिम्नॅस्टिक्समध्ये धडाकेबाज सुरुवात केली. एक्रोबॅटिक व एरोबिक्स या दोन्ही प्रकारात महाराष्ट्रानने अंतिम फेरी गाठून आपला दबदबा कायम ठेवला.

येथील भागीरथी संकुलात शनिवारपासून जिम्नॅस्टिक्स स्पर्धेला प्रारंभ झाला. या महाराष्ट्रासह प. बंगाल, हरयाणा व कर्नाटक या पाच राज्यातील संघ सहभागी झाले आहेत. महिला दुहेरीत ऋतुजा जगदाळे आणि निक्षिता खिल्लारे या जोडीने बॅलन्स सेटमध्ये नेत्रदीपक रचना सादर करून २१.११० गुणांसह अव्वल क्रमांक मिळविला. पुरुष दुहेरीत गणेश पवार व आदित्य कालकुंद्रे ही जोडी २१.७५० गुणांसह दुसरा स्थानावर राहिली. मिश्र दुहेरीत सरकटे व रिद्धी जयस्वाल जोडीने सर्वाधिक १९.०१० गुणांची कमाई केली. महिला गटात सोनाली कोरडे, आर्णा पाटील व अक्षता ढोकळे या महाराष्ट्राच्या त्रिकुटाने २२.३९० गुणांची कमाई करीत अपेक्षेप्रमाणे अव्वल स्थान मिळविले. पुरुष गटात रितेश बोखडे, प्रशांत गोरे, नमन महावर व यज्ञेश बोस्तेकर या जोडीने सर्वाधिक २३.६७० गुणांसह प्रथम स्थान मिळविले.



जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत कौशल्य दाखवताना महाराष्ट्राचे खेळाडू

एरोबिक्स प्रकारातही महाराष्ट्राने महिला दुहेरी, पुरुष दुहेरी, मिश्र दुहेरी, महिला गट व पुरुष गटात नेत्रदीपक कामगिरी करीत सुवर्ण पदकाच्या आशा पल्लवीत केल्या आहेत. ◀(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



सोलापूर : त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त धाकटा राजवाडाच्या वतीने जेष्ठ महिला, भगिनी व शालेय विद्यार्थीनींकडून माता रमाई यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मंडळाच्या वतीने लाडूचे वाटप करण्यात आले. यावेळेस मंडळाचे अध्यक्ष कुणाल वाघमारे, महेश कांबळे, अंकुश तळभंडारे, लहु तळभंडारे, करण वाघमारे, रत्नशिल खंडागळे, सचिन वंजारे, बंटी तळभंडारे, विलास कांबळे व पदाधिकारी उपस्थित होते.



### उमाबाई श्राविका विद्यालयात रमाबाई आंबेडकर यांची जयंती साजरी

**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

उमाबाई श्राविका विद्यालयात त्यागमूर्ती मातोश्री रमाबाई आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रशालेच्या वरिष्ठ मार्गदर्शिका दीप्ती शहा, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ यांच्या उपस्थितीत प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी केतकी अल्हापूरकर, सोनाली उंडे व विक्रांत बारडकर उपस्थित होते. सहशिक्षक अनंत बळ्ळे यांनी रमाबाई यांचे डॉ. आंबेडकरच्या महानतेत असणारे अद्वितीय योगदान, त्याग, समर्पण, बलिदान, सयंम धौर्य याचबरोबर डॉ. आंबेडकरांना खंबीर साथ यावर त्यांनी प्रकाश टाकला. क्रीडा शिक्षक सुहास छंचुरे यांनी आभार मानले.



### पालिका क्रीडाधिकारी भूषणकुमार जाधव यांचा सत्कार

**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

सोलापूर बास्केटबॉल असोसिएशन व पद्मनगर स्पोर्ट्स अकॅडमी यांच्यावतीने सोलापूर महानगरपालिकेचे नूतन क्रीडा अधिकारी व शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते डॉ. भूषणकुमार जाधव यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी गोपाळ पिडगुलकर, श्रीकांत घोलप, प्रथमेश हिरापुरे, पद्मनगर स्पोर्ट्स अकॅडमीचे श्रीधर गायकवाड, प्रबुद्ध चिंचोळीकर, विशाल बनसोडे, श्रीधर ताटीपामुल, आनंद वल्लाकाटी, श्रीशैल गुरव, सुशील नाटकर व स्वाती कोठे उपस्थित होते



### भीमनगर जि. प. शाळेत रमाई आंबेडकर यांची जयंती साजरी

**सांगोला, दि. ८ फेब्रुवारी-**

जि. प. प्रा. शाळा भीमनगर, सांगोला येथे माता रमाई भिमराव आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला माता रमाईच्या प्रतिमेचे पूजन पुष्पहार अर्पण करून त्यानंतर दिप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी प्रास्ताविकेत बापूसाहेब ठोकळे यांनी त्यागमूर्ती माता रमाई यांच्या जीवन कार्याचा उल्लेखनीय गौरव केला. तसेच माजी नगरसेविका रेश्मा बनसोडे यांनी माता रमाई यांच्या जीवन कार्याविषयी थोडक्यात मनोगत व्यक्त केले. एखतपुर येथील स्नेहल सुतकर यांनी क्लासवन अधिकारी पोस्ट संपादन केल्याबद्दल शाळेच्या वतीने उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. स्नेहल सुतकर यांनी मनोगतात यश गाठायचे असेल तर जिद्द, चिकाटी व विद्यार्थीदशेत भरपूर अभ्यास केला पाहिजे असे मत व्यक्त केले. यावेळी तानाजी बनसोडे, किशोर बनसोडे, जितेंद्र बनसोडे, शशिकांत सुतकर, दीपक बनसोडे, अनिल माने, मैना बनसोडे, जयश्री कसबे, सविता बनसोडे, रतन बनसोडे, शकील भोरकडे, बाळासाहेब बनसोडे, अंगणवाडी सेविका जयंती बनसोडे, लक्ष्मी बनसोडे, भारत बनसोडे, तानाजी खंडागळे उपस्थित होते. मैना गायकवाड व मुख्याध्यापिका शेळके यांनी आभार मानले.

### बॉलीवूडच्या सुरांचे हिप-हॉप बीटस्चे मिश्रण

**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

'लिव्हिंग इट लार्ज' या भावनेचा उत्सव साजरा करत,सीयाग्राम च्या रॉयल स्टॅगने १ फेब्रुवारीला ठाणे,मुंबई येथील आनंद नगरातल्या टीएमसी ग्राउंड येथे एका शानदार शोसह रॉयल स्टॅग बूमबॉक्सच्या बहुप्रतिक्षित तिसऱ्या आवृत्तीची सुरुवात केली.या कार्यक्रमाने काळजाचा ठाव घेणारे संगीत,मनमोहक सादरीकरण आणि अतुलनीय उर्जेने ही सायंकाळ अविस्मरणीय ठरली. डीजे योगीने रात्रीसाठी परिपूर्ण वातावरण तयार केले.रॅप आयकॉन इक्काने त्यात आणखी जोश भरत एकाहून एक बीट्स सादर केले.त्यानंतर दमदार परफॉर्मर निकिता गांधी आणि तिच्या टीममधील बहुमुखी गायकीने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. ग्रँड फिनालेमध्ये संगीतकार अरमान मलिक यांनी समारोप सादर केला.

# लाडकी बहीण योजनेतून सोलापुरातील तीन हजार महिला अपात्र

**तभा वृत्तसेवा । राजाराम मस्के**
**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

विधानसभा निवडणुकीत लोकप्रिय ठरलेली मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना महायुतीची सरकार सत्तेत येण्यासाठी गेमचेंजर ठरली. महाराष्ट्रातील दोन कोटी ४९ लाख महिलांच्या खात्यावर १५०० रुपये प्रमाणे रक्कम जमा झाली. राज्यातील भगिनींनी म हायुती सरकारला भरभरून आशीर्वाद दिला. आत्ता सरकारने या धोरणा बाबत थोडा बदल केलेला आहें. ज्या महिलांचे वय ६५ वर्ष पुर्ण झालें आहे, ज्यांचं नाव संजय गांधी निराधार योजनेत आहे,

ज्यांच्या घरात चार चाकी वाहन आहे, व ज्यांनी स्वतःहून लाडकी बहीण योजनेतून नाव कमी करून घेतलं आहे. महाराष्ट्रातून तब्बल पाच लाख लाभार्थी महिलांचे नाव या योजनेतून कमी केल्याची माहिती



नुकतीच राज्याच्या बालविकास व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी दिली. अजूनही महाराष्ट्रात सर्वे करून गरजवंत महिलांनाच यांचा लाभ देण्याचे उद्दीष्ट आहे यासाठी महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील लाभार्थी महिलांची माहिती घेतली जाणार आहे. या योजनेत ज्या महिला बसत नाहीत अशा महिलांनाही या सर्वे आल्यानंतर नावे कमी होण्याची शक्यता आहे.अर्ज अपात्र ठरविण्यामागील कारणांमध्ये

**सोलापूर जिल्ह्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत एकूण १०,४४,९०७ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी, ३,००४ अर्ज अपात्र ठरविण्यात आले आहेत. तालुकानिहाय अपात्र अर्जांची संख्या खालीलप्रमाणे आहे. अक्कलकोट मध्ये ४८९, करमाळा तालुक्यात १७०, माळशिरस २५०, पंढरपूर येथील ४०० उत्तर सोलापूर मधील ४०० मुख्यमंत्री लाडकी बहीण लाभार्थी महिलांचे व उर्वरित अपात्र अर्ज इतर तालुक्यांमधील आहेत.**

अपूर्ण माहिती, आवश्यक कागदपत्रांची कमतरता, किंवा पात्रतेच्या निकषांची पूर्तता न होणे यांचा सम ावेश असू शकतो. अर्जदारांनी अर्ज भरताना सर्व आवश्यक कागदपत्रे आणि माहिती अचूकपणे सादर करणे आवश्यक आहें. जिल्ह्यातील पात्र अर्जदार महिलांना प्रत्येकी १,५०० रुपये दरमहा या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत दिले जात आहेत. पहिल्या टप्प्यात सुमारे साडेतीन लाख महिलांना प्रत्येकी ३,००० रुपये वितरित करण्यात आले आहेत. त्यानंतर, दिवाळीच्या पूर्वी अंदाजे दोन लाख महिलांच्या खात्यात ३,५०० रुपयांची रक्कम जमा करण्यात आली आहे. नव्या अर्जदारांच्या खात्यातही लवकरच रक्कम जमा होणार असल्याची माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांनी दिली आहे. अर्जदारांनी अर्जाची स्थिती आणि लाभाची माहिती जाणून घेण्यासाठी संबंधित विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर किंवा स्थानिक प्रशासन कार्यालयाशी संपर्क साधावा.


# कळमण येथे आढळला यादव काळातील शिलालेख

## ● इतिहास अभ्यासक नितीन अणवेकर यांचे संशोधन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

कळमण येथे चालुक्य काळातील महादेव मंदिर आहे मंदिरातील सभामंडपाच्या तुळईवर देवनागरी लिपीत कोरलेला शिलालेख होता तो यादव काळातील आहे हा शिलालेख इतिहास अभ्यासक नितीन अनवेकर यांना सापडल्यामुळे संशोधनास नवीन दिशा मिळाली आहे सोलापूर पासून अवघ्या ३५ कि.मी अंतरावर कळमण गाव आहे तेथील महादेव मंदिरात हा शिलालेख सापडला आहे सभामंडप अंतराळ गर्भगृह अशी मंदिराची रचना आहे

इतिहास अभ्यासक नितीन अनवेकर ऐतिहासिक सर्वे क्षणाच्या निमित्ताने तेथे गेले होते



तेव्हा मंदिराच्या सभामंडपाच्या तुळईच्या वरील बाजूस शिलालेख आढळला तो देवनागरी लिपीतील असल्यामुळे ताबडतोब त्यांनी शिलालेखाचे ठसे घेतले शिलालेख चार ओळीचा असून तो मराठी भाषेत आणि जुन्या वळणाच्या नागरी लिपीत आहे. शिलालेखाच्या सुरवातीस स्वाती श्री सकु १२३९ पींगल नाम संवछरे कष्टी द्विजा यांनी भीक्ष मगै मगै नु पाट करविले तुर्कलू जी पट सुववीले भंगलेया कीर्तन जी तेया पुन्हा हो प्रसा .दचे पुन पुना.. असे शिलालेखावर देवनागरी लिपीत कोरलेले आहे. महादेव मंदिर चालुक्य काळातील तर शिलालेख यादव काळातील असल्यामुळे संभ्रम अवस्था निर्माण झाली त्यामुळे अणवेकर यांनी संदर्भ गोळा केले शिलालेखाचे वाचन करून घेतले त्यानंतर त्याचा अर्थ स्पष्ट झाला.

इ.स सन तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात तुर्कांच्या आक्रमण झाले इसवी सन १३१७ मध्ये अल्लाउद्दीन खिलजीच्या हस्तकांनी कळमण गावार हल्ला करून तेथील तीन मंदिरांचा विध्वंस केला नंतर यादव काळात विद्वान मंडळींनी देणग्या गोळा करून महादेव मंदिर बांधले.

याचाच अर्थ जीर्णोद्धार केला भिक्षा मागून मंदिराचा जिर्णोद्धार केला असा उल्लेख शिलालेखात आला आहे परंतु भिक्षा मागणे याचा अर्थ देणगी मागणे असा आहे.शिलालेखाच्या शेवटी मंदिराच्या जीर्णोद्धार कार्यात ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले त्यांना पुन्हा पुन्हा पुण्य लाभो अशी शुभकामना व्यक्त करण्यात आली आहे. या शिलालेखाचे वाचन करण्यासाठी अणवेकर यांना इतिहास अभ्यासक अनिल दुधाने, अथर्व पिंगळे, रोहन होनकळस, विशाल फुटाणे यांचे सहकार्य लाभले.

# पिलीव परिसरात सर्व्हर डाऊन

**▸▸ फार्मर आयडीचे काम थांबले**
**▸▸ तहसीलदारांकडे तक्रार**

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव. दि. ८ फेब्रुवारी-**

शासनाने शेतकऱ्यांना वेगवेगळ्या योजनांचा लाभ मि ळावा म्हणून फार्मर आयडी प्रक्रिया सुरू करून सर्व शेतकऱ्यांना फार्मर आयडी काढण्याचे आवाहन केले. पिलीव परिसरात सर्व्हर डाऊन असल्याने ही कामे थांबली आहेत.

मोठा गाजावाजा करीत म ाळशिरस तालुक्यात २६ जानेवारी रोजी प्रांताधिकारी, तहसीलदार व अन्य अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत उद्घाटनही करण्यात आले. परंतु २६ तारखेपासून पिलीव परिसरात कोणत्याही शेतकऱ्यांचा फार्मर आयडी निघालाच नाही. शेतकरी यासाठी महा ई-सेवा केंद्राकडे हेलपाटे मारीत आहेत. पण सदरचा सर्व्हरच सुरू नाही.

यामुळे पिलीव परिसरातील शेतकरी गेल्या पंधरा दिवसांपासून फार्मर आयडी काढण्यापासून वंचितच आहेत. याबाबत कुसम ोडचे माजी उपसरपंच संजय पाटील यांनी नायब तहसीलदार कदम यांच्याकडे तक्रार केली असून ताबडतोब सदरच्या फार्मर आयडीचा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी त्यांनी केली आहे. तर नायब तहसीलदार कदम यांनी पिलीव परीसरातील सदर अडचणीचे निवारण करु व शेतकऱ्यांना फार्मर आयडी काढण्यासाठी जी अडचण आहे, ती सोडवण्याचे आश्वासन यावेळी त्यांनी दिले.



# शिवसेना उबाठा पक्षाचा प्रीपेड मीटरला विरोध

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी -**

सोलापूर शहर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने प्रीपेड मीटरच्या सक्तीच्या विरोधात नागरिक व व्यापाऱ्यांचे प्रबोधन व फॉर्म वाटप करण्यात आले.

सध्या महाराष्ट्रात वीज वितरण कंपनीच्या माध्यमातून प्रीपेड मीटर बसवण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. याला शिवसेनेने विरोध दर्शवला असून त्यासाठी नागरिकांचे प्रबोधन करण्यासाठी शिवसेनेने विद्युत मीटर नको असा मजकूर असलेले फॉर्म नागरिक व नवी पेठेतील व्यापाऱ्यांना भेटून देण्यात आले. मीटर बसवल्यास ग्राहकांचे कसे नुकसान होणार आहे हे समजावून सांगितले. नागरिकांनी व व्यापाऱ्यांनी. शिवसेनेच्या आवाहनास प्रतिसाद देऊन शिवसेनेची भूमिका सम जावून घेऊन प्रीपेड मीटरला विरोध केला असून प्रीपेड मीटर नको असलेले फॉर्म भरून वीज मंडळाला देण्याचे आश्वासन दिले व शिवसेनेच्या भूमिकेचे स्वागत केले. याप्रसंगी शिवसेना शहरप्रमुख महेश धाराशिवकर, जिल्हा उपप्रमुख प्रताप चव्हाण, शहर उपप्रमुख सुरेश जगताप, संदीप बेळमकर, लहू गायकवाड, दत्ता खलाटे, विजय पुकाळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# पुरुष प्रधान संस्कृती बदलण्यासाठी जनजागृतीची गरज : पालक न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण

**▸ महिलांच्या लैंगिक छळापासून संरक्षण अधिनियम २०१३ कायद्यासंदर्भात जनजागृती शिबीर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

भारतीय समाजामध्ये पूर्वापार रूढ असलेली मानसिकता बदलन्याची वेळ आली आहे. समाजामध्ये रुजलेली पुरुष प्रधान संस्कृती ही जरी कायद्याने दूर केली असली तरी त्या अनुशंगाने जोवर समाजामध्ये जनजागृती होणार नाही, प्रबोधन होणार नाही तोवर नुसता कायदा होऊन उपयोग नाही, असे मत मुंबई उच्च न्यायालय तसेच सोलापूरचे पालक न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार शनिवार, दि. ८ फेब्रुवारी रोजी कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळापासून संरक्षण अधिनियम २०१३ या कायद्यासंदर्भात जनजागृती शिबीर सोलापूर येथील नियोजन भवन येथे घेण्यात आले. कार्याक्रमाचे उदघाटन मुंबई उच्च न्यायालय तसेच सोलापूरचे पालक न्यायमुर्ती पृथ्वीराज चव्हाण यांनी केले. यावेळी व्यासपिठावर प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष एम. एस. शर्मा, पोलिस उपायुक्त डॉ. दिपाली काळे, व्ही. एम. मेडीकल कॉलेजमधील मानसोपचार तज्ञ



डॉ. नितीन भोंगे, दिवाणी न्यायाधीश तथा पिठासिन अधिकारी महिला तक्रार निवारण समिती अध्यक्षा श्रीमती एस. एन. रत्नकंठवार-जवादवार आदी उपस्थित होते.

प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष एम.एस. शर्मा यांनी महिलांच्या कामाच्या ठिकाणी होणा-या लैगिंक छळामागील पुरुषांची दुर्बल मानसिकता याविषयावर भाष्य केले. तसेच अशा घटना या हेतुपुरस्कर केल्या जात असाव्यात. यावर प्रकाश टाकला तसेच त्यांनी प्रामुख्याने उच्च न्यायालय सोलापूरचे पालक न्यायमुर्ती पृथ्वाराज चव्हाण व उच्च न्यायालय मुंबईचे न्यायमूर्ती श्रीमती रेवती मोहिते-डेरे यांनी नुकत्याच दिलेल्या बदलापूर लैगिंक अत्याचार प्रकरणी केलेल्या निकालातीन निरक्षिण 'बेटा पढाओ, बेटी बचाओ' आपण मुलांना शिक्षण देण्यावर भर कसा दिला पाहिजे याविषयावर आपले विचार मांडले.पोलिस उपआयुक्त डॉ. दिपाली काळे यांनी कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळाबाबत प्रतिबंध कायदया बाबत तरतुदी सांगितले. तसेच त्यांनी लिंग समानताचे महत्व सांगितले. डॉ. नितीन भोगे यांनी ताण किती प्रकारचे असतात ते ताण कसे हाताळावेत यावर मार्गदर्शन केले. सूत्रसंचलन दिवाणी न्यायाधीश मिताली कोठुळे व वर्षाराणी राऊत यांनी केले. तर आभार जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव उमेश देवर्षी यांनी मानले.

# नवीन लेबर कोड लागू करताना कामगार हिताची काळजी घेणार

## कामगार मंत्री आकाश फुंडकर; भारतीय मजदूर संघाच्या वतीने सेमिनार

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. ८ फेब्रुवारी-**

नवीन कामगार कायदे लागू करताना काम गार हिताची काळजी घेणार, तसेच भारतीय मजदूर संघाने घेतलेल्या हरकतींचा पूर्ण विचार करणार, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे काम गार मंत्री आकाश फुंडकर यांनी केले. भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेशाच्या वतीने नवीन लेबर कोड आणि बीएमएस या विषयावर आयोजित सेमिनार मध्ये ते बोलत होते.




यावेळी व्यासपीठावर भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष ॲड. अनिल ढुम णे, महामंत्री किरण मिलगिर, अखिल भारतीय उपाध्यक्ष राज बिहारी शर्मा, क्षेत्र संघटन मंत्री राजेशजी, ना.मे.लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्थेच्या संचालक श्रीमती रोशनी कदम-पाटील आणि प्राध्यापक पी.एम. कडूकर हे मंचावर उपस्थित होते. प्रस्ताविक किरण मिलगिर यांनी केले तर सूत्रसंचालन बाळासाहेब भुजबळ यांनी केले.

नवीन कामगार कायदे २०१९-२०२० पासून संसदेने पास केलेले असून ते लागू करण्याबाबत केंद्र व राज्य सरकार विचार करीत आहे. या पार्श्वभूमीवर या कायद्यांबाबत भारतीय मजदूर संघाची भूमिका स्पष्ट करण्यासाठी या सेमिनारचे आयोजन करण्यात आलेले होते. सेमिनारचे उद्घाटन कामगार मंत्री नामदार आकाश फुंडकर यांनी केले. ॲड.अनिल ढुमणे यांनी लिहिलेल्या 'नवीन लेबर कोड आणि इचड' या पुस्तकाचे प्रकाशन भारतीय श्रमशोध मंडळाच्या वतीने कामगार मंत्र्यांचे हस्ते करण्यात आले.

सामाजिक सुरक्षा कोड २०२० आणि वेतन कोड २०१९ हे कामगार कायदे असंघटित आणि संघटित क्षेत्रातील कामगारांच्या साठी लाभदायक असून घरेलू, बांधकाम, अंगणवाडी, आशा, फेरीवाले, रिक्षा, टॅक्सी आदी असंघटित क्षेत्रातील सुमारे ५० कोटी कामगारांना सामाजिक सुरक्षा आणि संघटित आणि असंघटित क्षेत्रातील सर्व कामगारांना किमान वेतन हमी देणारे असल्याने ते त्वरित लागू झाले पाहिजे अशी मागणी यापसंगी करण्यात आली.

तर औद्योगिक संबंध कोड २०२० आणि व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामाची स्थिती कोड २०२० या कोड मधील कारखाना बंद करणे, कामगार कपात, ले ऑफ, फिक्स टर्म एम्प्लॉयमेंट, स्टँडिंग ऑर्डर आणि कंत्राटी कामगारांशी संबंधित अनेक तरतुदी कामगार विरोधी असून या कोडमुळे औद्योगिक क्षेत्रात असंतोष आणि संघर्ष निर्माण होणार असल्याने त्या तरतुदी बदलून मगच ते कायदे लागू करावेत अशी मागणी भारतीय मजदूर संघाच्या वतीने करण्यात आली. या सेमिनारला राज्यभरातून विविध उद्योगातील २५० पेक्षा जास्त प्रतिनिधी उपस्थित होते. आभार मुंबईचे सचिव संदीप कदम यांनी मानले. वंदे मातरम्ने कार्यक्रमाची सांगता झाली.



# कलाशिक्षण अविभाज्य घटक

**▸ माजी आ. दत्तात्रय सावंत यांचे प्रतिपादन**
**▸ कलाशिक्षण परिषदेच्या दुसऱ्या राज्यस्तरीय अधिवेशनास सुरुवात**

**पंढरपूर, दि. ८ फेब्रुवारी -**

कलाशिक्षण हा शिक्षणातील अविभाज्य घटक आहे, याची जाणीव असावी, असे प्रतिपादन माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांनी केले.

पंढरपूर येथे अखिल महाराष्ट्र राज्य शैक्षणिक कलाशिक्षक संघ व सोलापूर जिल्हा शैक्षणिक कलाशिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने कलाशिक्षण परिषदेच्या दुसरे राज्यस्तरीय अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शेरशाह डोंगरी होते. ते म्हणाले, कला शिक्षकांची भरती पोर्टल द्वारे करण्यात यावी, अंशकालीन कलाशिक्षकांना कायम करण्यात यावे, निवृत्त कला शिक्षकांच्या जागेवर त्वरित कला शिक्षकांची भरती करण्यात यावे, व विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने चित्रकला ग्रेड परीक्षेत श्रेणीला १५, इ श्रेणीला- १० उ श्रेणीला ५ गुण मिळावे, चित्रकला परीक्षेचे मूल्यमापन केंद्र सोलापूर शहरात व्हावा व सर्व शिक्षक कला शिक्षकांनी एकत्र येऊन लढा देऊ. याप्रसंगी स्वागत अध्यक्ष माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत, राज्यकला शिक्षक संघटनेचे अध्यक्ष डोंगरी, सावित्रीबाई चित्रकला महाविद्यालयाचे संस्थापक भारत माळी, कलासंचनालयाचे परीक्षा नियंत्रक नागेश वाघमोडे यांनी कलावारी विठुरायाची पंढरीचे प्रकाशन केले. या कार्यक्रम प्रसंगी राज्य संघटनेमार्फत १३ कलाशिक्षकांना जीवनगौरव, २५ कला शिक्षकांना राज्य आदर्श कलाशिक्षक पुरस्कार पुरस्काराने, तसेच जिल्हा संघटनेमार्फत चार आदर्श कलाशिक्षकांना जिल्हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नामदेव देशमुख यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन सरचिटणीस शालिग्राम भिरूड यांनी केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# घराला लागलेल्या आगीमध्ये संसारोपयोगी साहित्य जळून खाक

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ८ फेब्रुवारी-**

भर दुपारी अचानकपणे घराला लागलेल्या आगीमध्ये सांगोला शहरातील भूईटे वस्ती येथील शेख कुटुंबियांचे संसार उपयोगी साहित्य जळून खाक झाले असल्याची घटना शुक्रवारी दुपारी घडली.

जस्मिन शेख या आपल्या परिवारासह माळेगाव, बारामती येथे वास्तव्यास होत्या. पतीचे निधन झाल्यानंतर सांगोला येथे आई-वडिलांकडे राहायला आल्या आहेत. त्यांना एक मुलगी व एक मुलगा आहे. मुलगा बाहेर कामाला जातो. त्यांनी रहायला केलेले पत्र्याचे शेडला शुक्रवारी दुपारी अचानक आग लागली. दरम्यान शेजारी असलेल्या पत्रकार सुरज लवटे यांनी तातडीने नगरपालिकेच्या अग्निशामक दलाला संपर्क साधून सदरची घटना घडली असल्याबाबत माहिती दिली. अग्निशामक दलाचे वाहन घटनास्थळी दाखल होईपर्यंत संसार उपयोगी साहित्य जळून खाक झाले. दरम्यान आजूबाजूला अनेक कुटुंब वास्तव्यास आहेत.



सांगोला अग्निशमन विभागाचे चालक संतोष सरगर, तानाजी शिंगाडे, फायरमन आसिफ काझी, नाजाकत मुलानी यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तातडीने आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांनी वेळेत आग आटोक्यात आणल्याने पुढील अनर्थ टळला. आगीचा तांडव आणि धुराचे लोट सुरू असताना पत्रकार सुरज लवटे यांच्या कार्यतत्परतेमुळे आणि सांगोला नगरपालिकेचे अग्निशामक वाहन घटनास्थळी दाखल झाल्यामुळे पुढील अनर्थ टळला. या घटनेमध्ये सुरज लवटे यांनी अग्निशामक दलाला वेळेत माहिती देऊन घटनास्थळी पाचारण केले या निमित्ताने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### जळीतग्रस्त कुटुंबीयांना मदत

जळीतग्रस्त शेख कुटुंबीयांना आपुलकी प्रतिष्ठानने किराणा साहित्य, अंथरूण-पांघरूण व संसारोपयोगी भांडी देऊन आधार देत आपुलकी जोपासली. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव, सचिव संतोष महिम कर, दीपक शिनगारे, सुरेशकाका चौगुले, राहुल टकले, प्रमोद दौंडे, सुभाष फराटे, अरविंद डोंबे, वसंत सुपेकर, प्रा.विधीन कांबळे, अरविंद केदार, शशिकांत येलपले, दादा खडतरे, अनिल विभुते, इंजि. हर्षल काळे उपस्थित होते.



# ‘मातीला पंख फुटताना’ मुलींसाठी प्रेरणादायी

**एकनाथ आव्हाड : लेखिका डॉ. स्मिता पाटील यांच्या कादंबरीचे प्रकाशन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

मातीला पंख फुटताना ही कुमार कादंबरी अज्ञान,अंधश्रद्धा, दारिद्र्य यांच्या काळोखाला भेदून प्रकाशमान वाटेवर येणाऱ्या शाळकरी मुलीच्या जिद्दीची कहाणी सांगते. ही कहाणी समाजातील अनेक मुलींसाठी प्रेरणादायी ठरणार आहे, हेच या पुस्तकाचे खरे यश आहे. असे विचार साहित्य अकादमी बालसाहित्य पुरस्कार प्राप्त लेखक एकनाथ आव्हाड यांनी व्यक्त केले.

मोहोळच्या लेखिका डॉ. स्मिता पाटील लिखित मातीला पंख फुटताना, या कादंबरीचे आणि नाही गिरवता येत कुठलीच लिपी यादुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन समारंभ आव्हाड यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मनोरमा परिवाराचे संस्थापक श्रीकांत मोरे होते. याप्रसंगी कोल्हापूरचे ज्येष्ठ साहित्यिक श्रीकांत पाटील, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे सोलापूर जिल्ह्याचे प्रतिनिधी पद्माकर कुलकर्णी, डॉ. प्रमोद पाटील यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती होती.

श्रीकांत मोरे यांनी लेखिका स्मिता पाटील यांचे कौतुक करत माणूस नुसताच भौतिक आणि आर्थिकदृष्ट्या समृद्ध झाला. परंतु सांस्कृतिक आणि सामाजिक दृष्ट्या कोताच राहिल्याची खंत व्यक्त करत ही कविता केवळ स्त्रीच्याच नव्हे तर माणूसपणाला नकार देणाऱ्या सर्वच व्यथांना आपल्या विश्वात सामावून घेत एक नवा समतावादी समाज निर्माण करण्याचे स्वप्न पाहते.असे सांगितले.

प्रास्तविक डॉ. स्मिता पाटील यांनी केले. सूत्रसंचालन बापूसाहेब दळवे यांनी केले तर आभार डॉ. प्रमोट पाटील यांनी मानले. यावेळी उद्योजक दत्ताअण्णा सुरवसे, डॉ. नसीम पठाण, जे. जे. कुलकर्णी कवी मारुती कटकधोंड, गिरीश दुनाखे, राजेंद्र भोसले, डॉ. शिवाजी शिंदे, डॉ. श्रुती वडगबाळकर, वंदना कुलकर्णी, दिगंबर भगरे, डॉ. सुहास पुजारी उपस्थित होते.

### ग्रामीण स्त्रियांचे विदारक चित्र

आपल्या पुस्तकातून ग्रामीण भागातील स्त्रियांचे विदारक चित्र मांडले आहे. तरुण मुलांच्या भावविश्वाची चपखल मांडणी केली आहे, असे श्रीकांत पाटील म्हणाले.

## बार्शी बार असोसिएशनची १८ फेब्रुवारी रोजी निवडणूक

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ फेब्रुवारी-**

बार्शी बार असोसिएशन सन २०२५-२६ या वर्षासाठी कार्यकारिणी निवडीसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर झालेला आहे. ही निवडणूक दि. १८ फेब्रुवारी रोजी घेण्यात येईल.

या निवडणुकीसाठी अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार आणि लायब्ररी चेअरमन या पाच पदासाठी एकूण १३ उमेदवार रिंगणात आहेत. अध्यक्षपदासाठी ॲड. रणजीत गुंड व ड. संजय साखरे तसेच उपाध्यक्ष पदासाठी ॲड. वैभव देशमुख, ॲड. संभाजी गलांडे, ॲड विशाल गोणेकर, ॲड. सुकुमार खामगावकर, तसेच सचिव पदासाठी ॲड. दत्तप्रसाद घोगरे, ॲड. इक्बाल पठाण, ॲड. अक्षय पाटील, लायब्ररी चेअरमनपदासाठी ॲड. अमोल अलाट व ॲड. प्रशांत घोडके, खजिनदारसाठी ॲड. अक्षय बीडबाग व ॲड. सूरज जामदार हे उमेदवार रिंगणात आहेत. मॅनेजिंग कमिटीच्या चार पदासाठी ॲड. रवींद्र वैद्य, ॲड. नितीन शिंदे, ॲड. धीरज कांबळे, महिला सदस्य म्हणून ॲड. योजना घोलप यांची बिनविरोध निवड झाल्याचे मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. सुनील कुलकर्णी यांनी दिली.

# क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांनी घेतले श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.८ फेब्रुवारी-**

राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ मंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज माघ शुद्ध जया एकादशीनिमित्त श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे लेखा अधिकारी मुकेश अनेचा यांच्या हस्ते क्रीडा मंत्री श्री भरणे यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला. याप्रसंगी तहसीलदार सचिन लंगुटे, जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके आदी मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. माघी शुध्द जया एकादशी निमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी राज्यातील विविध जिल्ह्यातून तसेच परराज्यातून मोठ्या प्रमाणात भाविक दाखल झाले आहेत. मंदिर मंदिर परिसर तसेच प्रदक्षिणा मार्गावर मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी लक्षात घेऊन तसेच भाविकांना वाहतुकीचा कोणताही त्रास होऊ नये क्रीडामंत्री दत्तात्रेय भरणे यांनी शिवाजी चौक येथून मंदिरापर्यंत दर्शनासाठी चालत गेले.





## महेश इंगळे, प्रथमेश इंगळेंनी घेतले माहूरगड रेणुकादेवीचे दर्शन

**अक्कलकोट, दि. ८ फेब्रुवारी-**


श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे, प्रथमेश इंगळे यांनी मित्रपरिवारासह माहूरगड रेणुका देवी मंदिर व मंदीर संस्थानास भेट देऊन रेणुका मातेचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर संस्थानचे पुजारी व विश्वस्त बालाजी जगत यांनी सत्कार केला. यावेळी व्यवस्थापक योगेश गुरव-साबळे, सहाय्यक व्यवस्थापक नितीन गेडान, संतोष पराणे, श्रीकांत झिपरे, अंकुश केत, बाळासाहेब एकबोटे, सुनिल पवार, मनोज इंगुले, ज्ञानेश्वर भोसले, सुरेश वाले, संजय पवार, श्रीशैल गवंडी, सागर गोंडाळ, धनराज स्वामी, दर्शन घाटगे, तुषार मोरे, स्वामीनाथ मुसळे इत्यादी उपस्थित होते.

## एनएमएमएस परीक्षेत आदर्श विद्यालयाचे यश

**बार्शी, दि. ८ फेब्रुवारी-**



श्रमजीवी बहुउद्देशीय क्रीडा शिक्षण प्रसारक मंडळ, रातंजन, ता. बार्शी संचालित आदर्श विद्यालयाने आपली उज्वल यशाची परंपरा कायम राखत एनएमएमएस परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. या परीक्षेत ३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. शिवराज हिंदुराव देशमुख, धनश्री धनाजी बिले, श्रद्धा संतोष साठे हे विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशालेच्या मुख्याध्यापिका देशमुख, भालशंकर, बनसोडे, भोसले, नायकल, दळवे, माळी, आतार, साठे यांचे मार्गदर्शन मिळाले.






# जुळणार नाती अनेक, साजरा होणार सोहळा एक


- तीन तासांचा महासंगीत सोहळा, तीन दिवसांचं शूट आणि तेहत्तीस कलाकारांची फौज
- स्टार प्रवाहच्या ठरलं तर मग आणि लग्नानंतर होईलच प्रेम मालिकेच्या महासंगीत सोहळ्यासाठी कलाकार आणि तंत्रज्ञ मंडळींची जय्यत तयारी

मालिका आणि त्यातील प्रत्येक पात्र हे प्रेक्षकांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग आहेत. म्हणूनच तर मालिकेतले सुख-दु:खाचे प्रसंग प्रेक्षकांना आपलेसे वाटतात. मायबाप रसिक प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी स्टार प्रवाह वाहिनी सदैव तत्पर असते. मनोरंजनाच्या प्रवाहातला असाच एक अनोखा प्रयोग ९ फेब्रुवारीला प्रेक्षकांना अनुभवता येणार आहे. ठरलं तर मग आणि लग्नानंतर होईलच प्रेम या दोन मालिकांचा महासंगीत सोहळा सलग तीन तास प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे.

तीन तासांच्या या महासंगीत सोहळ्यात ३३ कलाकारांची फौज दिसणार आहे. अर्जुन, सायली, नंदिनी, पार्थ, जीवा आणि काव्यासह दोन्ही मालिकेतील सर्व मुख्य कलाकार या महासंगीत सोहळ्यात दिसणार आहेत. तीन तासांचा हा अभूतपूर्व सोहळा साकारण्यासाठी १५० पेक्षा जास्त तंज्ञत्र मंडळी तीन दिवस मेहनत घेत होते. शूटिंग वेळेत पूर्ण व्हावं, यासाठी दोन हुबेहुब दिसणाऱ्या सेटची निर्मिती करण्यात आली. कलादिग्दर्शक तृप्ती ताम्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली हे एकसारखे दिसणार दोन सेट उभारले गेले. ठरलं तर मग मालिकेचे दिग्दर्शक सचिन गोखले यांनीच हा तीन तासांचा महासंगीत सोहळा शूट केला आहे. याविषयी सांगताना सचिन गोखले म्हणाले, माझ्यासाठी खरंच हे आव्हानात्मक होतं. स्टार प्रवाहने माझ्यावर हा विश्वास दाखवला, त्यासाठी आभार. ठरलं तर मगच्या कलाकारांसोबत पहिल्या दिवसापासून शूट करतोय मात्र लग्नानंतर होईलच प्रेमच्या कलाकारांसोबत या महासंगीतच्या निमित्ताने पहिल्यांदा काम केलं. प्रत्येक पात्र समजून घेत शूटिंग करत होतो. तीन तासांचा एपिसोड जवळपास तीन दिवस शूट करत होतो. हा अनुभव नक्कीच अविस्मरणीय आहे.

तीन तासांचा हा महासंगीत सोहळा उभा करणं हे सोपं नव्हतं. या आव्हानाविषयी सांगताना स्टार प्रवाहचे बिझनेस हेड सतीश राजवाडे म्हणाले, ‘दोन मालिका ज्यांची स्वतंत्र कथानकं सुरु आहेत त्या एकत्र गुंफून त्याची एक गोष्ट बांधणं आणि त्यात तीन तासांचा भक्कम भाग बनवणं आणि ३३ कलाकार असणं हे आव्हानात्मक होतं. स्टार प्रवाहच्या संपूर्ण टीमने मिळून हे पार पाडलं आहे. रसिकांना मनोरंजनाची मेजवानी मिळेल यात काही शंका नाही. जितकी मेहनत करतो तेवढा रसिकांचा प्रतिसाद मिळतो. त्यामुळे असे नवनवे प्रयोग करताना फार आनंद होतो. मात्री खात्री आहे महासंगीत विशेष भाग उत्तम मनोरंजन करेल.’ सलग तीन दिवस महासंगीत सोहळ्याचं शूटिंग सुरु होतं. सेटवर सगळ्या गोष्टी सुरळीत पार पडाव्यात यासाठी निर्माते सोहम आणि सुचित्रा आदेश बांदेकर आवर्जून उपस्थित होते. मालिकेचं कथानक हा मालिकेचा आत्मा असतो.

त्यामुळे लेखकाच्या खांद्यावर विशेष जबाबदारी असते. त्यात दोन्ही मालिकांच्या कथेला योग्य न्याय देत कथा बांधणं ही अत्यंत जबाबदारीची गोष्ट. लेखिका शिल्पा नवलकर आणि अश्विनी अंगाळ यांनी या महासंगीत सोहळ्याची कथा अतिशय सुबकतेने गुंफली आहे. महासंगीत सोहळ्यात प्रेमाची गोष्ट मालिकेतील मुक्ता-सागर, थोडं तुझं आणि थोडं माझं मालिकेतील तेजस आणि सुख म्हणजे नक्की काय असतं मालिकेतील सर्वांची लाडकी जोडी अर्थात जयदीप-गौरीचा देखील खास परफॉर्मन्स असणार आहे. तेव्हा ९ फेब्रुवारीला नक्की पाहा ठरलं तर मग आणि लग्नानंतर होईल प्रेम मालिकेचा महासंगीत सोहळा सायंकाळी ७ वाजल्यापासून फक्त स्टार प्रवाहवर...



सोलापूर
# दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ३५ हजार ६३७ विद्यार्थी देणार आज शिष्यवृत्ती परीक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ फेब्रुवारी**

२०२४-२५ या शैक्षणिक वर्षात होणाऱ्या इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी सोलापूर शहर, जिल्ह्यातून एकूण ३५ हजार ६३७ विद्यार्थी प्रविष्ट झाले आहेत.

आज रविवार, (दि.९) फेब्रुवारी २०२५ रोजी ही परीक्षा होणार आहे. इयत्ता ५ वीच्या परीक्षेसाठी १३४ तर इयत्ता ८ वीच्या परीक्षेसाठी ८७ असे एकूण २२१ परीक्षा केंद्रे राहणार आहेत. दरम्यान, इयत्ता ५



वीच्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी २३ हजार १०३ तर इयत्ता ८ व्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी १२ हजार ५३४ विद्यार्थ्यांनी आवेदन पत्र भरले आहेत. सकाळी ११ ते १२.३० आणि दुपारी २ ते ३.३० असे दोन सत्रात ही परीक्षा घेण्यात येणार आहे, असे शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी सांगितले.



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### ब्रह्मगर्जना प्रतिष्ठानतर्फे आज भगवान परशुरामांच्या मूर्तींचे वाटप

**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी,**

येथील ब्रह्म गर्जना प्रतिष्ठान या संस्थेतर्फे आगामी भगवान परशुराम जयंतीचे औचित्य साधून 'हर घर परशुराम' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्या अंतर्गत उद्या रविवार दिनांक ९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता प्रातिनिधिक स्वरूपात भगवान परशुराम यांच्या मूर्तींचे वाटप केले जाणार आहे. हा कार्यक्रम इंदिरानगर परिसरातील गणपती मंदिरात पंचांगकर्ते मोहन दाते यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी राघवेंद्राचार्य आद्य गुरुजी यांच्या हस्ते भगवान परशुराम यांच्या मूर्तींचे पूजन करण्यात येणार आहे. तरी या कार्यक्रमास समाज बांधवांनी उपस्थित रहावे, असे आवाहन ब्रह्मगर्जना प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष विक्रम ढोनसळे यांनी केले आहे.

### 'उद्योगवर्धिनी'चा वर्धापन दिन २१ फेब्रुवारीला

**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी,**

उद्योगवर्धिनी संस्थेचा २१ वा वर्धापन शुक्रवार, दि. २१ फेब्रुवारीला हुतात्मा स्मृती मंदिरात सायंकाळी ६ ते ८ वाजेपर्यंत साजरा होणार आहे. यावेळी मी ते आम्ही प्रवास उद्योगवर्धिनीचा हे नाट्यरुपात मांडण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक सीएसआरचे सल्लागार प्रमोद कुलकर्णी उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन अध्यक्षा चंद्रिका चौहान, सचिवा मेधा राजोपाध्ये यांनी केले आहे.

### राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेसाठी समृद्धी घाळे हिची निवड

सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-

पटना, बिहार येथे ९ ते १४ फेब्रुवारी दरम्यान होणाऱ्या ६८ व्या शालेय राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेसाठी समृद्धी घाळे हिची निवड झाली.



छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या राज्य शालेय तलवारबाजी स्पर्धेत १९ वर्षाखालील गटात सेबर या प्रकारात उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे समृद्धीची निवड झाली. समृद्धी ही संगमेश्वर कॉलेजची विध्यार्थिनी असून ती ऑल स्टार फेन्सिंग क्लबची खेळाडू आहे. तिला पवन भोसले हिचे मार्गदर्शन लाभले आहे. तिच्या निवडीबद्दल जिल्हा तलवारबाजी संघटनेचे अध्यक्ष प्रकाश काटुळे, सचिव दीपक शिंदे यांनी अभिनंदन केले.

### सिटी बसला पाठीमागून धडक दिल्याने दुचाकीस्वार जखमी

**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

सिटी बसला पाठीमागून धडक दिल्याने दुचाकीस्वार जखमी झाला. सोमनाथ अण्णप्पा लंगोटे (वय ३०, रा. कासेगाव) असे जखमीचे नाव आहे. ७ फेब्रुवारी रेजी रात्री साडेदहाच्या सुमारास सोमनाथ लंगोटे हे दुचाकीने उळे ते कासेगाव जात होते. त्यावेळी उळे-कासेगाव ब्रिजच्या खाली समोर जात असलेल्या सिटी बसला पाठीमागून धडक दिल्याने त्यास दुचाकीवरून पडून जखमी झाल्याने लंगोटे यांस उपचारासाठी गणेश गायकवाड यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### ट्रॅक्टरच्या धडकेत जखमी झालेल्या दुचाकीस्वाराचा मृत्यू

**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

ट्रॅक्टरच्या धडकेत जखमी झालेल्या दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. अर्जुन प्रकाश जाधव (वय २२, रा. बालाजी नगर, मंगळवेढा) असे मरण पावलेल्याचे नाव आहे. ६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी दुचाकीने बालाजी नगर फाटा ते



बालाजी नगर या रस्तयाने जात असताना समोरून येणाऱ्या ऊसाचा ट्रॅक्टर नं. एमएच १३ एजे ३१६० याच्याशी समोरासमोर धडक झाल्याने अर्जुन जाधव हे गंभीर जखमी झाले होते. त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आला होते. उपचार सुरु असताना शनिवारी जाधव हे मरण पावले. याबाबत सिव्हिल पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# पंढरीत पाच लाखांहून अधिक भाविक दाखल

**माघी एकादशीनिमित्त श्री विठ्ठल, रुक्मिणीची नित्यपूजा भक्तिभावात**





**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ८ फेब्रुवारी-**

माघी शुध्द जया एकादशी निमित्त मंदीर समितीच्या वतीने श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेची नित्यपूजा संपन्न झाली. श्री विठ्ठलाची नित्यपूजा मंदिर समितीचे सदस्य हभप प्रकाश महाराज जवंजाळ तर रुक्मिणी मातेची नित्यपूजा मंदीर समितीचे सदस्य संभाजी शिंदे यांच्या हस्ते सपत्नीक संपन्न झाली.

यावेळी आमदार तुकाराम काते, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, मंदिर समितीच्या सदस्या ड. माधवी निगडे, उपविभागीय पोलिस अधिकारी अर्जुन भोसले, पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, शंकर पटवारी, व्यवस्थापक मनोज श्रोत्री उपस्थित होते.

माघी एकादशी निमित्त श्री विठ्ठल-रक्मिणीच्या दर्शनासाठी सुमारे साडे चार ते पाच लाखांहून अधिक भाविक दाखल झाले आहेत. माघी एकादशी निमित्त मंदीरात विविध फुलांची सजावट करण्यात आली आहे. माघी एकादशीला राज्यातील विविध जिल्ह्यातून तसेच परराज्यातून सुमारे चार लाखांहून अधिक भाविक पंढरीत दाखल झाले आहेत. भाविकांना सुलभ दर्शन व्हावे यासाठी मंदीर समितीच्या



वतीने आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या असून, समितीच्या वतीने दर्शनरांगेत व दर्शन मंडपात, स्वच्छ पिण्याचे पाणी, शौचालये, लाईव्ह दर्शन आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. कायमस्वरूपी व तात्पुरत्या स्वरूपात १२८ सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत. दर्शनरांग दर्शनमंडप, मंदीर व मंदीर परिसर या ठिकाणची वेळोवेळी स्वच्छता करण्यात येत आहे. दर्शनासाठी येणा-या भाविकांसाठी मंदिर समितीच्या वतीने विमा काढण्यात आला आहे. दर्शनरांगेत मोफत खिचडी व चहा वाटप करण्यात येत आहे. चंद्रभागा वाळवंट व पत्राशेड येथे महिला भाविकांच्या सोईसाठी चेंजिंग रूम व दर्शनरांगेत हिरकणी कक्ष उभारण्यात आला असल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

**● टाळ-मृदुंगाच्या गजरात अवघी पंढरी दुमदुमली**

हरिनामाच्या जयघोषात आणि टाळ मृदुंगाच्या गजरात अवघी पंढरी नगरी दुमदूमून गेली आहे. पहाटेपासून चंद्रभागेचे पवित्र स्नान करून परंपरेनुसार शेकडो वारकरी दिंड्यासह प्रदक्षिणा मार्गावर विविध संतांचे अभंग म्हणत प्रदक्षिणा पुर्ण केली. भाविकांनी चंद्रभागा स्नान, नगरप्रदक्षिणा, कळस दर्शन तसेच श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे पददर्शन व मुख दर्शन घेतले. चंद्रभागा वाळवंट, पासष्ठ एकर, मंदिर परिसर भाविकांसह टाळ मृदूंगाच्या जयघोषाने दुमदुमून निघाला आहे

**● चौकशी कक्षातून विविध भाषांमध्ये सूचना**

श्री संत ज्ञानेश्वर दर्शनमंडप येथे चौकशी कक्ष उभारण्यात आला आहे. त्यामध्ये मराठी, इंग्रजी, हिंदी, कन्नड व तेलगू भाषा अवगत असलेले कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून, भाविकांना ध्वनिक्षेपकाव्दारे वेळोवेळी सूचना देण्यात येत आहेत.

**● कडेकोट सुरक्षा व्यवस्था**

पासष्ठ एकर, नदीपात्र, प्रदक्षिणामार्ग, मंदीर परिसर व शहरातील इतर ठिकाणी नगरपालिकेच्या वतीने वेळोवेळी स्वच्छता करण्यात येत आहे. पोलीस प्रशासन व मंदिर समितीच्या वतीने भाविकांच्या सुरक्षिततेसाठी कडेकोट सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे.

## १५ व १६ फेब्रुवारीला प्रिसिजन संगीत महोत्सव

- ▶ प्रख्यात गायक पद्मश्री एम. व्यंकटेशकुमार यांचे गायन
- ▶ कुमार गंधर्वांचे नातू भूवनेश कोमकली यांचे गायन
- ▶ आंतरराष्ट्रीय ख्यातीचे सितारवादक असद खान यांचे सितारवादन
- ▶ डॉ. शंतनू गोखले यांचे संतुरवादन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

प्रिसिजन फाऊंडेशनच्या वतीने येत्या १५ आणि १६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६.२५ वाजता 'प्रिसिजन संगीत महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाचे यंदा दहावे वर्ष असून हुतात्मा स्मृती मंदिर येथे हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती प्रिसिजन फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांनी पत्रकार परिषदेत दिली.

प्रिसिजन कॅमशाफ्ट्स लिमिटेडचे चेअरमन यतिन शहा आणि प्रिसिजन फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांच्या मार्गदर्शनाखाली हा महोत्सव होत आहे. या महोत्सवाच्या पहिल्या दिवशी म्हणजे शनिवार दि.१५ फेब्रुवारी रोजी पहिल्या सत्रात डॉ. शंतनू गोखले यांच्या संतुरवादनाचा अनुभव रसिकांना घेता येईल. त्यांना यशवंत वैष्णव हे तबल्याची साथ करतील. दुसऱ्या सत्रात कुमार गंधर्वांचे नातू आणि प्रख्यात गायक भूवनेश कोमकली यांचे शात्रीय गायन होईल. त्यांना हार्मोनियमवर स्वरूप दिवाण तर रोहित मुजुमदार तबल्याबर साथसंगत करतील. महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे रविवार दि. १६ फेब्रुवारी रोजी पहिल्या सत्रात आंतरराष्ट्रीय ख्यातीचे सितारवादक असद खान यांचे सितारवादन होईल. त्यांना अक्रम खान हे तबला साथसंगत करतील. अंतिम सत्रात किराणा घराण्याचे पद्मश्री पं. एम व्यंकटेशकुमार यांचे शास्त्रीय गायन सादर होईल. त्यांना तबल्याबर केशव जोशी, बेंगळुरू आणि हार्मोनियमवर नागनाथ नागेश हे साथ करतील. शास्त्रीय संगीत आणि कलांचा प्रचार, प्रसार मोठ्या संख्येने प्रेक्षक मिळवणे आणि श्रोत्यांची गोडी वाढवणे या उद्देशाने प्रिसिजन संगीत महोत्सव सुरू झाला आहे. यंदाचे हे दहावे वर्ष आहे. आता प्रिसिजन संगीत महोत्सव ही सोलापूर शहराची ओळख बनली आहे. या पत्रकार परिषदेस माधव देशपांडे उपस्थित होते.

**मंगळवारपासून हुतात्मा स्मृती मंदिरात निशुल्क प्रवेशिका उपलब्ध**

सोलापूरकरांना या महोत्सवाचा आनंद निःशुल्क घेता येईल. निःशुल्क प्रवेशिका (फ्री पासेस) मंगळवार दि. ११ फेब्रुवारी पासून हुतात्मा स्मृती मंदिरात सकाळी ९ ते १२ आणि संध्याकाळी ५ ते ९ या वेळात उपलब्ध होतील. त्यासाठी गुरू वठारे - मो. नं.- ९४२२०६६२१३ यांच्याशी संपर्क साधावा. तसेच रसिकांनी आपले नाव नोंदवून प्रवेशिका घ्याव्यात. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर बसण्याची सोय आहे, अशी माहिती डॉ. सुहासिनी शहा यांनी दिली. रसिक श्रोत्यांनी वेळेपूर्वीच उपस्थित राहून जागतिक पातळीवरील या कलावंतांच्या स्वराविष्काराचा आनंद घ्यावा, असे आवाहन डॉ. सुहासिनी शहा यांनी केले आहे.

## 'समृद्धी'विरुद्ध परिवर्तन आघाडी आमने-सामने

**पोलीस कर्मचारी सोसायटी निवडणूक; १६ फेब्रुवारीला मतदान व मतमोजनीची प्रक्रिया**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

सोलापूर जिल्हा पोलीस सोसायटी निवडणूकीची प्रक्रिया सुरु असून या निवडणुकीत समृध्दी विकास आघाडी आणि परिवर्तन विकास आघाडी आमने सामने आहेत. सोलापूर शहर व जिल्हा पोलीस दलातील कर्मचारी या निवडणुकीत उभे असून या सोसायटीचे एकूण २३४९ सदस्य आहेत. या दोन्ही पॅनलमध्ये २८ उमेदवार एकमेकांविरुद्ध निवडणूक रिंगणात उतरले आहेत.

या निवडणुकीसाठी १६ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून मतदान संपल्यानंतर मतमोजनी होणार असून प्रचारासाठी दोन्ही पॅनलच्या उमेदवारांनी चांगलीच कंबर कसली आहे. यामध्ये समृद्धी विकास आघाडीने मतदारांसमोर त्यांचा अजेंडा सादर करताना आजतागायत ३६ लाख ते चार कोटी पर्यंत संस्थेचा नफा वाढवला आहे. सर्व कार्यभार स्वच्छ व पारदर्शक ठेवण्यात आला आहे. संस्था डिजिटल आणि ऑनलाईन करण्यात आली आहे.

संस्थेच्या संचालक मंडळाने १४ वर्षांमध्ये कोणत्याही प्रकारे कर्जासाठी व तत्सम कामासाठी सभासदांकडे कोणत्याही प्रकारची मागणी केली नाही. संस्थेच्या ऑफिस कर्मचारी बद्दल अत्यंत कडक वर्तन संचालकांनी करून त्यांच्या संस्थेमधील हस्तक्षेप फार मोठ्या प्रमाणात कमी केला आहे तसेच यामध्ये आणखी सुधारणा होईल असे अभिवचन अजेंड्यात दिले आहे. तर परिवर्तन विकास आघाडीने त्यांच्या अजेंडात विकास कार्याचा आढावा मतदारांसमोर सादर केला आहे. या निवडणुकीत तात्यासाहेब पाटील यांनी निवडणूक रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतला होता. याबाबत उमेदवारी अर्ज सहकार उपनिबंधक यांच्याकडे सादर केला होता. दोन्ही पॅनलच्या उमेदवाराकडून आजवर केलेल्या कामांच्या जोरावर विजयाचा दवा करण्यात येतोय. दोन्ही पॅनलच्या उमेदवारांकडून प्रचारावर व मतदारांच्या भेटीगाठींवर विशेष भर दिला जातोय. या निवडणुकीत कोणाचं पारड जड जाणार? याची उत्सुकता मतदारांना लागून राहिले आहे.

## दाराशा हॉस्पिटल कंपाउंड लगतचे खोके हटविले

**महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाची कारवाई**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने लष्कर येथील महापालिकेच्या दाराशा हॉस्पिटलच्या कंपाऊंड लगतचे दूध पंढरी खोके जेसीबीच्या साह्याने हटविण्यात आले.



महापालिका आयुक्त शितल तेली -उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त तैमूर मुलाणी आणि सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहरात रस्त्यावर तसेच फुटपाथवर रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत आज लष्कर येथील दाराशा हॉस्पिटलच्या कंपाऊंड लगतचे खोके जेसीबीच्या साह्याने काढण्यात आले. त्या खालील कट्टाही जमीनदोस्त करण्यात आला. पोलिस बंदोबस्तात जेसीबीच्या सहाय्याने ही करवाई करण्यात आली. या मोहिमेत महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे , मुर्तुजा शहापुरे, सुफियान पठाण आदींसह पोलीस कर्मचारी उपस्थित होते. सोलापूर शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी रस्त्यावर तसेच फुटपाथवर अतिक्रमण करू नये. अतिक्रमण आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे यांनी दिला आहे.

## कुत्रा आडवा आल्याने दुचाकीस्वार जखमी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी -**

कळमण ते पडसाळी रस्त्यावर कुत्रा आडवा आल्याने दुचाकीस्वार घसरून पडून जखमी झाला. शकील नजीर शेख (वय ४२,रा. पडसाळी) असे जखमीचे नाव आहे.

७ फेब्रुवारी रोजी रात्री शकील शेख हे दुचाकीवरून कळमण ते पडसाळी रस्त्याने जात होते. त्यावेळी पडसाळीजवळ कुत्रा आडवा आल्याने त्यांची दुचाकी घसरून अपघात झाला. त्यामध्ये शकील शेख हे जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात मुलगा शाकीर शेख यांनी दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## होम मैदानावर १२ फेब्रुवारीपासून 'इलेक्ट्रो'

**● यंदा रौप्य महोत्सवीवर्षात मोठ्या स्वरूपात आयोजन; ३०० स्टॉल्स राहणार उपलब्ध**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

सोलापूर इलेक्ट्रॉनिक्स डिलर्स असोसिएशन द्वारा इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्यूटर, टेलिकम्युनिकेशन, होम अप्लायन्सेस, सोलार सिस्टम, फिटनेस इक्विपमेंटस्‌चे 'इलेक्ट्रो २०२५' प्रदर्शनाचे आयोजन दि. १२ ते १८ फेब्रुवारी या कालावधीत होम मैदानावर करण्यात आले आहे, अशी माहिती सेडाचे अध्यक्ष आनंद येमुल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यंदा इलक्ट्रो प्रदर्शनाचे शार्प कंपनी हे मुख्य प्रायोजक तर हाईफा इलेक्ट्रिकल्स्‌ व एमआयटी विश्वप्रयाग युनिर्व्हसिटी हे सह प्रायोजक आहे. या प्रदर्शनाचे उद्‌घाटन मंगळवार दि. १२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते व शार्प बिझनेस सिस्टम्स्‌ इंडियाचे बिझनेस हेड वसंत जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे, असे इलेक्ट्रो चेअरमन दीपक मुनोत यांनी सांगितले.

सलग ७ दिवस चालणाऱ्या इलेक्ट्रो या प्रदर्शनाचे हे २५ वे वर्ष आहे. दररोज दुपारी ४ ते रात्री ९.३० व रविवारी सकाळी ११ ते रात्री ९.३० पर्यंत चालणाऱ्या या प्रदर्शनामध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांचा सहभाग राहणार आहे. यामध्ये एलईडी, फ्रिज, साईड बाय साईड फ्रिज, एअर कंडीशनर, म्युझिक सिस्टीम, वॉशिंग मशीन, डिश टिव्ही, मायक्रोव्हेव ओव्हन, व्हॅक्यूम क्लिनर, एअर कंडीशनर, सोलर सिस्टीम, गॅस गिझर, मोबाईल, टॅब, आय पॅड, टेलीफोन, मिक्सर, फूड प्रोसेसर, आटा चक्की, एअर कुलर, वॉटर प्युरीफायर, स्टॅबीलायझर,चिमणी हुड, कॉम्प्युटर, लॅपटॉप, प्रिंटर, ऑफिस ऑटोमेशन सिस्टिम्स, फिटनेस इक्विपमेंटस्‌ इत्यादी या प्रदर्शनामध्ये उपलब्ध राहणार आहेत. ग्राहकांना विविध नमुन्यात व विविध रंगात आकर्षक किंमतीत निरनिराळ्या योजनांखाली वस्तू खरेदी करता येतात. तसेच विविध फायनान्स कंपनीच्या माध्यमातून शुन्य टक्के व्याज दराने कर्जाची उपलब्धता देखील केली जाते. सेडातर्फे आयोजित केलेल्या इलेक्ट्रो २०२४ ला स्टॉल धारकांनी प्रचंड प्रतिसाद दिला होता. यावर्षी सुमारे ३०० स्टॉल्स्‌ असणार असून सुमारे एक लाख पेक्षा जास्त ग्राहक प्रदर्शनास भेट देतील. प्रदर्शनाचे यंदाचे खास आकर्षण म्हणजे पाच वेगळे आंतरराष्ट्रीय पद्धतीचे जर्मन हँगरमध्ये प्री फॅब्रीकेटेड व कंपनी फिटेड स्टॉल्स्‌ असणार आहेत. दुचाकी साठी होम मैदान तर चार चाकी वाहनांसाठी ग्राऊंडच्या आसपासच्या जागा पार्किंगसाठी ठेवण्यात आले आहे.या प्रदर्शनामध्ये ठिकठिकाणी ग्राहकांना बसण्याची सोय, मोफत पार्किंग तसेच शुध्द पिण्याचे पाण्याची सोय व केलेली आहे. भेट देणाऱ्या ग्राहकांना दररोज लकी व शेवटच्या दिवशी बंपर ड्रॉ काढण्यात येणार आहे. सर्व स्टॉलमध्ये जवळपास ४०० विविध पदवीधर व एमबीए विद्यार्थ्यांना कंपनी कडून ट्रेनिंग देवून ग्राहकांना माहिती देण्यात येणार आहे. या प्रदर्शनाच्या संपूर्ण संयोजनासाठी सेडाद्वारे विविध समित्या कार्यरत आहे. दिव्यांग व्यक्तिंना देखील प्रदर्शन अनुभवता येणार असुन त्यांच्यासाठी व्हील चेअरची विशेष सोय करण्यात आली आहे. दरम्यान, दररोज रक्तदानउपक्रम घेतला जाणार आहे. यंदाचे वर्षी गो ग्रीन या संकल्पनेतून पेट्रोल, डिझेल मुक्त ,एमएसईबीची विद्युत सुविधा वापरण्यात येणार असल्याचे इलेक्ट्रो चेअरमन दिपक मुनोत यांनी सांगितले. या प्रदर्शनातही ४ स्टॉल्स्‌ सामाजिक संस्थांना उपलब्ध करुन दिले असून इच्छुक सामाजिक संस्थांनी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेस सेडाचे सचिव भुषण भुतडा, खजिनदार सुयोग कालाणी, सहसचिव हरीष कुकरेजा, उपाध्यक्ष डॉ. सूरजरतन धुत, संचालक यल्लप्पा भोसले, चंद्रकांत शाहपुरे, बसवराज नवले, रवींद्र पाचलगे, संस्थेचे माजी अध्यक्ष जितेंद्र राठी, शिवप्रकाश चव्हाण, खुशाल देढीया, ईश्वर मालू, केतन शाह, विपीन कुलकर्णी, सदस्य विजय टेके आदी उपस्थित होते.

## बेवारस चारचाकी व दुचाकी वाहनांची माहिती प्रसिद्ध

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी -**

सोलापूर तालुका पोलीस ठाण्यातील बेवारस अवस्थेत असलेल्या चारचाकी व दुचाकी वाहनांची माहिती सोलापूर ग्रामीण पोलसांच्या बेवसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे. चारचाकी व दुचाकी वाहनांचा मालकी हक्क कोणीही सांगितला नाही, अशी चारचाकी वाहने व दुचाकी वाहने सोलापूर तालुका पोलीस ठाण्यात ब-याच कालावधी पासुन पडुन आहेत. चारचाकी व दुचाकी वाहने पोलीस ठाणेच्या आवारात बेवारस अवस्थेत पडुन असलेल्या वाहनांचे मॉडेल नंबर, चेसी नंबर व इंजिन नंबर



याची माहिती सोलापूर ग्रामीण पोलीस दलाच्या https://solapurpolice.gov.in या बेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे. सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या वेबसाईटवर जाऊन वाहनांची माहिती पडताळुन पहावी. ज्या कोणा नागरिकांचे वाहने असतील त्यांनी पोलीस ठाणेस त्याचेकडे असलेल्या उपलब्ध कागदपत्रासह पोलीस ठाणेस यावे. वर नमूद वेबसाईट मधील वाहनांचे मालकी हक्क सांगणारे कोणी त्याचेकडील पुरावे घेऊन आले नाही तर वेबसाईट मध्ये नमूद केलेल्या वाहनांचे कोणीही मालक नाहीत असे गृहीत धरून बेबारस वाहनांची पुढील योग्य त्या कायदेशीर मार्गाचा अवलंब करून निर्गती करण्यात येईल असे उपविभागीय पोलिस अधिकारी संकेत देवळेकर यांनी सांगितले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०२४

**ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।**
**ताटी उघडा ज्ञानेश्वरा।।**

आजच्या विज्ञान युगातही आपणाला अंधश्रद्धा व अज्ञान ब-याच प्रमाणात पहायला मिळते. केवळ अज्ञानी किंवा अडाणी लोकच अंधश्रद्धा बाळगतात असे नाही तर सुशिक्षितही अंधश्रद्धा बाळगत असल्याचे आपण पाहतो. आज जर ही परिस्थिती आहे, तर सुमारे सव्वा सातशे वर्षापूर्वी अंधश्रद्धा आणि अज्ञान किती बळकट असेल याची आपल्याला कल्पना येऊ शकेल. अशा कठीण परिस्थितीमध्ये स्वतःला स्वतःशिवाय आधार नसलेल्या निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई या भावंडांनी समाजाची अंधश्रद्धात्मक कोंडी फोडण्यासाठी केलेला प्रत्येक शब्दात सांगणे तसे कठीण आहे. असे असले तरीही हे सत्यच आहे की या भावंडांनी समाजाला अज्ञान, विषमता, अन्याय, अंधश्रद्धा आदींच्या विषैली परिस्थितीतून बाहेर काढण्याचा स्तुत्य प्रयत्न केला. या चार भावंडांपैकी आपण मुक्ताईने जो प्रयत्न केला आहे तो प्रयत्न मुक्ताईचा ज्ञानप्रकाश या सदरातून पाहत आहोत. मुक्ताईने निवृत्ती, ज्ञानदेव, सोपानदेवांप्रमाणे विविध प्रकारचे अभंग लिहिले आहेत. या विविध प्रकारात पंढरी माहात्म्य, नामपर अभंग, संतपर अभंग, उपदेशपर अभंग, कुट अभंग, ताटीचे अभंग तसेच मुक्ताई चांगदेव संवादपर अभंगाचा समावेश आहे. मुक्ताईच्या या विविध अभंगातील ताटीपर असलेले अभंग वारकरी सांप्रदायात जास्त सुपरिचित असल्याचे दिसून येते. श्रीज्ञानेश्वरी सारखा महान ग्रंथ लिहिणाऱ्या श्रीज्ञानदेवांना प्रसंगानुरूप भावनिक मार्गदर्शन करून विश्वाच्या कल्याणासाठी प्रवृत्त करण्याचे महान कार्य मुक्ताईने ताटीच्या अभंगातून केल्याने मुक्ताईची महानता वारकऱ्यांच्या हृदयात स्थान करुन बसली आहे. समाजाने केलेले आर्थिक, भावनिक, सामाजिक, मानसिक व शारीरिक घाव सहन न झाल्याने उद्विग्न होऊन झोपडीचे दार बंद करून नको हे जीवन या मानसिकतेत बसलेल्या आपल्या बंधूला, ताटी उघडा ज्ञानेश्वरा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा।। या भावनिक हाकेतून ज्ञान व कर्तव्य आणि जबाबदारीचा मार्ग दाखवत ज्ञानदेवांना झोपडीचे दार उघडायला भाग पाडलेल्या मुक्ताईच्या शब्दांना अनुभवण्याची संधी संपादकांनी तुम्हा-आम्हाला, मुक्ताईचा ज्ञानप्रकाश या सदरातून उपलब्ध करून दिली आहे, हे खरोखरच भाग्य स्वरूप आहे. निवृत्ती, ज्ञानदेव व सोपान देवांप्रमाणे प्रत्येक बंधूंनी आपल्या भगिणीला मुक्ताई सारखा लळा लावला, तिचा आदर केला, तसेच प्रत्येक भगिणीने मुक्ताईप्रमाणे आपल्या भावंडांवर जिवापाड निस्वार्थ प्रेम केले तर समाजातील, भावा-भावातील, बहिण-भावातील, बहिणी-बहिणीतील वाद-विवादाचे चित्र नष्ट होऊन केवळ आनंदच-आनंद अनुभवायला मिळेल, असे आम्हास वाटते. आपल्या सर्वांच्या आनंदात भर पडण्यासाठीच हे सदर आहे, असे आमचे मत आहे. या सदराचा सहवास आपणास आनंदाची अनुभूती देवो अशी मुक्ताई चरणी प्रार्थना. जय जय राम कृष्ण हरी ।



**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : रविवार**
**दि. ९ फेब्रुवारी २०२५**
**विक्रम संवत् २०८०-८१**
**शके - १९४६**
**संवत्सर - क्रोधी नाम**
**मास - फाल्गुन**
**शु. द्वादशी (१९.२५)**
**ऋतु - वसंत**
**नक्षत्र - आर्द्रा (१७.५२)**
**योग - विष्कंभ (१२.०६)**
**करण - बव (०७.४८)**

**दिनविशेष - चांगला दिवस, गोंदवले महाराज जयंती**

**....राहू काल....**
**रविवार : दु.४.३० ते ६.००**
**सोमवार : स. ७.३० ते ९.००**
**मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०**
**बुधवार : दु. १२ ते १.३०**
**गुरुवार : दु. १.३० ते ३.००**
**शुक्रवार : स.१०.३० ते १२**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

### राशीभविष्य

**मेष** : मन उत्साही राहिल्यामुळे आजचा दिवस चांगला जाईल. लांब रहात असलेल्या नातेवाईकांकडून फायदा मिळेल. व्यापार चांगला चालेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**वृषभ** : आपल्याला नवीन संधी मिळतील. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. कार्यक्षेत्रात प्रगती होईल. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका. प्रवास सुखकारक राहील.

**मिथुन** : आर्थिक फायदा झाल्यामुळे आनंदी रहाल. व्यापारात प्रगती होईल. खाण्या पिण्याकडे लक्ष द्या. कौटुंबिक वातावरण सहकार्याचे राहील.

**कर्क** : मुलांच्या कार्यक्षेत्रातील शुभ बातम्या प्राप्त होतील. नौकरीमध्ये अधिकारी आपल्याला सहकार्य करतील. घाई गडबडीने कोणतेही काम करू नका.

**सिंह** : कौटुंबिक वातावरण आनंदी असल्यामुळे आपले कामात लक्ष लागेल. सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होईल. पैशाच्या बाबतीत असलेली चिंता दूर होईल. वहान चालवतांना सावधानी बाळगली पाहिजे.

**कन्या** : मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मुलांचे प्रेम मिळेल. व्यापारात नवीन योजनाचा शुभारंभ होईल. आपल्या व्यसनांना चालना देऊ नका.

**तुळ** : चांगल्या लोकांच्या गाठी होतील ते आपले हिंतचिंतक असतील. प्रवास सावधानीने करावा. योजना कार्यान्वयीत होतील. एखादे अवघड काम झाल्याने आनंदी रहाल.

**वृश्चिक** : सकारात्मक विचार कराल. आपल्या कामाचे समाजात प्रशंसा होईल. व्यापारिक कामे यशस्वी होतील. जोखमीचे काम करण्यापासून सावधान रहा.

**धनु** : शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा:पश्चिम
आनंदी बातमी कळेल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. स्वतःच्या विचाराने कामे केले तर फायदेशीर रहाल. आर्थिक योजना वेळेत पूर्ण होतील. आळस करू नका.

**मकर** : नवीन कामाशी संबंध येण्याचा योग आहे. कोणत्याही कामात स्पर्धक म्हणून राहण्यातच आपला फायदा आहे. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**कुंभ** : सुख समृध्दीत वाढ होईल. अपूर्ण कामे पूर्ण होण्याचे मार्गावर. प्रवासाचा योग आहे. व्यापार व्यवस्याय भरभराटीवर. निष्कारण वाद विवाद टाळा.

**मीन** : आपले स्वप्न पूरे होतील. जुन्या संबंधामुळे कामे यशस्वी पार पडतील. कामाची गती अशीच राहू द्या. व्यापारा निमित्ताने केलेला प्रवास सफल होईल. अश्वासन देऊ नका.

# विवाहितेचा छळ; दोन गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

शहरातील सलगर वस्ती आणि एमआयडीसी पोलिस ठाण्यात विवाहितेच्या छळप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

सोनिका अक्षय गायकवाड (वय २६, रा. सेटलमेंट फ्री कॉलनी नं. ६, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती अक्षय गायकवाड, सासरे विठ्ठल गायकवाड, सासू वैशाली गायकवाड, जाऊ श्रीगंधा गायकवाड (रा. सर्वोदय कॉलनी दर्गा, मुंढवा, पुणे) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जानेवारी २०२४ ते जून २०२४ या कालावधीत सोनिका या सासरी पुणे येथे नांदण्यास होत्या. त्यावेळी पती अक्षय व त्याच्या घरातील लोकांनी सोनिका हिस लग्नात मानपान केला नाही, सोने दिले नाही, माहेरून पैसे घेऊन ये



म्हणून शिवीगाळ दमदाटी करून मारहाण केली व छळ केला. म्हणून सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस नाईक जाधव पुढील तपास करीत आहेत.

तर दुसऱ्या घटनेत अश्विनी नागेश कुलकर्णी (वय ४४, रा. कर्णिक नगर, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती नागेश श्रीपाद कुलकर्णी (वय ४७, रा. कर्णिक नगर, सोलापूर) याच्याविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सन २०२४ ते ७ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत अश्विनी या सासरी नांदत होत्या. त्यावेळी पती नागेश याने अश्विनी यांना तु मला आवडत नाहीस, आपल्या लग्नाचा दिवस म्हणून माझ्या आयुष्याचा काळा दिवस आहे असे म्हणून घालून पाडून बोलून अश्विनीचा मानसिक छळ केला. तसेच पैशाच्या कारणावरून एक रूपयाची संसाराला मदत नाही, तु माझ्या दारात पडलेली कुत्री आहे, येथून निघून जा म्हंटलं तरी जात नाही, फुकटच खाती, कितीही त्रास दिला तरी इथच राहतेस असे म्हणून मारहाण करून ठार मारण्याची धमकी दिली. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार डोके पुढील तपास करीत आहेत.

## संघ हीच जीवनगाथा



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.

**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती
मो. ९९६००५३५२१

### अलकः- (४६) उद्दीपक

जुलै १९३७ साली सावरकरांची रत्नागिरीच्या स्थानबद्धतेतून सुटका झाली. स्वातंत्र्यवीर सावरकर ही एकटी व्यक्ती नाही, तर ती एक उद्दीपक शक्ती आहे असे डॉक्टरजी नेहमी म्हणत. अशा उद्दीपक शक्ती समवेत डॉक्टरांनी दौरा केला. या दौऱ्यात नागपूर, चांदा, वर्धा, भंडारा अकोला, उमरेड आदी विदर्भाच्या ठिकाणी ते दोघे गेले. त्या दोघांचा संचार चांगलाच गाजला. संघाच्या रुपाने डॉक्टरांनी हिंदुत्वाचे खेळवलेले जागते चैतन्य पाहूनच, असाच हिंदू राष्ट्रवादाचा प्रचार अखंडपणे चालवा. असा स्वातंत्र्यवीरांनी धन्योद्गार काढून संघाला शुभाशीर्वाद दिले. स्वा. सावरकर कौतुकाने म्हणाले रा.स्व. संघ 'हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व' या विचाराची भावी पिढी निर्माण करण्याचे एकमेव स्थान आहे. त्याची फलश्रुती सांगताना डॉक्टर म्हणतात या उद्दीपित शक्तीच्या दर्शनाने- राष्ट्रभक्तीने प्रेरित संघ स्वयंसेवक तयार झाले. त्यामुळे समुद्रमंथनाच्या वेळी जी परिस्थिती निर्माण झाली होती, तीच आता झालेली आहे. लोकात नवचैतन्य स्फुरण पावले आहे आणि आपले आणि परके या सर्वांचेच विचारमंथन सुरू झाले आहे; हेही नसे थोडके. या विचार मंथनातून आता निश्चितच अमृत निघणार; आणि मग संघ मृत होणार नाही; असे झाले तर कदाचित आपलेच प्रयत्न धारातीर्थी पडतील असा धक्का शत्रूला बसला होता । । तेव्हा पण व आता पण ।।

**- क्रमशः**




# 'भीमशक्ती'तर्फे पाणी बॉटल वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

रमाई यांच्या जयंतीनिमित्त मिरवणुकीत पाणी बॉटल वाटप करण्यात आले. भीमशक्ती संघटनेचे शहर युवक अध्यक्ष मयूर तळभंडारे यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले होते.

याप्रसंगी सीए धीरज जवळकर, भीमशक्ती संघटनेचे शहर अध्यक्ष उमेश सुरते, प्रदेश सरचिटणीस सुबोध वाघमोडे, पश्चिम महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस राजा कदम, माया कांबळे, रोहित खिलारे, अमोल गोडसे, पैलवान लोंढे, प्रकाश बनसोडे आदींसह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यागमूर्ती माता रमाई यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकीतील अनुयायांना पाणी बॉटल वाटप करण्यात आले.

# मनोज व्हटकर यांना ल. गो. काकडे स्मृती पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेच्यावतीने दरवर्षी देण्यात येणारा कल्पतरुकार कै. ल.गो. काकडे स्मृती पुरस्कार पत्रकार मनोज व्हटकर यांना देण्यात येणार असल्याची घोषणा संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी पत्रकार परिषदेत केली. पुरस्कार वितरण कार्यक्रम गुरुवार दि. १३ फेब्रुवारी रोजी हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात (ॲम्फी थिएटर) सायंकाळी ६ वाजता होणार आहे. पाच हजार रुपये रोख, सन्मानपत्र, शाल, पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यावेळी पत्रकारांमधील साहित्यिक, ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी यांचा लेखन साहित्याबद्दल विशेष सन्मान करण्यात येणार



असून तेच या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. पुरस्कार प्रदान कार्यक्रम ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ वक्ते चंद्रशेखर टिळक (मुंबई) यांच्या हस्ते होणार आहे.यावेळी त्यांचे 'भारतीय व्यवस्था २०२५ आणि नंतर' या विषयावर व्याख्यान होणार आहे. या पत्रकार परिषदेस दत्तात्रय आराध्ये, हेमा चिंचोळकर, विजय कुलकर्णी, सतीश पाटील, प्रमोद जोशी आदी उपस्थित होते.



# माता रमाई यांच्या जयंतीनिमित्त पी. बी. ग्रुपच्या वतीने अभिवादन

**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

मिलिंद नगर बुधवार पेठ येथे त्यागमूर्ती माता रमाई यांच्या १२७ व्या जयंती निमित्त प्रबुद्ध भारत तरुण मंडळ (पी.बी.ग्रुप) च्या वतीने अभिवादन करण्यात आले. प्रारंभी त्यागमूर्ती माता रमाई यांच्या प्रतिमेस प्रबुद्ध भारत तरुण मंडळाचे ज्येष्ठ कार्यकर्ते भारत व गौतम इंगळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून सामूहिक बुद्ध वंदना घेऊन अभिवादन करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा प्रबुद्ध भारत तरुण मंडळाचे प्रमुख मार्गदर्शक आनंद चंदनशिवे माजी नगरसेवक गणेश पुजारी, अविनाश भडकुंबे, चाचा सोनवणे ,गौतम नागटिळक, गोपीनाथ जाधव, आरोग्य निरीक्षक धीरज वाघमोडे, आरोग्य निरीक्षक बसू जमादार, पी.बी. ग्रुप अध्यक्ष आदित्य चंदनशिवे, उपाध्यक्ष मनोज थोरात,कार्याध्यक्ष बाबा गायकवाड, अक्षय मस्के, अजय इंगळे, सुरज गायकवाड, हरी बच्चुवार, सुनील गायकवाड, अमर सोनकांबळे, प्रथमेश सुरवसे, राज कांबळे, नितीन शिरसट, अभिजीत गायकवाड, बाबू ढाले, महेश शिंदे, धोंडीबा कापुरे, प्रतिक चंदनशिवे, सतीश अड्डाकुल, भीमा मस्के, रोहन तळभंडारे उपस्थित होते.

# ऑर्किड महाविद्यालयातील एआयडीएस विद्यार्थ्यांचे हॅकेथॉनमध्ये यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

अभियांत्रिकी क्षेत्रात अत्यंत कठीण व स्पर्धात्मक समजले जाणारे हॅकेथॉन या प्रतियोगितेत नागेश करजगी ऑर्किड कॉलेज ऑफ इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजी या महाविद्यालयातील एआयडीएस विभागातील अंतिम वर्षात शिकत असलेला शादाब पठाण या विद्यार्थ्याने आयआयटी बॉम्बे येथे आयोजित करण्यात आलेल्या एनपीसीआय व आय-हॅक या स्पर्धेत अनुक्रमे प्रथम व तृतीय क्रमांक



पटकावत ८० हजारांचे पारितोषिक मिळवले आहे व तसेच तृतीय वर्षात शिकत असलेल्या आरती धुपड, श्रुती वाघमारे, वर्षा देवदास या विद्यार्थिनींनी कोल्हापूर येथे डॉ. डी.वाय. पाटील विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या रामराव अदिक अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय महिला हॅकेथॉन स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावत पाच हजारांचे पारितोषिक जिंकले आहे.

यश मिळवण्याकरिता वरील सर्व विद्यार्थ्यांना प्रा. गुलनाज चंडकी आणि प्रा. आश्लेषा अधटराव यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, सचिव व तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. के सोनगे, उपप्राचार्य डॉ. एस. एस. मेतन, उपप्राचार्य व्ही. के. पत्की, संगणक विभाग प्रमुख डॉ. व्ही. व्ही. बाग आणि एआयडीएस विभाग प्रमुख डॉ. मिथुन पाटील यांनी अभिनंदन केले.



# राजराजेश्वरी शाळेतील बाल आनंद मेळाव्यात १४ हजारांची उलाढाल

**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

विनायक नगर येथील राजराजेश्वरी बालक मंदिर प्राथमिक शाळेत बाल आनंद मेळावा उत्साहात पार पडला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका वैशाली कुंभार होत्या. प्रमुख अतिथी मुख्याध्यापक ज्ञानेश्वर म्हेत्रे, माता पालक संघाच्या मेघा खद्दे यांच्या हस्ते स्काऊट गाईडचे जनक लॉर्ड बेडन पावेल व वीरतपस्वी व तपोरत्नं यांच्या प्रतिमेचे पूजन करुन उदघाटन करण्यात आले. या आनंद मेळाव्यात १६४ स्टॉल मांडण्यात आले होते. विद्यार्थ्यांना १४ हजार रुपये नफा झाला. स्काऊट गाईडच्या विद्यार्थ्यांना श्रमाचे महत्त्व, सत्कर्म, व्यवहार ज्ञान, ग्राहक संवाद, वस्तूंची नीटनेटकेपणा व मांडणी याविषयी स्काऊट गाईडचे पथक प्रमुख हणमंत कुरे, अमोल गुड्डेवाडी, वैशाली गुजर, सुजाता फुलारी आदींनी मार्गदर्शन केले. बाल आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी भेळ, पाणीपुरी, कचोरी, लस्सी, आईसक्रीम, पावभाजी पालेभाज्या, फळभाज्या, ज्युस, स्नॅक्स, वेगवेगळ्या प्रकारचे मनोरंजन खेळ आदी विविध प्रकारचे स्टॉल मांडण्यात आले होते.

# टीजेएसबी सहकारी बँकेत सिटीझन को-ऑपरेटिव्ह बँक विलीन

**तभा वृत्तसेवा,**
**ठाणे, दि. ८ फेब्रुवारी-**

नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रात देशात अग्रणी असलेल्या टीजेएसबी सहकारी बँकेत गोवा, वास्को दि गामा येथील १९८४ पासून कार्यरत असलेल्या दि सिटीझन को-ऑपरेटिव्ह बँकेचे विलीनकरण झाले आहे. भारतीय रिझर्व बँकेच्या पुढाकाराने विलीनकरण प्रक्रिया पूर्ण झाली आहे. या बाबतचे प्रसिद्धी पत्रक भारतीय रिझर्व बँकेने दिनांक ७ फेब्रुवारी रोजी आपल्या संकेतस्थळावर प्रसारित केले आहे. विलिनकरणाच्या सर्व नियम आणि अटींची पूर्तता करून झालेल्या प्रक्रियेप्रमाणे सोमवार दिनांक दहा फेब्रुवारी पासून सिटीझन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या गोवा येथील सर्व सहा शाखा टीजेएसबी सहकारी बँकेच्या शाखा म्हणून कार्यरत होतील.

या सर्व सहा शाखातून टीजेएसबीच्या सर्व अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त ग्राहक सेवा तात्काळ दिल्या जाणार आहेत. या विलीनकरणामुळे टीजेएसबी बँकेच्या एकूण शाखांची संख्या एकशे त्रेचाळीस (१४३) वरून एकशे एकूणपन्नास (१४९) इतकी झाली आहे. तर, गोव्यातील शाखांची संख्या बारा (१२) झाली आहे. टीजेएसबी सहकारी बँकेने विलीन झालेल्या सिटीझन को-ऑपरेटिव्ह बँकेचा सर्व अधिकारी आणि कर्मचारी वर्ग सामावून घेतलेला आहे. या विलीनकरणामुळे टीजेएसबी बँकेचा गोव्यातील पाया अधिक सक्षम झाला असून, या विस्तारामुळे टीजेएसबी बँक गोवेकरांना अधिक तत्पर सेवा देईल असे टीजेएसबी सहकारी बँकेचे अध्यक्ष शरद गांगल यांनी या विलीनकरणाबाबत म्हटले आहे.

ही विलीनकरण प्रक्रिया हा सहकाराचा भाग असून यामुळे गोव्यातील सहकारी बँकिंग विस्तारेल असे टीजेएसबी सहकारी बँकेचे अध्यक्ष शरद गांगल यांनी सांगितले. पाच राज्यात कार्यरत असलेल्या टीजेएसबी सहकारी बँकेची पारदर्शी कार्यपद्धती लक्षात घेऊन भारतीय रिझर्व बँक टीजेएसबीला प्रस्ताव देते. त्यानुसार टीजेएसबी बँक कार्यवाही पूर्ण करते. ग्राहक हित, नागरी सहकारी बँक सक्षमीकरण याला टीजेएसबी प्राधान्य देते, असे शरद गांगल म्हणाले. १९७२ स्थापनेपासून टीजेएसबी सहकारी बँकेने स्व-नियमन करून वैशिष्ट्यपूर्ण कारभार केल्याने गेल्या त्रेपन्न वर्षात २३ कोटीं पर्यंतचा व्यवसाय केला आहे, असेही अध्यक्ष शरद गांगल यांनी नमूद केले.

# दिल्लीतील साहित्य संमेलन मराठी माणसांचे महत्त्व वाढवणार

## 'मराठी भाषा, मराठी माणूस आणि दिल्ली' या विषयावरील परिसंवादात मान्यवरांच्या भावना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

'दिल्लीत होणारे मराठी साहित्य संमेलन दिल्लीतील मराठी माणसाचे महत्व वाढवणारे ठरेल', अशा भावना 'मराठी भाषा, मराठी माणूस आणि दिल्ली' या परिसंवादात मान्यवरांनी व्यक्त केल्या. दिल्ली हे शहर महाराष्ट्रापासून काहीसे दूर असले तरी दिल्लीचे तख्त मजबूत राखण्यासाठी कायम मराठी माणूस मजबुतीने उभा राहिला आणि यामध्ये मराठी भाषा, मराठी संस्कृती आणि एकूण मराठीपणाचे मोठे योगदान होते, अशाही भावना मान्यवरांनी बोलून दाखवल्या. सरहद, पुणे आयोजित ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने या परिसंवाद




पार पडला.

मराठी साहित्य संमेलनानिमित्त महाराष्ट्रासह दिल्ली आणि देशभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन होत आहे. याचाच एक भाग म्हणून दिल्लीत परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये खा. सुप्रिया सुळे, खा. अरविंद सावंत, खा. डॉ. अमोल कोल्हे, खा. डॉ. मेधा कुलकर्णी, केंद्रीय शिक्षण मंत्रालयातील अतिरिक्त सचिव आनंद पाटील, भारतीय डाक विभागातील संचालक सौरभ देशमुख, दिल्ली मराठी प्रतिष्ठानचे वैभव डांगे, दिल्लीस्थित जेष्ठ पत्रकार सुनील चावके यांनी विचार व्यक्त केले. दिल्लीस्थित पत्रकार प्रशांत वाघाये आणि नुपूर साळुंखे यांनी हा संवाद घडवून आणला.

साहित्य संमेलनाच्या निमित्ताने विविध उपक्रम राबवले जात आहेत. साहित्य संमेलनाची संपूर्ण आयोजक चमु आणि त्यांचे नेतृत्व करत असलेले संजय नहार हे अत्यंत उत्कृष्ट आयोजन करत आहेत. यापूर्वीही त्यांनी अनेक चांगले कार्यक्रम राबवले आहेत. दिल्लीत होत असेलेले ९८ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन ऐतिहासिक होईल, असा विश्वास खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केला. आनंद पाटील, सौरभ देशमुख, डॉ. मेधा कुलकर्णी, अमोल कोल्हे, वैभव डांगे, सुनील चावके मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रफुल्ल यांनी तर आभा लेशपाल जवळगे यांनी मानले.

### दोनच नेते रमतात, इतर दूरच

एकेकाळी यशवंतराव चव्हाण, मधू लिमये, वसंत साठे, प्रमोद महाजन अशी दिग्गज नेते मंडळी दिल्लीत होती. या सर्वांची आठवण परिसंवादात सहभागी सर्व मान्यवरांनी काढली. आज केवळ शरद पवार आणि नितीन गडकरी हे दोनच नेते मराठी वजनदार नेते म्हणून दिसतात, इतर लोकं मात्र इथे रमताना दिसत नाही, असाही सूर या परिसंवादात उमटला.

### पुढच्या पिढीला बोलता यावे

महाराष्ट्रातील मराठी माणूस दिल्लीत राहतो, त्यांच्या पुढच्या पिढ्यांना आपली भाषा नीट बोलता आली पाहिजे, ती शिकवली गेली पाहिजे. मराठी भाषिक लोकांचं सण-उत्सवानिमित्त एकत्रीकरण झालं पाहिजे, यासाठी महाराष्ट्र सरकारने ठोस पावले उचलली पाहिजेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### दहिटणे येथील जि. प. मराठी शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**अक्कलकोट, दि. ८ फेब्रुवारी-**

दहिटणे येथे जिल्हा परिषद मराठी शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन साजरे झाले. बऱ्याच दिवसांपासून बंद असलेले हे स्नेहसंमेलन दोन वर्षे झाली सलग आणि चांगल्या पद्धतीने करण्याचा प्रयत्न सरपंच नितीन मोरे यांच्यामुळे झाला. यावेळी गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबळे, सरपंच नितीन मोरे, उपसरपंच विकी चौधरी, ग्रामपंचायत सदस्य अंबू कटकधोंड, शरणू कोळशेट्टी, शहनाज मुजावर, चंद्रकला काबळे, दादा शेख, सागर काबळे, सत्यवती कोळी, पोलीस पाटील भिम मैत्री, तंटामुक्त अध्यक्ष ताहीर शेख, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष अश्विनी मोरे, उन्नती शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष शिवाजीराव पाटील, प्रतापराव पाटील, विजय शहाणे, पंडित मोरे, राजेंद्र मोरे, श्रीकांत चौधरी, श्याम शिंदे, संतोष चौधरी, चन्नवीर बोधले, अरुण पोपस्भट, वजीर गुरुजी, महादेव मैत्री, विजय जोजन, धनाजी कांबळे, सद्दाम नदाफ, ज्ञानेश्वर गरडे, पिंटू हुल्ले, लक्ष्मण चव्हाण, बाबाजी काबळे उपस्थित होते. कार्यक्रमासाठी बनसोडे, कुलकर्णी, अस्वले, पवार, यास्मिन शेख यांनी परिश्रम घेतले.



### रामलिंगेश्वर शिक्षण संकुलात मातोश्री लक्ष्मीबाई बिराजदार यांना अभिवादन

**सोलापूर, दि. ८ फेब्रुवारी-**

श्रीक्षेत्र तीर्थ (ता. दक्षिण सोलापूर) येथील श्री रामलिंगेश्वर प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात मातोश्री लक्ष्मीबाई शरणप्पा बिराजदार यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य सुधीर सोनकवडे यांनी मातोश्री अतिशय मनमिळावू व कष्टाळू होत्या.आपल्या प्रपंचाबरोबर आपल्या मुलांनाही सुसंस्कारित व उच्चविभूषित शिक्षण देण्याचे कार्य या मातेच्या हातून घडले आहे. शंभर वर्ष आयुष्य जगलेल्या माता आजच्या समाजासाठी आदर्श माता होत्या, असे गौरवोद्गार काढले. याप्रसंगी शिल्पा महिंद्रकर, नागराज पाटील, सिद्धेश्वर बिराजदार, अमर पाटील, सिद्धाराम पाटील, शांतप्पा बगले, रेवणय्या मठपती, राजकुमार देडे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन सावित्री पाटील तर आभार महेश पट्टणशेट्टी यांनी मानले.



### अणदूरच्या जवाहर महाविद्यालयात चित्रपट लेखन कार्यशाळा उत्साहात

**अणदूर, दि. ८ फेब्रुवारी-**

येथील जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय अणदूर येथे जवाहर महाविद्यालय व दृष्टांत फिल्म्स यांच्या संयुक्त विद्यमाने चित्रपट लेखन कार्यशाळा पार पडली. दृष्टांत फिल्मचे संयोजक वैजनाथ कलशेट्टी, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, उपप्राचार्य, डॉ. मल्लिनाथ लंगडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. अंकुश कदम, समन्वयक डॉ. मल्लिनाथ बिराजदार उपस्थित होते. कथेचा जन्म कसा होतो? कथा बीज, कथेची लोक उपयोगी अवस्था, पटकथा लेखन, संवाद लेखन, चित्रपट निर्मिती: एक प्रवास, चित्रपट लेखनातून अर्थार्जन या विषयावर मार्गदर्शन झाले. प्रास्ताविक समन्वयक डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी केले. आभार डॉ.राजशेखर नळगे यांनी मानले. या कार्यशाळेत ५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. चित्रपट लेखनाचे धडे घेतले. डॉ. प्रसन्न कंदले, डॉ. उमाकांत सलगर, डॉ. राऊत डॉ. संजय कुलकर्णी, डॉ. अनिता मुदकन्ना, डॉ. सिद्धेश्वर बाड, संतोष चौधरी, महादेव काकडे, शुभांगी स्वामी, दिलीप चव्हाण यांचे सहकार्य लाभले.

### सुभाष काळे यांच्या स्मरणार्थ पुरस्कार जाहीर

**बार्शी, दि. ८ फेब्रुवारी-**

येथील कै. सुभाष गणपत काळे यांच्या स्मरणार्थ कुलदैवत फार्म यांच्यावतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करत असलेल्या जाणीव फाउंडेशन, जय शिवराय प्रतिष्ठान, त्रिमूर्ती प्रतिष्ठान, ॲनिमल फ्रेंडस्, आर्यन क्रीडा व संशोधन संस्था मंडळ, उद्योजक रवीआण्णा राऊत, सतीश देशपांडे, इंडियन रेड क्रॉस सोसायटी, सचिन वायकुळे, संत मन्मथ शिरोमणी सेवा मंडळ, ओन्ली समाज सेवा संस्था, माधवराव देशमुख,यांना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे, अशी माहिती कुलदैवत फार्मचे अध्यक्ष राहुल काळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.बुधवारी १२ रोजी सकाळी साडेदहा वाजता, कुलदैवत नागणे प्लॉट, परंडा रोड, बार्शी काळे निवासस्थानी शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, ग्रामीणचे पो. नि. दिलीप ढेरे, सहदुय्यम निंबधक ए. एस. बंसोडे, शिवाजी शिक्षण संस्थेचे सहसचिव प्रा. अरुण देबडवार, माजी शिक्षणाधिकारी शिवदास नलावडे, तसेच ज्येष्ठ पत्रकार संतोष सूर्यवंशी यांच्या उपस्थितीमध्ये काळे यांच्या निवासस्थानी पुरस्कार वितरण होणार आहे. सायंकाळी पाच वाजता सामूहिक जागरण गोंधळ होणार असल्याचे राहुल काळे यांनी सांगितले.

### सांगलीची आस्था ओगले कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे स्मृती पारितोषिकाची मानकरी

**बार्शी, दि. ८ फेब्रुवारी-**

श्री शिवाजी विद्यापीठांतर्गत घेणाऱ्या परीक्षेत कला शाखेत सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास बार्शीतील शिवाजी महाविद्यालयातील सेवानिवृत्त प्रा. एच. वाय. पवार यांच्यावतीने कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे स्मृती पारितोषिक दिला जातो. यंदा हे पारितोषिक सांगलीच्या विलिंग्डन महाविद्यालयाची विद्यार्थिनी आस्था गणेश ओगले हिने पटकावले. संस्कृत विषयातून तिने हे प्राविण्य मिळवले. तिला ५ हजार रुपये बक्षिस मिळणार आहे. प्रा. एच. वाय. पवार यांनी भूतपुर्व प्राचार्य टी. एस. सुपे यांच्याकडून प्रेरणा घेतली आहे.

# कारुंडेच्या चित्या-बकासूर, पुण्याच्या मामा-भांजे बैलजोडीचा विजय

## सहकार महर्षी केसरी भव्य ओपन बैलगाडा शर्यत

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ८ फेब्रुवारी-**

विजय गणेशोत्सव मंडळ ट्रस्टच्या वतीने प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या सहकार महर्षी केसरी भव्य ओपन बैलगाडा शर्यतीत माळशिरस तालुक्यातील कारुंडे येथील चित्या-बकासूर आणि पुण्याच्या मामा-भांजे या बैलजोडींनी प्रथम क्रमांक पटकावत प्रत्येकी सव्वालाखाचे पारितोषिक जिंकले.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त या भव्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि पुणे जिल्ह्यांतील जवळपास ४२२ बैलगाड्यांनी सहभाग नोंदवला. अखिल भारतीय बैलगाडा संघटना व राज्य शासनाच्या नियमानुसार या स्पर्धेचे नियोजन करण्यात आले होते.

स्पर्धेचे उद्घाटन सकाळी १० वाजता माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील व नंदिनीदेवी मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. सकाळी १० वाजल्यापासून प्रत्येक फेरीत सात बैलगाड्या धावत होत्या. सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत उपांत्य फेरी पूर्ण झाली. प्रेक्षकांनी खचाखच भरलेल्या मैदानात श्वास रोखून हा थरार अनुभवला. अंतिम फेरीत आठ बैलगाड्या सहभागी झाल्या. जिथे कारुंडे व पुण्याच्या बैलगाड्यांनी केवळ १२ सेकंदात ३०० मीटरचे अंतर पार करून विजय मिळवला. यामुळे प्रथम क्रमांक विभागून देण्यात आला. प्रथम व द्वितीय क्रमांकाची रक्कम एकत्र करून विजेत्यांमध्ये समप्रमाणात वाटप करण्यात आले.




### विजेत्या बैल जोडीचा विशेष सन्मान

स्पर्धेत विजेते झालेले दोन्ही बैल जोडीचा विशेष सन्मान करण्यात आला. वाटेवर फुल टाकून पाठीवर शब्बासकीची झूल पांघरून, तुळशीचा हार, कपाळावर बाशिंग बांधून बैलपोळ्यासारखे सजवण्यात आले. असा सन्मान प्रथमच होत असल्याचे यावेळी विजेत्या बैलजोडीचे मालकांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. भव्य मैदानाने शिस्तप्रिय नियोजन. त्यामुळे कोणताही गोंधळ न होता स्पर्धा अतिशय शिस्तीत पार पडली. शेवटचा थरार पाहण्यासाठी सुमारे ५० हजारांहून अधिक शौकिन उपस्थित होते. आतापर्यंत असे शिस्त व मैदान कोठेही पाहण्यात आले नसल्याचे प्रथम क्रमांक पटकावणारे अमर शेठ जगताप यांनी सांगितले.

### बकासूर अन् मसूरची लोकप्रियता

महाराष्ट्रातील मैदानी गाजवत असलेला बकासूरला पाहण्यासाठी प्रेक्षकांनी मोठी गर्दी केली होती. त्याच्याबरोबर फोटो काढण्यासाठी अनेकांनी धडपड चालू केली होती. तो जेव्हा मैदानात रेससाठी चालू लागला, तेव्हा जमलेल्या प्रेक्षकांनी उत्स्फूर्तपणे उभा राहून टाळ्यांचा कडकडाट केला तर मसूर नावाचा बैल ही असाच प्रसिद्ध आहे. त्याचीही ख्याती फार मोठी असल्याने तो लोकप्रिय आहे.

### इतर विजेते

-तृतीय क्रमांक शौर्यजित पालवे (सदाशीवनगर), चतुर्थ-अमोल धायगुडे (गुरसाळे), पाचवा-जीवन खलाटे (लाटे), सहावा- रणवीर पाटील (माळशिरस), सातवा-लालासाहेब पाटोळे (धर्मपुरी), आठवा माणिक बापू वाघमोडे (माळशिरस) यांच्या बैलगाडीने पटकाविला.

उपांत्य फेरीत द्वितीय क्रमांक मिळवणाऱ्या बैलगाड्यांना विशेष पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील, रणजितसिंह मोहिते-पाटील आणि पंचायत समितीचे माजी उपसभापती अर्जुनसिंह मोहिते-पाटील, विजय गणेशोत्सव मंडळाचे ट्रस्टी नितीन खराडे, चंद्रकांत कुंभार, श्रीकांत राऊत, संतोष माने यांनी विशेष परिश्रम घेतले. ही शर्यत पाहण्यासाठी आ. उत्तम जानकर, आ. नारायण पाटील, माजी आ. रामहरी रुपनवर, सांगोल्याचे आ. डॉ. बाबासाहेब देशमुख, आ. अभिजीत पाटील यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी आणि हजारो प्रेक्षक उपस्थित होते.



## कल्पकतेतून पर्यटनाचे स्वरुप बदलावे

### कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर : अक्कलकोटच्या खेडगी महाविद्यालयात पर्यटन परिषद

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ८ फेब्रुवारी-**

देशातील पर्यटनाच्या विकासासाठी विस्तीर्ण समुद्रकिनारा, दाट जंगलसंपदा, प्राचीन लेणी, मंदिरे, ऐतिहासिक गड-किल्ले, व्याघ्र प्रकल्प अशी वैविध्यपूर्ण पर्यटनसंपदा असतानाही पर्यटनाचा विकास झाला नाही. मात्र व्यावसायिकता, कल्पकता आणून पर्यटनाचे स्वरूप बदलले तर उद्योग क्षेत्राप्रमाणेच, पर्यटनातही अग्रेसर व्हायला वेळ लागणार नसल्याचे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी केले.

अक्कलकोट एज्युकेशन सोसायटी संचलित सी. बी. खेडगी महाविद्यालयात भूगोल विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, पीएम उषा प्रायोजित आणि महाराष्ट्र भूगोलशास्त्र परिषद, पुणे आणि सोलापूर शिक्षक भूगोल संघ, मराठवाडा भूगोल संघ लातूरतर्फे आयोजित दोन दिवशीय पर्यटन परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी होते. यावेळी माजी नगराध्यक्ष शोभाताई खेडगी, महाराष्ट्र भूगोल परिषद चेअरमन डॉ. प्रवीण सप्तर्षी, महाराष्ट्र भूगोलशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब गोपने, मराठवाडा भूगोल संघ लातूरचे अध्यक्ष डॉ. सुरेश फुले, सचिव डॉ. नरेंद्र माळी, सोलापूर भूगोल शिक्षक संघाचे सचिव डॉ. हरिश्चन्द्र तिपे, बागलकोटचे भूगोल विभाग प्रमुख डॉ. सिद्धाराम हंगर्गी, कलबुर्गी युनिव्हर्सिटीचे डॉ. वनश्री, माजी प्राचार्य डॉ. बसवराज वेळापूरकर, के. एम. जमादार, डॉ. एन. बी. तेली, संस्थेचे सचिव सुभाष धरणे, संचालिका पवित्रा खेडगी उपस्थित होते.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शिवराय अडवितोट यांनी केले. यावेळी डॉ. प्रवीण सप्तर्षी, डॉ. वनीश्री, डॉ. सुरेश फुले लातूर, डॉ. ज्योतीराम मोरे, डॉ. गाताडे, डॉ. हंगरगीं बागलकोट, डॉ. बी. श्रीनागेश उपस्थित होते. परिचय डॉ. मुद्सर गौर यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. पवन हरदास व डॉ. व्ही. बी. मकने यांनी केले. डॉ. सिध्दार्थ मुरुमकर यांनी आभार मानले.

## 'सहकार महर्षि'च्या गळीत हंगामाची सांगता



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ८ फेब्रुवारी-**

सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याच्या गळीत हंगामाचा सांगता समारंभ व्हाईस चेअरमन शंकरराव माने-देशमुख यांच्या हस्ते पार पडला. सत्यनारायण महापूजेचे यजमान ऊस तोडणी वाहतूक वाहन मालक मुकिंदा शिंदे व त्यांच्या पत्नी रुक्मिणी शिंदे यांचा सत्कार करण्यात आला.

कारखान्याने ८४ दिवसांमध्ये ५ लाख ५१ हजार ६३४ मे. टन ऊसाचे गाळप होऊन ५ लाख १९ हजार १०० क्विंटल साखर पोत्याचे उत्पादन केले आहे. को-जनरेशन प्रकल्पामध्ये ४ कोटी ९४ लाख ७६ हजार ६२८ युनीट वीज निर्माण होऊन २ कोटी ९४ लाख ५४ हजार २०० युनिट वीज एक्सपोर्ट (विक्री) केलेली आहे. डिस्टीलरीमध्ये सी व बी हेवी मळीपासून ९० लाख २४ हजार ०७९ लिटर्स रेक्टीफाईड स्पिरीट तसेच ८३ लाख ५१ हजार ६७१ लिटर्स इथेनॉल उत्पादन झाले आहे. सेटिक सिड प्रकल्पामध्ये २५३ मे. टन सिटाल्डीहाईड व २८१ मे.टन सेटिक सिडची निर्मिती झाली अशी माहिती कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले यांनी दिली.

याप्रसंगी संचालक लक्ष्मण शिंदे, नानासाहेब मुंडफणे, विजयकुमार पवार, रामचंद्र सिद, विराज निंबाळकर, रावसाहेब पराडे, महादेव क्षीरसागर, अमरदिप काळकुटे, सुभाष कटके, रामचंद्र ठवरे, तज्ञ संचालक प्रकाशराव पाटील, रामचंद्रराव सावंत-पाटील, कार्यलक्षी संचालक रणजित रणनवर, पांडुरंग एकतपुरे, दत्तात्रय चव्हाण, विनायक केचे, राजेंद्र भोसले, हर्षाली निंबाळकर उपस्थित होते.

## पानगावात १० शेळ्यांची चोरी; दोन शेतकऱ्यांच्या शेळ्या गायब

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ फेब्रुवारी-**

तालुक्यातील पानगाव येथील शेळ्या चोरीच्या घटना वाढत असून, ३ फेब्रुवारी रोजी रात्री ७ ते ११ वाजण्याच्या दरम्यान दोन शेतकऱ्यांच्या गोठ्यातून १० शेळ्या चोरीला गेल्याचा प्रकार समोर आला आहे.

फिर्यादी गणेश भारत रणशिंग (वय ३६, रा. पानगाव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांच्या शेतातील गोठ्यात बांधलेल्या ५ उस्मानाबादी जातीच्या शेळ्या चोरीस गेल्या. यामध्ये चार मोठ्या शेळ्यांची किंमत सुमारे ३२ हजार रुपये असून, एका पिल्लाची किंमत दोन हजार रुपये आहे. एकूण ३४००० रुपयांचे नुकसान झाले आहे. याच दरम्यान, गावातीलच हिम्मत रामचंद्र शिंदे यांच्या वस्तीवरुनही ५ शेळ्या चोरीला गेल्याचे समोर आले आहे. त्यामुळे या चोरीच्या घटना एकाच रात्री घडल्याने गावात चिंता व्यक्त केली जात आहे. शेळ्या चोरीला गेल्याचे लक्षात आल्यानंतर गणेश रणशिंग यांनी शेजारील वस्त्यांवर चौकशी केली, मात्र कुठलीही माहिती मिळाली नाही. त्यानंतर त्यांनी पोलीस ठाण्यात हजर राहून अज्ञात इसमाविरोधात तक्रार दिली आहे.

## जडवाहतुकीमुळे मंगळवेढ्यात वाहतूक कोंडी

### पोलिसांचा कानाडोळा; मध्य प्राशन करण्यासाठी उभ्या केल्या जातात गाड्या

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ८ फेब्रुवारी-**

मंगळवेढा शहराजवळील बायपास रोडवरील दामाजी कारखान्याकडे जाणाऱ्या चौकात एका बेकायदेशीर दारु अडड्यावर दारु पिण्यास वाहन चालक रस्त्याच्या मध्ये वाहने उभी करुन जात असल्याने बायपास रोडला वाहतुकीची कोंडी होत आहे. ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी गांभीर्यपूर्वक लक्ष घालून अवैध धंद्यांवर व वाहने उभी करणाऱ्या चालकांवर कारवाई करुन वाहतुकीस मार्ग मोकळा करावा, अशी मागणी नागरिक व वाहन चालकांमधून पुढे येत आहे.



मंगळवेढा शहरालगत पंढरपूरहून येणारी व कर्नाटक उमदीकडे जाणारी वाहने बायपास रोडने पुढे जातात. दामाजी कारखान्याकडे जाणाऱ्या बायपासला चौक असून या चौकालगतच अवैध दारु विक्री करणारा अड्डा असल्याने ऊसाची वाहने व ट्रकवाले येता-जाता रस्त्यावर वाहने उभी करुन ते दारु पिण्यासाठी जात असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. यामुळे अन्य वाहन चालक व नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. शहर बीटचे पोलीस येथून येतात-जातात. मात्र त्यांना येथील बेकायदा दारु अड्डा व रस्त्यावर उभी राहिलेली वाहने दिसत नसल्याचा आरोपही नागरिकांचा आहे. सकाळी व सायंकाळी येथूनच ज्येष्ठ महिला व ज्येष्ठ पुरुष बायपास रोडला फिरावयास जातात. येथेच झिंगलेल्या अवस्थेत दारुडे फिरत असल्याने त्या महिला भयभीत होत असल्याचे चित्र आहे. यापुर्वी या जेष्ठ महिलांनी मंगळवेढा पोलीस ठाण्यात फोन करुन तक्रार करुनही त्यांची दखल घेतली जात नसल्याने शहर पोलिसांच्या कर्तव्यावर शंका व्यक्त केली जात आहे.

## शेतातील पाणबुडी मोटार, आर्मेचरची चोरी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ फेब्रुवारी-**

उपळाई (ठोंगे) येथील शेतकरी रामलिंग प्रभू शिंदे (वय ७१) यांच्या शेतातील पाणबुडी मोटार आणि आर्मेचर अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना घडली आहे.

रामलिंग शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार ३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता ते शेतात पाणी देऊन गावाकडे परतले. परंतु, दुसऱ्या दिवशी सकाळी ९ वाजता शेतात पोहोचल्यावर त्यांनी विहिरीवर मोटारीला जोडलेला हस्ती पाईप, केबल वायर व रस्सी तुटलेली आढळली. तसेच, इंजिनला जोडलेले मार्शल कंपनीचे आर्मेचरही गायब होते. शिंदे यांनी आजूबाजूच्या शेतकऱ्यांकडे चौकशी केली, मात्र कोणालाही चोरीबाबत काही माहिती नव्हती. तसेच, परिसरात शोध घेतल्यानंतरही मोटार आणि आर्मेचर सापडले नाही. त्यामुळे अज्ञात चोरट्यांनी मुद्दाम लबाडीने त्यांची संमतीशिवाय ही चोरी केल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला आहे. चोरीस गेलेल्या मालामध्ये फिलॉक्स कंपनीची जुनी पाणबुडी मोटार (अंदाजे किंमत रुपये ४५०० आणि मार्शल कंपनीचे जुने आर्मेचर (अंदाजे किंमत रुपये ११,००० असा एकूण रुपये १५,५०० किंमतीचा माल आहे. यापूर्वीही परिसरात शेतातील मोटारींच्या चोरीच्या घटना घडल्या असल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या घटनेबाबत रामलिंग शिंदे यांनी स्थानिक पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा नोंदवून तपास सुरु केला आहे.

# दोन सख्खे भाऊ एकदाच मुंबई पोलीस दलात दाखल

## वडील विकतात पुण्यात भाजीपाला; आईही करते मोलकरणीचे काम

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. ८ फेब्रुवारी-**

अणदूर चे दोन सख्खे भाऊ सूरज कांबळे व सुजित कांबळे हे एकदाच मुंबई पोलीस दलात भरती झाले आहेत. त्यांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

अणदूरचे पोपट कांबळे यांची अणदूरमध्ये हालाकीची परिस्थिती होती. आठ वर्षांपूर्वी त्यांनी आपल्या कुटुंबाला पुढे नेण्यासाठी पत्नी व ३ मुलांसह पुणे गाठले. पडेल ते काम केले. नंतर त्यांनी आपल्या उदरनिर्वाहासाठी पिंपरी चिंचवड भागातील नवी सांगवी येथे भाजीपाल्याचा व्यवसाय सुरू केला. त्यांच्या पत्नी मनीषा या विविध घराघरात धुणी भांडी करतात. मोठ्या जिद्दीने व कष्टाने त्यांनी आपल्या दोन्ही मुलांना पदवीपर्यंतचे शिक्षण दिले. मुलेही हुशार निघाली. आपल्या आई-वडिलांच्या कष्टाचे चीज त्यांनी केले. विधानसभा निवडणुकीपूर्वी त्यांनी मुंबई पोलीस दलातील फिजिकल परीक्षा उत्तीर्ण केली. त्यानंतर आचारसंहिता लागली.

जानेवारीमध्ये झालेल्या लेखी परीक्षेत सूरज व सुजित यांनी घवघवीत यश संपादन केले व सरळ सेवा भरतीमध्ये त्यांनी मुंबई पोलीस दलात पोलीस शिपाई या पदावर रुजू झाले. त्यांना या पदापर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांचा धाकटा भाऊ सुदेश याने पण भरपूर कष्ट घेतले. आपले कॉलेज करत करत त्यांनी आपले वडील पोपट कांबळे यांना भाजीपाला व्यवसायात मदत केली. अशा या कष्टाळू कुटुंबातील २ भाऊ एकदाच मुंबई पोलीस दलात भरती झाल्याने कांबळे कुटुंबाच्या कष्टाचे चीज झाले.




### देशसेवा करण्याचा केला निर्धार

आम्हाला पोलीस दलात जाऊन देशाची सेवा करायची आहे. अणदूर गावाचे नाव मोठे करायचे आहे. मोठ्या कष्टाने, सचोटीने आई-वडिलांनी आम्हाला या पदापर्यंत पोहोचवले, याची आम्हाला जाणीव असून गरीब लोकांना जेवढी शक्य आहे, तेवढी मदत करण्याचा मानस आहे, असे या दोन्ही बंधूनी व्यक्त केला.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अक्कलकोटमधील लिटल स्टार स्कूलचे स्नेहसंमेलन साजरे



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ८ फेब्रुवारी-**

येथील एमआयडीसी समोरील लिटल स्टार प्रेस्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन अक्कलकोट संस्थानचे श्रीमंत मालोजीराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात पार पडले. शिशुवर्गापासून ते प्राथमिक वर्गाच्या असंख्य विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला होता.

यावेळी माजी प्राचार्य डॉ. बसवराज कोनापुरे, डॉ. किसनराव झिपरे, माजी पर्यवेक्षक भीमराव साठे, माजी प्रबंधक शांतमल करकी, प्राचार्या राजश्री करकी, अनिता करकी, मल्लिनाथ बोधले, सुरेश डिग्गे, माधवराव अहिरे, विराग दोशी, बालाजी सुंटनुरे, बाळू राठोड, लोकेश रामपुरे, राहुल गडकरी, शरद मसुती, खंडप्पा करकी उपस्थित होते.

यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी कोळीनृत्य, गरबा, लावणी, गोंधळ, ओवी, शेतकरी, होजागिरी असे विविध नृत्य सादर करून सांस्कृतिक मूल्यांची देवाण-घेवाण केली. स्कूलचे संस्थापक शांतमल करकी यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन गीता करकी यांनी केले.



## संक्षिप्त वृत्त...



### स्टेट बँकेतर्फे विद्यामंदिर परिवाराला वॉटर चिलर, आरओ प्लांट भेट

**सांगोला, दि. ८ फेब्रुवारी-**

भारतीय स्टेट बँक शाखा सांगोला यांच्यावतीने सांगोला येथील विद्यामंदिर प्रशाला व ज्यु. कॉलेजला वॉटर चिलर व आरओ प्लांट सीएसआर फंडातून भेट देण्यात आले. रिजनल मॅनेजर निशांत जैस्वाल, सां. ता. शि. प्र. मंडळाचे सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके यांच्या हस्ते याचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी संस्था सदस्य विश्वेश झपके, डेप्युटी मॅनेजर विकास नायडू, सांगोला शाखेचे मुख्य व्यवस्थापक कुलदीप देसाई, सहाय्यक व्यवस्थापिका शितल शिंदे, प्रकाश पाटील, सागर फडतरे, उपमुख्याध्यापिका शहिदा सय्यद, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक सुरेश मस्तूद, प्रदीप धुकटे उपस्थित होते. सूत्रसंचलन प्रशांत रायचुरे यांनी केले.



### सोजर इंग्लिश स्कूलच्या आनंद बाजारात ३० हजारांची उलाढाल

**बार्शी दि. ८ फेब्रुवारी-**

सोजर इंग्लिश स्कूल प्राथमिक विभागाच्या वतीने घेतलेल्या आनंद बाजारात ३० हजारांची उलाढाल झाली. बार्शी नगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे यांनी उद्घाटन केले. यावेळी मुख्याध्यापिका रिटा नेटके, सहशिक्षक तुषार गदगी उपस्थित होते. या आनंद बाजारामध्ये विद्यार्थ्यांनी खाद्य पदार्थ, शालेय साहित्य, फुगे, खेळणी, सौंदर्य प्रसाधने, भाजीपाला, फळे ज्युस, सरबत, भेळ, कचोरी, पावभाजी, इडली, विविध प्रकारचे चाट, सजावट सामान यासारख्या वस्तू विक्रीचे ६५ स्टॉल लावले होते. यावेळी मान्यवरांनी प्रत्येक स्टॉलला भेट देवून काही वस्तुंची खरेदी केली. सूत्रसंचालन प्रसाद सहस्रबुद्धे यांनी केले.

### हाजापूर येथे विहीर खोदताना परराज्यातील मजुराच्या डोक्यात दगड पडून मृत्यू

**मंगळवेढा, दि. ८ फेब्रुवारी-**

हाजापूर येथे विहिरीचे काम करत असताना परराज्यातील मजुराच्या डोक्यात विहिरीच्या कडेचा दगड पडून गंभीर जखमी होऊन मयत झाल्याची घटना घडली असून याची अकस्मात मयत म्हणून नोंद मंगळवेढा पोलिसात झाली आहे. हाजापूर येथे दर्याप्पा आण्णा पाटील यांच्या विहिरीचे काम करीत असताना मजूर प्रद्युमन विश्वकर्मा हे ७ फेब्रुवारी रोजी दुपारी २.१५ वाजता विहिरीचे काम करीत असताना विहिरीच्या कडेचा दगड डोक्यात पडून गंभीर जखमी झाले. त्यास ग्रामीण रुग्णालय मंगळवेढा येथे उपचारासाठी नेले असता तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून मयत झाल्याचे सांगितले. याची खबर समाधान भारत गडदे (रा.पाठखळ) यांनी पोलीसात दिली आहे.

### चारे येथे रक्तदानाने कर्मवीर मामांना अभिवादन

**बार्शी, दि. ८ फेब्रुवारी-**

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त ग्रामपंचायत कार्यालय, चारे येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिरामध्ये चारे, वालवड, बोरगाव व पाथरी या गावातील तरुणपिढी व ग्रामस्थ तसेच महिलांनी रक्तदान केले. एकूण ६१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. हे रक्तदान शिबीर यशस्वीपणे पार पाडण्यासाठी श्रीमान रामभाई शहा ब्लड बँक, बार्शी यांचे सहकार्य लाभले. प्राचार्य थोरबोले, बेदरे, श्री माढेकरांनी सर्व रक्तदात्यांचे आभार मानले.

### मरवडे येथे भरदिवसा दोन लाखांची चोरी

**मंगळवेढा, दि. ८ फेब्रुवारी**

मरवडे येथे घराचा दरवाजा उघडा असल्याची संधी साधून भरदिवसा चोरट्याने लोखंडी कपाटात ठेवलेले २ लाख ६ हजार ५१० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरुन नेल्याचा प्रकार घडला असून या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. यातील फिर्यादी रंजना बापूसाहेब आसबे (वय ५७, रा. मुंबई खारघर) या १९ जानेवारी रोजी मुंबईहून आल्या होत्या. त्यावेळी खर्चासाठी काही पैसे व सोन्याचे दागिने सोबत आणून काळ्या रंगाच्या पर्समध्ये कपाटात ठेवले होते. ४ रोजी सकाळी ८ वाजता किरकोळ सामान घेण्यासाठी फिर्यादीने कपाटातील पर्स घेऊन पैसे घेण्याचा प्रयत्न केला असता तेव्हा कपाटही उघडे दिसले. दुपारी ४ वाजता आईच्या घरातील कपाटात काळ्या रंगाची कातडी पर्स ठेवली असल्याने त्यामधील पैसे घेण्यास गेल्यावर सदरची पर्स कपाटात दिसून आली नाही. त्यामुळे सर्व घरात शोध घेतला.परंतु पर्स मिळून आली नाही. फिर्यादीच्या आईस अर्धांगवायू असल्याने तिची देखभाल करत असताना घराचा मुख्य दरवाजा अनावधनाने उघडा राहिला होता. सदर कपाटही उघडे होते. त्याचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने उघड्या घरात प्रवेश करुन पर्समध्ये ठेवलेले ६ हजार ५१० रोख रक्कम, १ लाख २५ हजार रुपये किंमतीचे साडेतीन तोळे वजनाचे गंठण, ५० हजार रुपये किंमतीचे १० ग्रॅम वजनाचे मिनीगंठण, २५ हजार रुपये किंमतीचे ५ ग्रॅम वजनाची कर्णफुले असा एकूण २ लाख ६ हजार ५१० रुपयाचा मुद्देमाल फिर्यादीच्या संमतीशिवाय अज्ञात चोरट्याने चोरुन नेला असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.







## श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरावर विद्युत रोषणाई

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ८ फेब्रुवारी-**

माघ शुद्ध जया एकादशी निमित्त मुख्य श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

यासाठी पांढरी शेवंती, पिवळी शेवंती, अष्टर, पिवळा झेंडू, केशरी झेंडू, हिरवा पाला, सूर्य फुल, कलकत्ता शेवंती जिप्सी, कामिनी इत्यादी सुमारे दिड टन फुलांचा वापर करण्यात आला आहे. श्रींचा गाभारा, सोळखांबी श्री संत नामदेव महाराज पायरी या ठिकाणी सजावट करण्यात आली आहे.

**पुण्यातील भाविकांकडून सजावट**

सदरची सजावट पुणे येथील भाविक सचिन आण्णा चव्हाण, संदिप विठ्ठल पोकळे व युवराज विठ्ठल सोनार या भाविकांनी सेवाभावी तत्त्वावर मोफत करून दिली आहे.



## औसेकरांची माघवारी म्हणजे दास वीरनाथांनी दिलेला प्रसाद

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ८ फेब्रुवारी-**

साधन चतुष्ट्मय होऊन परमार्थ कराल तर तो हृदयात रुजून फलद्रुप होतो,वारी ही अवस्था आहे माध्यान काळी सर्व तीर्थे चंद्रभागेत येतात केवळ चंद्रभागा डोळ्यांनी पाहिली तरी मोक्ष मिळतो जगतातील सर्व सुख ,शांती, समाधान इथेच मिळते नुंसता मंदिराचा कळस पाहिला तरी जीवनाची धन्यता होते म्हणून पंढरीची वारी पालखी सोबत सद्गुरु सोबत करा असे आवाहन सद्गुरु श्री.गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी केले आहे.

दशमी दिनी शुक्रवारी औसेकर महाराज फडावर तीस चाळीस हजार वारकरी समुदाय यांच्या उपस्थितीत कीर्तनात महाराज बोलत होते.

**सेवेकरीता संत नामदेव महाराज यांच्या.....**

**पंढरीचा वास, चंद्रभागे स्नान**
**आणिक दर्शन विठोबाचे**
**हेचि मज घडो जन्मोजन्ममी**
**माझी मागणे श्रीहरी नाही दुजे**

**मुखी सदा नाम संतांचे दर्शन**
**जनी जनार्दन येसा भाव**
**नामा म्हणे तुझे नित्य महाद्वारी**
**कीर्तन गजरी सप्रेमाचे**

पंढरीची वारी ही एक जनमाचे नाही जनमोजनमाची पुण्याई आसेल तरच घडते. वारी ही जीवन जगायला शिकवते. नुसत चालणं, फिरणं वेगळं, वारी करण वेगळं आणि आपल्या सद्गुरु समवेत नाम संतांचा जयघोष करीत पंढरीस चालत येणं हे वेगळं हे लक्षात घ्या, आपण चालतच नाही पालखी व पांडुरंग तुम्हा आम्हास चालवतो. हा भाव मनात असला पाहिजे उन्ह धंडी पाऊस वारा, कडक तपमान त्यात औसा पंढरपूर पायी दिंडी मार्ग, दगड, धोंडे, गोटे अडचणीचा. त्यातून आपण ज्ञानोबा तुकाराम पंढरीनाथ यांच्या नामाचा जयघोष करीत आलात. पण इथे सर्व शिण गेला आणि सुख आनंद समाधान लाभले आहे हा अनुभव घेतलात. आळंदी-पंढरपूर असो अथवा औसा-पंढरपूर असो जगात अशी वारी सापडणार नाही. तुका पंढरीस गेला पुन्हा जनमा नाही आला असे जीवन जगायला मुक्ती



देणारी ही माघ वारी आहे. ती वारी नित्यनेमाने करा, वारकऱ्यांच्या सारखं दुसरे निष्काम भक्त कुठे मिळणार नाहीत. व्यक्तिगत साधना वेगळी इथे सर्वांना सोबत घेऊन वारी घडवणं. वेगळी ही दास विरनाथ महाराजांची कृपा व प्रसाद होय असे सांगितले व उपदेश आहे अशांनी न चुकता वारी केलीच पाहिजे, असे प्रतिपादन यावेळी बोलताना गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी केले.

## जय श्रीराम, जय बजरंगबलीच्या जयघोषात कळसारोहण

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. ८ फेब्रुवारी-**

माळशिरस येथील जागृत मारुतीदेव व श्रीरामदेव मंदिराचा कलशारोहण सोहळा जय श्रीराम, जय बजरंगबलीच्या जयघोषात पार पडला.



मारूतीची स्वयंभू मूर्ती असून याठिकाणी श्रीसंत जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचे कीर्तन झाल्याचे सांगितले जाते. हे कीर्तन उशिरापर्यंत सुरु होते. यावेळी कीर्तनासाठी असलेले सर्व लोक गेले, त्यावेळी श्रीसंत तुकाराम महाराज हनुमानाच्या मूर्तीकडे पाहून म्हणाले, सगळे भक्त निघून गेले. तुम्ही उभे का तुम्हीही झोपा. तेव्हापासून ही मूर्ती कललेली व निद्रा अवस्थेत असल्याने या मारुतीला झोपाळू हनुमान असे नाव पडल्याची आख्यायिका आहे. १६ कळस बसविण्यात आले. या सोहळ्याचे पौरोहित्य विनायक फडणीस यांनी केले. या सोहळ्यास देवस्थान कमिटीचे अध्यक्ष ॲड. मिलिंद कुलकर्णी, सचिव रामभाऊ दोशी उपस्थित उपस्थित होते. सातारा, गिरवी व स्थानिक पुरोहितांनी दोन दिवस धार्मिक विधी केला. गोरख जाधव, आबासो गायकवाड, संजय गायकवाड, उदय गायकवाड या भाविकांनी प्रत्येकी एक असे १६ पैकी चार कळस दिले तर इतर कळस ग्रामस्थांच्या देणगीतून व देवस्थान कमिटीने बसविले.

## बार्शीत बुधवारपासून कर्मवीर व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ फेब्रुवारी-**

बार्शी येथील शिवशक्ती अर्बन को-ऑप. बँकेच्या वतीने कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त बुधवारी १२ ते शुक्रवारी १४ फेब्रुवारीपर्यंत कर्मवीर व्याख्यानमाला आयोजित केली आहे. या व्याख्यानमालेत विविध विषयांवर ज्येष्ठ निरुपणकार विवेक घळसासी निरुपण करणार आहेत. यंदाचे १४ वे वर्ष आहे.



पसायदान : श्रीज्ञानदेवांचे यावर ज्येष्ठ निरुपणकार विवेक घळसासी पुष्प पहिले गुंफणार आहेत. हे पुष्प बुधवारी १२ फुब्रुवारी रोजी होणार असून, उद्घाटन श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी उपाध्यक्ष नंदन जगदाळे उपस्थित राहणार आहेत. दुसरे पुष्प गुरुवारी १३ फेब्रुवारी रोजी होणार असून, यावेळी जनरल सेक्रेटरी पी. टी. पाटील उपस्थित राहणार आहेत. शुक्रवारी १४ फेब्रुवारी रोजी पसायदान : जगद्गुरु श्री तुकांबांचे यावर पुष्प तिसरे गुंफणार आहेत. यावेळी खजिनदार जयकुमार शितोळे उपस्थित राहणार आहेत. ही व्याख्यानमाला संत तुकाराम सभागृह, बार्शी येथे रोज सायंकाळी ६ वा. होणार आहे. याला उपस्थित राहण्याचे आवाहन शिवशक्तीचे बँकेचे चेअरमन प्रकाश बुरगुटे, व्हाईस चेअरमन अशोक वाघमारे यांनी केले आहे.

## पिलीव येथे बुधवारपासून महालक्ष्मी देवीची यात्रा

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. ८ फेब्रुवारी-**

माळशिरस तालुक्यातील तमाम ग्रामस्थाचे दैवत श्री महालक्ष्मी देवीची यात्रा बुधवारी १२ ते २१ फेब्रुवारीदरम्यान भरणार आहे.



बुधवारी १२ फेब्रुवारी रोजी सकाळी देवीचा महाअभिषेक, पालखीचे मंदिराकडे प्रस्थान, कोल्हापूर येथून ज्योत आणणे, १३ व १४ फेब्रुवारी रोजी शेळ्या-मेंढ्यांचा बाजार, १५ ते १७ दरम्यान मोठ्या जनावरांच्या बाजाराचे आयोजन, १८ रोजी जंगी कुस्त्या, शेतीमाल व जनावरांच्या नोंदी, १९ फेब्रुवारी रोजी गझी ढोल स्पर्धा, २० रोजी देवीची मिरवणूक, शेतमाल व जनावरांच्या निवडी, २१ ला देवीचा महानैवेद्य, बक्षीस वितरण, छबीनाहोणार आहेत. भाविक, व्यापारी, संकरीत जनावर मालक व शेतकऱ्यांनी यात्रेत सहभाग घेणयाचे आवाहन यात्रा ककिटीचे चेअरमन संतोषकुमार पाटील यांनी केले आहे. ही यात्रा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी व्हा. चेअरमन नवनाथ पाटील, खजिनदार नितीन कपने, विश्वास जावळे, बाबुराव पाटील, लहु पाटील, आनंद पाटील, पोपट मेटकरी, सतिश मदने निशात बगाडे, कुबेर कपने, हनुमंत जावळे, संतोष बगाडे, कुंडलीक कपने, दादा वगरे, सलीम मुलाणी, योगेश शेंडगे, सेक्रेटरी शिवाजी पिसे परिश्रम घेत आहेत.

## माजी आ. संजयमामा शिंदे यांच्याकडून राजुरीतील विकासकामांची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ८ फेब्रुवारी-**

करमाळा तालुक्याचे माजी आ. संजयमामा शिंदे यांनी राजुरी येथे चालू असलेल्या विविध विकास कामांची पाहणी करून माहिती घेतली.

विधानसभा निवडणुकीनंतर माजी आ. संजयमामा शिंदे यांनी प्रथमच जनता दरबार भरवला आहे.त्यानिमित्ताने ते तालुक्यातील जनतेच्या अडीअडचणी जाणून घेणार आहेत. दरम्यान राजुरी गावाच्या विकासाच्या दृष्टीने मैलाचा दगड असलेल्या राजुरी वीज उपकेंद्राला माजी आमदार संजय मामा शिंदे यांनी आपल्या कार्यकाळात मंजुरी मिळवली व त्याचे काम आज युद्ध पातळीवर सुरू आहे. यामुळे राजुरीतील विजेची अत्यंत महत्त्वाची अडचण दूर होणार आहे.येत्या दोन महिन्यात हे वीज उपकेंद्र राजुरीकरांच्या सेवेत खुले होणार आहे. याशिवाय करमाळा माढा मतदारसंघाच्या ग्रामीण विकासाचा केंद्रबिंदू असलेला राज्यातील सर्वाधिक लांबीचा हॅम या योजनेखाली मंजूर होऊन काम चालू असलेल्या सावडी ते वेणेगाव फाटा या रस्त्याच्या कामाची ही माजी आमदार संजय मामा शिंदे यांनी पाहणी केली.



सावडी ते वेणेगाव फाटा या ७१ किलोमीटर लांबीच्या रस्त्यामुळे करमाळा तालुक्याच्या ग्रामीण विकासाला मोठ्या प्रमाणात चालना मिळणार आहे.
**-भाऊसाहेब शेळके. सरपंच, सावडी**

राजुरी गाव उजनी बॅक वॉटर लगत असल्याने येथील विजेची समस्या मोठी होती.आदरणीय मामांनी आमची ही समस्या सोडवली असून त्याचा फार मोठा फायदा राजुरीच्या विकासाला होणार आहे.
**- नंदकुमार जगताप, राजुरी**

राजुरी येथील विज उपकेंद्र, हॅम रस्ता, सरकारी दवाखाना, पूल,व्यायाम शाळा, पंतप्रधान ग्रामसडक योजना यासारखे असंख्य कामे मामांच्या कार्यकाळात मार्गी लागली.
**-आर. आर. साखरे, राजुरी**

७१ किलोमीटर लांबीच्या रस्त्यासाठी तब्बल २७१ कोटी रुपयांचा निधी असून हा रस्ता दुपदरी सिमेंट काँक्रिटीकरण आहे. या रस्त्यामुळे सावडी, राजुरी,पोधवडी, अंजनडो, झरे, कुंभेज, कोंडेज, निंभोरे, मलवडी, व केम ही करमाळा तालुक्यातील ११ गावे तर उपळवटे, दहिवली, कनेरगाव व वेणेगाव ही माढा तालुक्यातील चार गावे अशी एकूण १५ गावे सोलापूर व पुणे या राष्ट्रीय महामार्गाला व नगर जिल्ह्याला जोडली जाणार आहेत.

यावेळी तानाजी झोळ, नंदकुमार जगताप, महादेव आडसूळ, वैभव पाटील, संजय सारंगकर, सुनील पाटील, भाऊसाहेब जाधव, सुहास गरुड, उदय साखरे, आर. आर. बापू साखरे, दादा साखरे उपस्थित होते.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जळकोट येथे रमाई आंबेडकर यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.८ फेब्रुवारी -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा समिती व युगपुरुष तरुण मंडळाच्यावतीने महामाता, त्यागमुर्ती रमाई भिमराव आंबेडकर यांची १२७ वी जयंती साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याचे पुजन ग्रामपंचायत माजी सदस्य दामु लोखंडे, सुरेश लोखंडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. त्यानंतर रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन शालेय विद्यार्थीनी आसावरी लोखंडे व अर्पिता लोखंडे यांच्या हस्ते अगरबत्ती, मेणबती प्रज्वलीत करुण पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी सामुहीक त्रिशरण व पंचशिल घेण्यात आले. त्यानंतर समितीच्यावतीने ग्रामपंचायतचे कर्मचारी अर्जुन सावंत यांच्या जन्मदिवसानिमित्त अरुण लोखंडे यांच्या हस्ते पुष्प गुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रकाश लोखंडे, अरविंद लोखंडे, विशाल माने, देवयानी लोखंडे, अदीती माने, आरती लोखंडे, अनुष्का लोखंडे, आदिती गायकवाड, स्नेहा माने, सलोनी माने, सोनाली माने, प्रगती साखरे, भिमनगरमधील बौद्ध उपासक, उपासीका उपस्थित होते.



### संक्षिप्त वृत्त...



## हनुमंत पाटील यांना पुरस्कार प्रदान

**जळकोट, दि.८ फेब्रुवारी -**

नांदुरी (ता. तुळजापूर) येथील सरपंच हनुमंत पाटील यांना परिवर्तन राज्यस्तरीय उत्कृष्ट सरपंच पुरस्कार देण्यात आला. परिवर्तन सामाजिक संस्था, नळदुर्ग या संस्थेकडून दरवर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा परिवर्तन राज्यस्तरीय पुरस्कार देउन सन्मान करण्यात येतो. २०२५ सालचा उत्कृष्ट सरपंच हा पुरस्कार नांदुरीचे सरपंच हनुमंत पाटील यांना डॉ. सुरेश वाघमारे जेष्ठ विचारवंत, लातूर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी मारुती बनसोडे, ॲड. बाबसाहेब वडवे, रेश्मा बनसोडे, प्रा. राजा सोनकांबळे यावेळी उपस्थित होते. पाटील यांनी सरपंचपदाच्या कारकिर्दीमध्ये गावाच्या विकासासाठी अनेक योजना राबविल्या आहेत. अल्पावधीमध्ये गावचं नावलौकिक त्यांनी केला आहे.

## विनायक नेटकेची कॉन्स्टेबलपदी निवड

**परंडा, दि.८ फेब्रुवारी -**

विनायक दत्तात्रय नेटके भोंजा हवेली (ता. परंडा) येथील शेतकरी कुटुंबातील मुलाचे पोलिस होण्याचे



स्वप्न झाले पुर्ण विनायक हा पहिली ते चौथी न्यु इंग्लिश स्कूल चिंचवड तर ५ ते १० महात्मा गांधी विद्यालय परंडा येथून उत्तीर्ण होऊन कॉलेज जीवन हे शिक्षण महर्षी गुरूवर्य रा.गे. शिंदे महाविद्यालय परंडा येथे उत्तीर्ण होऊन ॲकडमी जॉईन करण्याचे ठरवून क्रांती ॲकडमी करिअर मधून योग्य मार्गदर्शन लाभले. २०२४ मधील परिक्षेतील निकाल हाती येताच गावात शहरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे आणि आई वडिलांचे स्वप्न देखील पुर्णपणे साकार झाले आहे.



## प्रहार दिव्यांग संघटनेच्या शाखेचे उद्घाटन

**कळंब, दि.८ फेब्रुवारी -**

ढोराळा (ता. कळंब), जिल्हा धाराशिव येथे प्रहार दिव्यांग संघटनेची १२० व्या शाखेचे उद्घाटन करण्यात आले. शाखेचे उद्घाटन प्रहारचे मराठवाडा अध्यक्ष मयुरजी काकडे त्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रहार दिव्यांग संघटनेचे जिल्हा संघटक बाळासाहेब कसबे, जिल्हा सचिव महादेव चोपदार, शहराध्यक्ष जमीर शेख, समन्वय नितीन जाधव, तालुका समन्वयक दिनेश पोतदार, ढोकी शाखाध्यक्ष सब्दार शेख, तालुका संपर्क इंद्रजीत मिसाळ आदी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी ढोराळा शाखेच्या शाखा अध्यक्षपदी चांगदेव चौधरी यांची निवड करण्यात आली. तसेच शाखेच्या सर्व पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.



## परंड्यात माता रमाई जयंती साजरी

**परंडा, दि.८ फेब्रुवारी -**

परंडा येथील बी.ए. समूह व द्रावणी भीमनगर युवती यांच्यावतीने त्यागमूर्ती माता रमाई यांची जयंती शासकीय विश्रामगृह येथे साजरी करण्यात आली. यावेळी डीबीए समूह संस्थापक, अध्यक्ष दयानंद बनसोडे, ॲड. दयानंद घेंडे, किरन बनसोडे, निशा बनसोडे, नेहा बनसोडे, रितू बनसोडे, सामुदायिक त्यागमूर्ती माता रमाई यांच्या प्रतिमेचे दीप धूप प्रज्वलन करून पूजा केली. यावेळी युवराज शिंदे, शिवाजी सोनवणे, दत्तात्रय पाटील व लहान मुलींनी यांनी विचार मांडले. यावेळी मिलिंद बनसोडे, छगन चौधरी, राज बनसोडे, साहिल बनसोडे, सिद्धार्थ बनसोडे, लखन बनसोडे, प्रशांत बनसोडे, शुभम बनसोडे, कुंदन बनसोडे, पायल बनसोडे, भूमी बनसोडे, अपेक्षा बनसोडे, परी बनसोडे, प्रज्ञा बनसोडे, किरण बनसोडे, प्रतिका बनसोडे, आरती बनसोडे, संगीता बनसोडे, संगीत थोरात, सुजाता साळवे इत्यादी उपस्थित होत्या.

## आरुषी रसाळ व आलिमुन मुजावर हिचे यश

**इटकळ, दि.८ फेब्रुवारी -**

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा इटकळ (ता. तुळजापूर) शाळेत शाळेच्या इतिहासात प्रथमच आठवी



वर्गातील ४ विद्यार्थ्यांना एनएमएमएस परीक्षेसाठी बसविण्यात आले. यात आरुषी मनोज रसाळ व अलिमून ताजोद्दिन मुजावर ह्या दोन मुली एन.एम.एम. एस. परीक्षेत पात्र झाल्या आहेत. शाळेतील पदवीधर शिक्षक सतिश ढोणे यांनी जादा तास घेवून विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली. ह्यकामी शाळेचे मुख्याध्यापक तानाजी गायकवाड यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सदरील दोन विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षक सतिश ढोणे, अणदूर बीटचे विस्तार अधिकारी तात्यासाहेब माळी, केंद्रप्रमुख बळवंत सुरवसे यांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या.

# तुळजापूरात द बर्निंग कार; जिवीतहानी टळली

### भवानी तीर्थकुंडाच्या समोर भाविकाच्या गाडीला आग...

### पोलीसांच्या सतर्कतेमुळे परिस्थिती आटोक्यात...





**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.८ फेब्रुवारी -**

शहरातील घाटशीळ कार पार्किंग परिसरात असलेल्या भवानी तीर्थ कुंडच्या समोर भाविकांनी पार्किंग केलेल्या गाडीस इंजनमध्ये स्पार्क होऊन अचानक लागलेल्या आगीत संपूर्ण कार जळून खाक झाली आहे.

याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी की, तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या गाड्या घाटशिळ रोडवर असणाऱ्या कार पार्किंग मध्ये लावल्या जातात. नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील नीलगाव येथील भाविक गणेश पटाडे हे त्यांच्या कुटुंबासह तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी (क्र.एम.एच.४१/बी.एल.९४७१) मारुती स्विफ्ट गाडीने दि.८ फेब्रुवारी रोजी आले. कार पार्किंगमध्ये गाडी न लावता त्यांनी कार पार्किंगच्या बाजूस असलेल्या भवानी तीर्थ कुंडाच्या समोर गाडी पार्किंग करून संपूर्ण पटाडे कुटुंब दर्शनास गेले. दुपारी तीन साडेतीनच्या दरम्यान अचानक इंजनमध्ये स्पार्क होऊन गाडीने पेट घेतली. घटनेची माहिती मिळताच तुळजापूर पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी अरुण शिरगिरे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव गेले. गाडीतून धूर बाहेर येत होता म्हणून गाडीच्या काचा फोडून भाविकांचे गाडीतील सामान साहित्य बाहेर काढले.

कार पार्किंगच्या अवतीभवती संपूर्ण परिसरात कचरा पसरला असून परिसरात विकलेल्या कचऱ्यामुळे ही आग जास्त भडकण्याची शक्यता होती. तसेच पार्किंग केलेल्या कारच्या बाजूस लाईटचा डीपी होता. नागरिकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली होती. घटनेचे गांभीर्य ओळखून योगायोगाने तेथूनच चाललेले पाण्याचे टँकर पोलीस कर्मचारी शिरगिरे यांनी अडवून पेटलेल्या गाडीवर पाणी मारण्यास सुरुवात केली. या भागातील रहिवाशांनी देखील आग विजवण्यासाठी पोलिसांना सहकार्य केले.

न.प.ची अग्निशामक गाडी घटनास्थळी तात्काळ दाखल झाली. फायर मॅन देविदास देवकते व त्यांच्या सर्व टीमने संपूर्ण परिसरात अग्निशामक पाण्याचे फवारे मारून आग नियंत्रणात आणली.

> पोलीस हेल्पलाइन नंबर १८१ वर कॉल आला आणि घटनेची माहिती समजतात मी तात्काळ घटनास्थळी पोहोचलो. गाडीच्या आतून धूर येत होता आणि गाडीने पेट घेतली होती. पेटलेल्या गाडीच्या शेजारीच लाईटीचा डीपी होता. गाडीला पाहण्यासाठी नागरिकांनी परिसरात मोठी गर्दी केली होती. संभाव्य धोकादायक परिस्थिती लक्षात घेऊन जमलेल्या गर्दीला नियंत्रणात आणून तेथूनच जाणाऱ्या एका टँकरला थांबवून पेटत्या गाडीवर टँकरचे पाणी टाकून आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. तेथे जमलेल्या नागरिकांनी देखील मला सहकार्य केले.
>
> 
>
> **-अरुण शिरगिरे,** हेड कॉन्स्टेबल, पोलीस ठाणे, तुळजापूर

## जवाहर आश्रम शाळेत स्वयंशासन दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ फेब्रुवारी -**

विद्यानगर बावी येथील जवाहर माध्यमिक आश्रम शाळेत इयत्ता १० वी वर्गाच्या विद्यार्थ्यांचा स्वयंशासन दिन संपन्न झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे पर्यवेक्षक साकळे बी.एस., प्रमुख पाहुणे देशमुख ए.आर. यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वयंशासन दिनाचे मुख्याध्यापक भोसले वैभव बालाजी व राठोड अमृता विजयानंद यांनी कामकाज पाहिले. विद्यार्थ्यांनी दिवसभर वेळापत्रकाप्रमाणे शिक्षक व शिक्षकेत्तर कमचारी म्हणून कामकाज पूर्ण केले. दुपार सत्राच्या शेवटी शिक्षक विद्यार्थ्यांनी आपले अनुभव मनोगतातून व्यक्त केले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वर्गशिक्षक गुंजाळ एस.पी. व अरवत के.एस. यांनी शिक्षक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

स्वयंशासन दिन यशस्वी पार पाडल्यामुळे प्रशालेचे प्राचार्य दयानंद मनोहरराव राठोड यांनी सर्व सहभागी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे कौतुक करून अभिनंदन केले.

## भाजपाचे आ. विक्रांत पाटील यांचा तुळजापुरात जल्लोष

### दिल्लीतील निवडणूकीत भाजपच्या यशानिमित्ताने भाविकांना पेढे वाटून आनंदोत्सव...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.८ फेब्रुवारी -**



भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश महामंत्री तथा विधान परिषद सदस्य आमदार विक्रांत पाटील हे पक्षाच्या संघटनात्मक बैठक साठी आले असता त्यांनी आई तुळजा भवानीची महापूजा करून दर्शन घेतले आणि दिल्ली येथे भारतीय जनता पार्टीची बहुमताने सत्ता आली. त्यामुळे त्यांनी भाविक भक्तगण यांना पेढे वाटले आणि जल्लोष केला.

याप्रसंगी जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य पाटील, नितीन काळे माजी नगराध्यक्ष सचिन रोचकरी, प्रदेश कार्यकारणी सदस्य अनिल काळे, गुलचंद व्यवहारे, अविनाश गंगणे, तालुका सरचिटणीस शिवाजी बोधले, सुहास साळुंके, उद्योग आघाडीचे जिल्हा संयोजक राजाभाऊ मलबा, जिल्हा कोषाध्यक्ष नेताजी शिंदे, सचिन रसाळ, सतीश सरवदे, उमेश गवते, शेखर छत्रे, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस सागर पारडे, बाळासाहेब भोसले, ऋषिकेश साळुंके, समर्थ पैलवान, उमेश शेंडगे, अभिषेक पवार, विलास पारडे यांच्यासह आदि मान्यवर उपस्थित होते.

## पीएमश्री जि.प. उर्दू शाळेत अपूर्व विज्ञान मेळावा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.८ फेब्रुवारी -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील पीएमश्री जिल्हा परिषद उर्दू शाळा येथे दि. ८ फेब्रुवारी रोजी अपूर्व विज्ञान मेळावा आयोजित करण्यात आला होता. विज्ञान मेळाव्याचे उद्घाटक म्हणून सय्यद मीर तारेखअली विज्ञान पर्यवेक्षक माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद धाराशिव तर प्रमुख पाहुणे म्हणून माध्यमिक शिक्षण विस्तार अधिकारी भारत देवगुडे उपस्थित होते.

या विज्ञान मेळाव्यात एकूण ४० प्रयोग इयत्ता तिसरी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी मांडले होते. विज्ञानाच्या विविध संकल्पना विद्यार्थ्यांनी आपल्या प्रयोगाद्वारे सादर केले.

**विद्यार्थ्यांकडुन वेगवेगळ्या विज्ञान प्रयोगाचे सादरीकरण....**

यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष काजी मुक्तार अहेमद आणि सदस्य काजी खालेद व महीला सदस्य मुलानी मुस्कान वसियोद्दीन तसेच सर्व सन्माननीय सदस्य आणि पालक उपस्थित होते. सर्वांनी विद्यार्थ्यांचे प्रयोग पाहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. चिमुकल्यांनी या प्रयोगातून बालवैज्ञानिकांचे दर्शन घडविले. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थी आणि शिक्षकांचे कौतुक करत शाबासकीची थाप दिली.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते विज्ञान प्रयोगांबाबत विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन करणारे मार्गदर्शक शिक्षक फुलमामडी तोफिकुल आलम व शेख अर्शिया नजीर अहेमद या विज्ञान शिक्षकांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी शाळेचे मुख्याध्यापक शहा तय्यबअली यांनी मान्यवरांचे आभार व्यक्त केले.

## देवीदास पाठक यांना जिजाऊ स्वावलंबन पुरस्कार प्रदान



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ फेब्रुवारी -**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष धाराशिवच्यावतीने देण्यात येणारा उमेद अभियानाच्या उपक्रमांना इलेक्ट्रॉनिक्स मीडियातून व्यापक प्रसिद्धी दिल्याबद्दलचा २०२०-२१ चा राजमाता जिजाऊ स्वावलंबन इलेक्ट्रॉनिक्स मीडिया उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनक घोष यांच्या हस्ते देविदास पाठक दूरदर्शन जिल्हा प्रतिनिधी धाराशिव यांना प्रदान करण्यात आला.

उमेद अभियानाच्या सरस २०२५ या महिला बचत गट उत्पादित वस्तूंच्या विक्री आणि प्रदर्शन उद्घाटन कार्यक्रमात हा पुरस्कार देण्यात आला. कार्यक्रमाला दूरदृश्य प्रणालीद्वारे जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक हे उपस्थित होते.

व्यासपीठावर ग्राम विकास यंत्रणेचे प्रभारी संचालक जाधव, मा. शिक्षणाधिकारी सुधा साळुंखे, प्रा.शिक्षणाधिकारी अशोक पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी इगे, कार्यकारी अभियंता राउळ, तसेच सर्व जि.प.चे विभाग प्रमुख उपस्थित होते.

## रमाई सारख्या महिला समाजात निर्माण व्हाव्यात : प्रबोध कांबळे

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.८ फेब्रुवारी -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे परदेशी गेल्यावर शेण गौऱ्या थापून पतीच्या उच्च शिक्षणासाठी पैसे पाठवून पतीला बॅरीस्टर करणारी पत्नी, मुले दगावल्याचे दुःख बाजूला सारून कठीण परिस्थितीशी सामना करीत घरातील जेष्ठांची सेवा आणि कुटूंबाचा आधार बनून स्वाभिमानाने जगणाऱ्या त्यागमुर्ती माता रमाई सारख्या महिला आज समाजात निर्माण व्हाव्यात, असे मत अणदूरचे माजी सरपंच प्रबोध कांबळे यांनी व्यक्त केले.

## तुळजापूरात जेष्ठ व तज्ञ डॉक्टरांच्या कार्याचा गौरव सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.८ फेब्रुवारी -**

येथील हॉटेल स्कायलँड येथे तुळजापूर डॉक्टर असोसिएशन च्या वतीने दि.५ फेब्रुवारी बुधवार रोजी वैद्यकीय सेवा सन्मान सोहळा कार्यक्रम संपन्न झाला. येथील जेष्ठ व तज्ञ डॉक्टरांचा सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.


यावेळी शहरातील तब्बल ४० ते ४५ वर्षे रूग्णसेवा देणारे डॉक्टर्स डॉ. नरसिंग मलबा, सिंधू मलबा, डॉ. सुरेंद्र पेशवे, डॉ. शुभदा पेशवे, डॉ. वज्रकुमार मेहता, डॉ. काशीनाथ गाटे, डॉ. सुरेश बालीगा, डॉ. सुरेश वडणे आदींचा जीवन गौरव पुरस्काराने तुळजापूर डॉक्टर्स असोसिएशन तर्फे सत्कार करण्यात आला. ४०-५० वर्षांपूर्वी कोणत्याही मोठ्या शहरात न जाता वैद्यकीय सेवेतील उच्च शिक्षण घेऊन वरील मंडळींनी तुळजापूर सारख्या ग्रामीण भागात येऊन सर्वसामान्यांनां परवडेल अशी वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन दिली. व आजपर्यंत ते अहोरात्र काम करीत आहेत. याबद्दल असोसिएशनच्या काही सदस्यांनी आपली कृतज्ञतापर भाषणे व्यक्त केली. व त्यांना मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.



## परंडा शहराला कमी दाबाने पाणी पुरवठा; नागरिकांत नाराजीचा सूर

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.८ फेब्रुवारी -**

परंडा नगरपालिकेच्या वतीने शहरात तीन दिवसांनी पिण्याच्या पुरवठा करण्यात येतो पण तो ही कमी दाबाने करण्यात येत असल्याने नागरिकांना कृत्रिम पाणी टंचाईशी सामना करावा लागत आहे. यामुळे नगरपालिकेच्या कारभारा बाबतीत नागरिकांतुन तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.



परंडा शहरापासून जवळच सीना कोळेगाव हा धाराशिव जिल्ह्यातील सर्वात मोठा प्रकल्प असुन व त्यामध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साठा उपलब्ध असताना ही नगरपालिकेच्या वतीने तीन दिवसांनी पाणी पुरवठा केला जातो. तो अपुरा सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू झाले आहेत. त्यामुळे हे येणारे कुंटुबाला पुरत नाही. त्यामुळे पाणी असुन देखील नागरिकांना अडचणी तोंड द्यावे लागत आहे. तसेच तीन दिवसानंतर पाणी येते पण पाणी आले की विद्युत पुरवठा खंडीत होतो विद्युत मोटार लावल्या शिवाय पाणी मिळत नाही. तेव्हा पुन्हा हा दुष्काळात तेरावा महिना वेळोवेळी येतो.

तेव्हा सबंधित अधिकारी यांनी याकडे लक्ष देवुन परंडा शहरास एक दिवसाआड पाणी पुरवठा करावा, अशी मागणी शहरवासीयातुन होत आहे.

### जळकोट येथे रमाई आंबेडकर यांची जयंती साजरी

**जळकोट, दि.८ फेब्रुवारी -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा समिती व युगपुरुष तरुण मंडळाच्यावतीने महामाता, त्यागमुर्ती रमाई भिमराव आंबेडकर यांची १२७ वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी सामुहीक त्रिशरण व पंचशिल घेण्यात आले.

CMYK

धाराशिव
# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जि.प.बाभळगाव शाळेचे एन.एम.एम.एस. परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.८ फेब्रुवारी -**



जानेवारी महिन्यात झालेल्या इयत्ता आठवीच्या आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत कळंब तालुक्यातील बाभळगाव शाळेच्या सोळा पैकी बारा विदयार्थ्यांनी शिष्यवृत्ती पात्र होण्यात यश संपादन केले.

या मध्ये आकांक्षा नवनाथ जमाले हिला १३०, कृष्णाली बालाजी वाघमारे ९४, संघमित्रा सुरेश कांबळे ८९, सोनाली आसराम वाघमारे ८६, कांबळे आर्या बापु कांबळे ८६, श्रुतिका शिवाजी वाघमारे ८५, लक्ष्मी बालाजी वाघमारे ८५, तनिष्का बालाजी वाघमारे ८३, ज्ञानेश्वर मोहन गायकवाड ७७, अविष्कार दत्तात्रय गायकवाड ७६, साक्षी मुकेश अंगरखे ७४, गायत्री शिवाजी अंगरखे यांनी ७३ गुण घेऊन पात्र होण्याचा मान मिळवला. यामुळे सर्व विद्यार्थी मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन होत आहे.



# टेक्निकल टेक्सटाईल पार्क सरकारकडून आर्थिक अनुदानासह मूलभूत सुविधा

### वस्त्रोद्योगमंत्र्यांच्या बैठकीत निर्णय : आ. राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ फेब्रुवारी -**

कौडगाव एमआयडीसीत होवू घातलेल्या टेक्निकल टेक्स्टाईल पार्कमध्ये उद्योग उभारण्यासाठी इच्छुक असलेल्या उद्योजकांना राज्य सरकारच्या खास धोरणांचा मोठा लाभ होणार आहे. भरीव आर्थिक अनुदानसह मूलभूत सोयीसुविधा, व्याज अनुदान, कर परतावा आशा विविध सवलती दिल्या जाणार आहेत. राज्य सरकारने त्यासाठी कार्यवाही सुरू केली आहे. एमआयडीसीच्या माध्यमातून देशातील नामांकित निर्यातदार कंपन्यांना गुंतवणुकीसाठी आमंत्रित करण्याबाबत वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी निर्णायक भूमिका घेतली आहे. त्यामुळे दहा हजार रोजगार निर्मितीचे पहिल्या टप्प्यातील उद्दिष्ट आता सुकर झाले असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

मंगळवारी वस्त्रोद्योग मंत्री सावकारे यांच्या मंत्रालयातील दालनात याअनुषंगाने बैठक घेण्यात आली. यावेळी वस्त्रोद्योग विभागाच्या प्रधान सचिव अंशु सिन्हा, एमआयडीसीचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल भंडारी, वस्त्रोद्योग आयुक्त संजय दैने यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. बैठकीत कौडगाव टेक्निकल टेक्सटाईल पार्कमध्ये विदेशातील गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी उद्योजकांना सुविधा देण्याबाबत धोरण निश्चित करण्यात आले व त्यासाठी उपाययोजना करण्याचे ठरले.

धाराशिव जिल्हा वस्त्रोद्योगाच्या दृष्टीने झोन क्रमांक २ मध्ये येतो. त्यामुळे शासनाच्या धोरणानुसार कौडगाव एमआयडीसीत गुंतवणूक करण्यासाठी इच्छुक उद्योजकांना आकर्षित करण्यासाठी राज्य सरकारच्या माध्यमातून सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना स्थिर भांडवली गुंतवणुकीसाठी ४० टक्क्यापर्यंत आर्थिक अनुदान, मोठ्या उद्योगांना ३५ टक्क्यापर्यंत तर विशाल अर्थात मेगा उद्योगांसाठी अनुदानाची हीच तरतूद ५० टक्क्यापेक्षा किंवा जास्तीत जास्त रु.२२५ कोटी यापैकी जे कमी असेल इतकी भरीव रक्कम अनुदान स्वरूपात मिळणार आहे. दहा हजार रोजगार निर्मितीच्या दृष्टीने आपण मागील अनेक वर्षांपासून सुरू केलेल्या प्रयत्नाला आता खऱ्या अर्थाने यश येऊ लागले आहे.

राज्य सरकारच्या वतीने एमआयडीसीच्या माध्यमातून हा देशातील पहिला विशेष तांत्रिक वस्त्रोद्योग प्रकल्प आपल्या जिल्ह्यात उभारण्यात येणार आहे. ज्या १५ महत्वपूर्ण प्रकल्पांवर आपण सातत्याने परिश्रम घेत आहोत त्यापैकीच कौडगाव एमआयडीसीमधील तांत्रिक वस्त्रोद्योग प्रकल्प हा एक असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील तांत्रिक वस्त्रोद्योग निर्मिती करणारे निर्यातदार उद्योजक आपल्या जिल्ह्यात गुंतवणूक करण्यासाठी यावे यासाठी आपण सतत प्रयत्न केले. त्याला राज्य सरकारच्या माध्यमातून आता बळ मिळत आहे. कौडगाव एमआयडीसीमध्ये सर्वार्थाने मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध आहेत.

विमानतळ, रेल्वेमार्ग, राष्ट्रीय महामार्ग, उजनी जलाशयातून आलेली जलवाहिनी, रिलायन्स गॅस पाईपलाईन त्याचबरोबर याठिकाणी ५० मेगावॅट क्षमतेचा सोलार प्रकल्प यापूर्वीच कार्यान्वित झाला आहे.

त्यामुळे देशातील मोठे उद्योजक आपल्या जिल्ह्यात गुंतवणूक करण्यासाठी इच्छुक आहेत. धाराशिव एक शांत, विकासाभिमुख आणि उद्योग पूरक शहर आहे. याठिकाणी गर्दी, गुन्हेगारी, प्रदूषण अजिबात नाही. कुशल मनुष्यबळ मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. स्थानिक अर्थकारणाला या उद्योगांमुळे मोठी गती मिळणार आहे. गावाजवळ हक्काचे रोजगार उपलब्ध होणार असल्याने स्थानिक नागरिकांमध्येही मोठी सहकार्याची भावना आहे.



या सगळ्या बाबींचा अभ्यास करून जागतिक पातळीवरील निर्यातदार उद्योजक शोधण्याचे आणि त्यांना कौडगाव एमआयडीसीत मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्यासाठी एमआयडीसीच्या माध्यमातून निमंत्रित करण्याचा महत्वपूर्ण निर्णय वस्त्रोद्योग मंत्री ना. संजय सावकारे यांनी घेतला असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे. भारताने २०२४ या आर्थिक वर्षात विविध परदेशी कंपन्यांनी उत्पादित केलेले रु.१८,८०६ कोटींचे टेक्निकल टेक्सटाईल आयात केले आहे.

या विविध कंपन्यांपैकी ज्या मोठ्या प्रमाणात उत्पादन व निर्यातदार कंपन्या आहेत त्यांचा शोध घेण्यासाठी राज्य सरकारने एमआयडीसीच्या माध्यमातून कन्सल्टंटना जबादारी दिली आली आहे.

कौडगाव टेक्निकल टेक्सटाईल पार्कमध्ये गुंतवणूक करण्यासाठी या कंपन्यांना एमआयडीसीच्या माध्यमातून निमंत्रित करण्याचे ठरले आहे. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी २०१९ साली महाजनादेश यात्रे दरम्यान कौडगाव येथे टेक्निकल टेक्सटाईल पार्कची घोषणा केली होती. आता त्यांनी टेक्निकल टेक्सटाईल मिशनही जाहीर केले आहे. या पार्कच्या पायाभूत सुविधांसाठी रु. ११४ कोटींचा आराखडा आपण यापूर्वीच तयार केला आहे.

त्यानुसार पहिल्या टप्प्यात रस्ते विकसित करण्यासाठी २४.५४ कोटी रूपयांच्या कामांना आपल्या महायुती सरकारने प्रशासकीय मान्यताही दिली आहे. हे दहा हजार रोजगार निर्मितीच्या दिशेने हे मोठे पाऊल असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

## कर्ज बोजा नोंद व पी.आर. कार्डसाठी सुरेश बिराजदार यांचे जिल्हाधीकाऱ्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.८ फेब्रुवारी -**



धाराशीव जिल्ह्यातील अनेक नगरपरिषदे अंतर्गत व उमरगा नगर परीषदेत बँकांचा कर्ज बोजा नोंद करुन घेणेसाठी व भुमीअभिलेख कार्यालयास पी.आर. कार्ड देण्यासाठी आदेशीत करणेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश बिराजदार यांनी जिल्हाधिकारी सचिन ओम्बांसे यांना दि.६ रोजी निवेदन दिले.

जिल्हाधिकारी ओम्बांसे यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, उमरगा तालुका हा सिमावर्ती भागातील दुष्काळग्रस्त तालुका असुन अविकसीत तालुका आहे. उमरगा शहरात मिळणाऱ्या वैद्यकीय सेवेमुळे व शैक्षणीक सुविधांमुळे विकसीत होत आहे. यात मोठ्या विस्तृत व सुसज्ज इमारतींची मोठी आवयश्क्ता आहे. उमरगा शहराचा सिटी सर्व्हेन. आल्याने उमरगा नगर परीषद बँकांचा बोजा नोंद करुण घेत नाही. त्याच धर्तिवर भुमी अभिलेख कार्यालय पि.आर. कार्डही उपलब्ध करुण देत नाही. यामुळे बँका बांधकामासाठी कर्ज देत नाहीत. या सर्वांचा परीणाम उमरगा शहराच्या विकासावर होत असुन अनेक मोठे प्रोजेक्ट, बांधकाम, ईमारती बांधकाम स्थगीत व ठप्प झाले आहेत. तरी उमरगा शहराच्या विकासाठी सदरील नगर परीषद व भूमी अभिलेख कार्यालयास पा.आर. कार्ड देण्यासाठी व बोजा नोंद करण्यासाठी आदेशीत करावे, असा उल्लेख या निवेदनात करण्यात आला आहे.

या निवेदनाची तात्काळ दखल घेत जिल्हाधिकारी ओम्बासे यांनी मुख्याधिकाऱ्यांना आदेशित करत जमाबंदी आयुक्ताकडे भूमी अभिलेख कार्यालय यांच्याकडे सदर प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

### जयप्रकाश विद्यालयाचे एन.एम.एम. एस. परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ फेब्रुवारी -**

जयप्रकाश माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथील एन.एम.एम.एस. सन२०२४-२५ या वर्षी १९ (एकोनिस) विद्यार्थी पास झाले आहेत.

या सर्व विद्यार्थ्यांचे डॉ आंबेडकर बालविकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी सुभाष कोळगे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून अभिनंदन करण्यात आले. या यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक छचवड विभाग प्रमुख विनय सारंग, डोंगरे के.ए., क्षीरसागर व्ही.बी., अभिजित घोळवे, अमर कोळगे, भिमराव कांबळे यांनी मौलाचे मार्गदर्शन केले.

विद्यार्थी व शिक्षक यांनी एकही सुट्टी न घेता सतत परीश्रम घेवून हे यश संपादन केले.

## धाराशिवात आज महिलांसाठी साडी वॉकॅथॉन स्पर्धा

### महिलांनी सहभागी होण्याचे आयोजकांचे आवाहन...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ फेब्रुवारी -**

दरवर्षी विविध ठिकाणी होणाऱ्या मॅरेथॉन स्पर्धा सर्वांनाच परिचित असून यामध्ये उत्साहाने सर्वजण सहभागी होत असतात. परंतु यंदा प्रथमच धाराशिव मध्ये महिलांसाठी साडी वॉकॅथॉन होणार असून जवळपास १००० महिला यामध्ये रजिस्ट्रेशन करून सहभागी झालेल्या आहेत.

यावेळी बोलताना वॉकॅथॉनच्या मुख्य प्रवर्तक किरण देशमाने म्हणाल्या की, धाराशिवमध्ये आम्ही प्रथमच हा प्रयोग करत आहोत. कारण सध्याच्या धावपळीच्या युगात महिलांनी रोज सकाळी चालणे, फिरणे, व्यायाम करणे आरोग्यदायी असून प्रत्येकीची सकाळी अगदी फ्रेश सुरू व्हावी हाही या पाठीमागील उद्देश आहे. महिलांचा यासाठी उदंड असा प्रतिसाद मिळालेला आहे. त्यामुळे आमचा ही उत्साह वाढलेला आहे. अपेक्षेपेक्षा जास्त १००० रजिस्ट्रेशन संख्या पूर्ण झाल्यानंतर रजिस्ट्रेशन बंद करावे लागले. कारण हा उपक्रम सुरळीत व्हावा हाच या पाठीमागील उद्देश होता.



रविवार दि.९ फेब्रुवारी रोजी सकाळी सहा वाजता साडी वॉकॅथॉन चे उद्घाटन रोटरी चे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर ३१३२ डॉ. सुरेश साबु तसेच पहिल्या विश्वविजेत्या खोखो संघाच्या विजेत्या अश्विनी शिंदे, जिल्हा मुख्य न्यायाधीश तृप्ती मिटकरी, वैद्यकीय महाविद्यालयाच्या डिन डॉ. शिल्पा दोमकुंडवार यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या साडी वॉकॅथॉन साठी शहरातील खास महिलांसाठी कार्यरत असलेले ओस्ला (ओएसिस लेडीज असोसिएशन), रोटरी क्लब, धारासुर मर्दिनी महिला फेडरेशन, खच वुमेन्स डॉक्टर विंग, निमा वुमेन फोरम, आयुर्वेद व्यासपीठ, क्रेडिट वुमन्स विंग आणि अक्षरवेल महिला साहित्य मंडळ हे आयोजक आहेत. साडी वॉकॅथॉन पाच किलोमीटर आणि तीन किलोमीटर अशी होणार असून याचा मार्ग निश्चित असून त्याची तयारी झालेली आहे. या वॉकॅथॉनसाठी ठरवलेल्या मार्गावरून सुरळीत वॉकॅथॉन व्हावे यासाठी ॲम्बुलन्ससह सर्व यंत्रणा सज्ज ठेवली आहे. या वॉकॅथॉनसाठी अनेक प्रायोजकांनी बक्षिसे प्रायोजित केली असून सहभागी अनेकींना लकी ड्रॉ च्या माध्यमातून ही बक्षिसे मिळण्याची संधीही मिळणार आहे.

तरी शहरातील महिलांनी सुद्धा वॉकॅथॉन मध्ये सहभागी झालेल्या महिलांना सोबत सहभागी होऊन आयोजकांनी दिलेल्या सर्व सूचनांचे काटेकोर पालन करून आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजक मंडळींनी केले आहे.

## भारत स्काऊट गाईडच्या जिल्हा मेळाव्याचा बक्षीस वितरणाने समारोप

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.८ फेब्रुवारी -**



धाराशिव भारत स्काऊट गाईड कार्यालय धाराशिव व शिक्षण विभाग धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यानिकेतन इंटरनॅशनल स्कूल येरमाळा ता. कळंब येथे ता. ६ ते ८ फेब्रुवारी कालावधीमध्ये जिल्हा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यासाठी जिल्हाभरातून एकूण दीड हजार विद्यार्थी सहभागी झाले होते.

या मेळाव्यासाठी विद्यानिकेतन इंटरनॅशनल स्कूल येरमाळा भाग्य शोभा यात्रेचे उद्घाटन गावातील ज्ञानद्योग विद्यालयाचे प्राचार्य पौळ, सचिन बारकुल व सचिन पाटील विद्यानिकेतन इंटरनॅशनल स्कूलची संस्थाचालक यांच्या हस्ते शोभायात्राची उद्घाटन करण्यात आले. येरमाळा येथे विद्यार्थी तंबू मध्ये निवासी होते. विद्यार्थ्यांसाठी लोकनृत्य, बिन भांड्याचा स्वयंपाक, संचालन स्पर्धा, भव्य शेकोटी स्पर्धा, शोभायात्रा, प्रश्नमंजुषा, शारीरिक प्रात्यक्षिके, तंबू सजावट इत्यादी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

सदर स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील जि.प. नगरपालिका, खाजगी व सर्व माध्यमाच्या एकूण पन्नास शाळा सहभागी झाल्या होत्या.

जिल्हा मेळाव्यासाठी पूर्वतयारी म्हणून विक्रांत देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली संजय पोतदार, दिलीप चौधरी, जयपाल शेरखाने, उषा सर्जे, ज्योती आमले, शुभांगी पाटील, सविता पांढरे, खामकर, मेळावा प्रमुख रमेश माने, सुरेश वाघमोडे, स्काऊट गाईड कार्यालयाचे कर्मचारी वरिष्ठ लिपिक परमेश्वर बनसोडे, कनिष्ठ लिपिक सलीम शेख, सेवक दत्तात्रय माने तसेच विद्यानिकेतन इंटरनॅशनल स्कूल येरमाळ्याचे संस्थापक अध्यक्ष तथा प्राचार्य सचिन पाटील व त्यांचे सर्व कर्मचारी बांधव भगिनींनी इत्यादीनी परिश्रम घेतले. तीन दिवस चाललेल्या जिल्हा मेळावा समारोप प्रसंगी ज्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या. त्याचे बक्षीस वितरण उमरग्याचे आमदार प्रवीण स्वामी गावातील ज्येष्ठ नागरिक रणजीत तात्या यांच्या हस्ते करण्यात आले.

हा मेळावा यशस्वी करण्यामध्ये विद्यानिकेतन इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य प्रियंका पाटील, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका वर्षा पवार, संजय बांगर, महेश जाधव, सतीश कोळगे, जोशना बावकर, गायकवाड नितीन पाटील गणेश दिवाने यांचे सहकार्य लाभले.

## राजे उमाजी नाईक यांच्या १९३ व्या पुण्यतिथीनिमित्त उमरग्यात भव्य रक्तदान शिबिर संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.८ फेब्रुवारी -**



तालुक्यातील बेडर, बेरड, रामोशी, बहुजन समाज व जय मल्हार क्रांती संघटना संघटनेच्या वतीने आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांच्या १९३ वी पुण्यतिथीनिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन राजे उमाजी नाईक चौक बायपास रोड उमरगा येथे सोमवारी (ता. तीन) रोजी घेण्यात आले. या शिबीरात ५० युवकांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. या पुण्यतिथी प्रसंगी

आमदार प्रवीण स्वामी, तहसीलदार गोविंद एरमे, नायब तहसीलदार रतन काजळे, भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य, अश्लेष मोरे अध्यक्ष विशाल कानेकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक किरण कुकुर्डे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यासाठी आयोजक अशोक ममाळे, नागनाथ कोराळे, दिलीप कलमले, महेश व्हनाळे, राहुल खवडे, कन्हैया बुकले, नितीन कुकुर्डे, मारुती पाटील, सचिन जमादार, गोपाळ वासुदेव, कृष्णा जमादार, ज्ञानेश्वर यंपाळे, रायान्ना बुकले, शाहूराज जमादार, नेताजी मंडले, तुकाराम ममाळे, काशिनाथ जमादार यांच्यासह श्रीकृष्ण रक्तपेढीच्या कर्मचाऱ्यांनी यासाठी पुढाकार घेतला.

### आंबेवाडीतील बौद्ध वसाहतीतील समस्या कायम; समाजमंदिराऐवजी घाणीचे निर्मूलन करा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ फेब्रुवारी -**

अंबेवाडी येथील दलित वस्तीमध्ये आधीच दोन समाजमंदिरे असताना, तिसऱ्या समाजमंदिराचे बांधकाम सुरू करण्यात आले आहे. मात्र, येथे गेल्या २५ वर्षांपासून घाणीचा मोठा प्रश्न आहे. त्यामुळे समाजमंदिराऐवजी ही समस्या सोडविण्यासाठी निधी वापरण्यात यावा, अशी मागणी बौद्ध बांधवांनी केली आहे.

गावातील दक्षिणेकडील भागात सांडपाणी साचून मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्याचा थेट फटका येथील नागरिकांच्या आरोग्याला बसत असून, नाली आणि रस्त्याची तीव्र आवश्यकता आहे. मात्र, ग्रामपंचायतीने याकडे दुर्लक्ष केले आहे. बौद्ध बांधवांनी समाजमंदिराची कोणतीही मागणी केली नसताना, सरपंच आणि ग्रामसेवकांनी स्वतःच्या फायद्यासाठी ठराव मंजूर करून जिल्हा परिषदेकडून ७ लाख रुपयांचा निधी समाजमंदिरासाठी घेतला. हा निधी घाण व सांडपाणी समस्येच्या सोडवणुकीसाठी वापरण्यात यावा, अशी ग्रामस्थांची मागणी आहे. प्रशासनाने याची गंभीर दखल घ्यावी आणि समाजमंदिराऐवजी प्राथमिक गरज असलेल्या स्वच्छता आणि पायाभूत सुविधांवर खर्च करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## शेतकऱ्यांचे जगणे आता तरी मान्य करा : ओमप्रकाश राजेनिंबाळकर

### लोकसभेत खासदार निंबाळकर यांची केंद्र सरकारच्या धोरणांवर कडाडून टीका...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ फेब्रुवारी -**

लोकसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात धाराशिव लोकसभा मतदारसंघाचे खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर यांनी विविध विषयांवर सरकारच्या धोरणांवर कठोर शब्दांत टीका केली. त्यांनी विशेषतः शेती, विमा, रेल्वे आणि आरोग्य क्षेत्रातील समस्यांकडे सरकारचे लक्ष वेधले.

निंबाळकर यांनी संसदेत बोलताना नाफेड अंतर्गत धाराशिव लोकसभा मतदारसंघातील ४४,०१३ शेतकऱ्यांनी नोंदणी केली असली तरी केवळ १५,७९८ शेतकऱ्यांकडूनच सोयाबीन खरेदी करण्यात आल्याचे स्पष्ट केले. उर्वरित २८,००० शेतकरी अजूनही वंचित असून शेतकऱ्यांचे शेवटचे पोते विक्री होईपर्यंत खरेदीस मुदतवाढ देण्याची मागणी त्यांनी केली.

महाराष्ट्र कृषी मूल्य आयोगाने सोयाबीनसाठी ७,००० रुपये प्रति क्विंटल दर सुचवला असतानाही केंद्राने केवळ ४,८९२ रुपये प्रति क्विंटल दर जाहीर केला आहे, हे स्पष्ट करत निंबाळकर यांनी सरकारला आक्रमक शब्दांत जाब विचारला.

२०१६ मध्ये सरकारने शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्वासन दिले होते, पण प्रत्यक्षात उत्पन्न दुप्पट होण्याऐवजी उत्पादन खर्चच दुपटीने वाढला आहे, अशी टीका त्यांनी केली.

प्रधानमंत्री फसल विमा योजनेंतर्गत केंद्र, राज्य आणि शेतकरी मिळून ४२,००० कोटी रुपये विमा प्रीमियम भरले असतानाही केवळ ३६,००० कोटी रुपयेच शेतकऱ्यांना भरपाई म्हणून मिळाले आहेत. ५,००० कोटी रुपयांचा नफा खाजगी विमा कंपन्यांनी कमावला, याकडे लक्ष वेधत, ही रक्कम कंपन्यांना न देता थेट शेतकऱ्यांना देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी सभागृहात केली.

निंबाळकर यांनी माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या नदीजोड प्रकल्पासंदर्भात कोणतीही तरतूद या अर्थसंकल्पात नसल्याचे सांगितले.



पुरग्रस्त भागांतील पाणी दुष्काळी भागात वळवण्याची योजना सरकारने का पुढे नेली नाही, असा सवाल करत, हा प्रकल्प तातडीने कार्यान्वित करण्याची मागणी केली. धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वे प्रकल्पासाठी सुरुवातीला ९०४ कोटी रुपये मंजूर केले होते, मात्र आता हा प्रकल्प १,०२६ कोटी रुपयांपर्यंत वाढला आहे. या वर्षी ३,००० कोटींची गरज असतानाही केवळ २२५ कोटींचीच तरतूद केल्याचे निंबाळकर यांनी निदर्शनास आणून दिले.

आरोग्य क्षेत्रातील त्रुटींवर भाष्य करताना प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतील आर्थिक मर्यादेमुळे रुग्णांना आवश्यक उपचार मिळण्यात अडचणी येत असल्याचे निंबाळकर यांनी सांगितले.

सर्व प्रकारच्या आजारांवर मोफत उपचार मिळावे यासाठी स्वतंत्र योजना तयार करावी, अशी शिफारस त्यांनी सभागृहात केली.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


# श्री संतोषी माता मंदिराचे बांधकाम अखेर पूर्ण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.८ फेब्रुवारी -** येथील हत्ते नगर रोड नंबर ४ वरील श्री संतोषीमाता मंदिराचे बांधकाम दोन वर्षानंतर पूर्ण झाले असून या कामासाठी १७ लाख ५० हजार रुपयाचे सहकार्य करणारे भक्त दुबईस्थित वासुदेव श्रॉफ यांचे संतोषीमाता भक्त मोहन महाराज यांनी आभार मानले आहेत. यापुढील काळात देवीचीसेवा आणि भाविकांना विविध धार्मिक उपक्रमांच्या माध्यमातून संतोषीमातेच्या कृपाशिर्वाद मिळवून देण्यात येणार असल्याचेही मोहन महाराज यांनी सांगितले.

गेली ३६ वर्षांपासून मोहन महाराज हे श्री संतोषीमाता मंदिरात ,श्री संतोषीमातेच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने नारळी पौर्णिमेला विविध कार्यक्रम घेत होते. तथापि १० बाय ४० आकाराच्या भूखंडावर मंदिराचे बांधकाम झाले नव्हते ही बाब संतोषीमाता भक्त वासुदेव श्रॉफ यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी या मंदिर बांधकामासाठी सढळ होताने अर्थसाह्य करण्याचा शब्द देवून दोन वर्षात त्यांनी वेळोवेळी तब्बल १७ लाख ५० हजार रुपयांची देणगी दिली.त्यामुळे प्रशस्त मंदिराचे बांधकाम करण्यात आले, प्रा.उर्मिला शर्मा, हेमंतदास वज्राणी, देवी मॅडम, देवी लक्ष्मीयांनी यांचेही याकामी योगदान राहिले. या मंदिरात श्री संतोषीमाता,गणेशाची मूर्ती प्रतिष्ठापना,स्टाईल,सजावाट,शौचालय, बाथरुम,लाईट,कलरिंग,व इतर कामांचा समावेश आहे. संतोषीमाता मंदिरात नवरात्र,राखीपौर्णिमा, संतोषीमाता जन्मोत्सव, महाशिवरात्री, गुरुपौर्णिमा व इतर धार्मिक सणांच्या निमित्ताने विविधि धार्मिक कार्यक्रम घेण्यात येतात,याचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन महाराज यांनी केले आहे.



## संक्षिप्त वृत्त...

### शारदा सेमी इंग्लिश स्कूलमध्ये रमाई आंबेडकर जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.८ फेब्रुवारी -** रॉयल एज्युकेशन सोसायटी संचलित शारदा सेमी इंग्लिश स्कूलमध्ये संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवारी माता रमाई आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.

प्रारंभी माता रमाई यांच्या प्रतिमचे पूजन करण्यात आले. स्कूलचे प्राचार्य लक्ष्मण पुरी व माध्यमिक विभागाचे शिक्षक महेश सोनवणे यांनी रमाई आंबेडकर यांच्या जीवन कार्यालया उजाळा दिला. पूर्व प्राथमिक विभागाच्या शिक्षिका वर्षा कांबळे यांनी रमाई यांच्या जीवनाविषयी गीत सादर केले. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागप्रमुख दर्शना बोराडे यांनी तर प्रास्ताविक लिंबराज गायकवाड यांनी केले. आभार रोहिणी कदम यांनी मानले. यावेळी मुख्य समन्वयक अनघा पाटील, मानसी पाटील, रेणुका समुद्रे, समन्वयक रोहित जाधव, आदी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### संकेत माटे याचे परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.८ फेब्रुवारी -** गुणवत्ता विकास परीक्षेत संकेत बुध्दरत्न माटे याने द्वितीय क्रमांक मिळविला आहे. याबद्दल महापालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्या हस्ते त्याचे कौतुक करण्यात आले.

महापालिकेतर्फे महापालिकेच्या सोळा शाळांमधून गुणवत्ता विकास परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेत संकेत माटे हा द्वितीय आला. याबद्दल आयुक्त मनोहरे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन संकेतला गौरविण्यात आले. यावेळी शाळा क्रमांक २६ च्या मुख्याध्यापिका महादेवी चिकाटे, वर्गशिक्षक सुधाकर पांचाळ उपस्थित होते.

### सेवानिवृत्त निरीक्षक सुनील राजहंस राष्ट्रपती पदकाने सन्मानित

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.८ फेब्रुवारी -** तालुक्यातील मौजे बल्लाळनाथ चिंचोली येथील रहिवासी सिमा सुरक्षा दलातील सेवानिवृत्त निरीक्षक सुनील रमाकांतराव राजहंस यांना राष्ट्रपती पदक, सन्मानपत्राने पंजाबचे राज्यपाल गुलाबचंद कटारिया यांच्या हस्ते चंदीगढ येथे एका कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले.



मौजे चिंचोली बल्लाळनाथ येथील रहिवासी असलेले सुनील रमाकांतराव राजहंस हे नुकतेच सिमा सुरक्षा दलातील निरीक्षक पदावरून ४१ वर्षाच्या सेवेनंतर निवृत्त झाले. सन २०२३ च्या गणतंत्र दिनादिवशी उत्कृष्ट कार्य सेवेबद्दल पोलिस मेडल जाहिर करण्यात आले होते. परंतु कोरोना कारणांमुळे सन २०२१,२०२२ आणि २०२३ चे पदक वितरण समारंभ झालेला नव्हता. राष्ट्रपती द्रोपदी मुर्मु द्वारा स्वाक्षरीत प्रमाणपत्राने व पदकाने चंदीगड येथे निप्पर आयुर्वेदिक संस्थेमध्ये झालेल्या कार्यक्रमात पंजाबचे राज्यपाल गुलाब चंद कटारिया यांच्या हस्ते मेडल व प्रमाणपत्र देऊन त्यांना नुकतेच सन्मानित करण्यात आले.

### जिल्ह्यात सोयाबीनची खरेदी बंद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.८ फेब्रुवारी -** या ना त्या कारणाने हमीभाव केंद्रावर सोयाबीनची खरेदी प्रारंभापासूनच रेंगाळलेली होती. कधी बारदाना तर कधी मुदत संपल्याचे कारण सांगून खरेदी बंद करण्यात येत होती. शेवटी मुदतवाढ देऊन चक्क पोर्टल बंद केले आहे. यामुळे हजारो शेतकऱ्यांनी नोंदणी करूनही त्यांच्या सोयाबीनचे माप होऊ दिले नाही.

या शेतकऱ्यांना सोयाबीन परत घरी घेऊन जावे लागणार आहे. नाफेडच्या जिल्ह्यातील १६ केंद्रांवर ४७ हजार ३९७ शेतकऱ्यांनी सोयाबीन विक्रीसाठी नोंदणी केली आहे. त्यापैकी २०५८९ शेतकऱ्यांच्या सोयाबीनचे माप झाले आहे. त्यांच्याकडील ५ लाख २८ हजार ४० क्विंटल सोयाबीनची खरेदी केली आहे. उर्वरित २६८०८ शेतकऱ्यांनी नोंदणी करूनही माप होऊ शकले नाही. परिणामी, त्यांचे सोयाबीन नाफेडकडून खरेदी झाले नाही. किमान नोंदणी झालेल्या शेतकऱ्यांना सोयाबीनची नाफेडकडून खरेदी होईल, अशी अपेक्षा आहे.

# उपमहानिरीक्षकांच्या हस्ते ६५ लाखांचा मुद्देमाल सुपूर्द

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.८ फेब्रुवारी -** नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप हे लातूर दौऱ्यावर आहेत. शुक्रवारी त्यांनी बाभळगाव येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर पोलीस परेडचे निरीक्षण केले. तसेच पोलीस विभागातील अधिकारी-कर्मचारी यांच्या तक्रारी ऐकून घेतल्या. विविध ८० गुन्ह्यांतील जप्त करण्यात आलेला जवळपास ६५ लाखांचा मुद्देमाल संबधितांना सुपूर्द करण्यात आला.




पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप हे वार्षिक निरीक्षण व तपासणीसाठी चार दिवस लातूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. शुक्रवारी पोलीस मुख्यालयात आयोजित पोलीस परेडचे उमाप यांनी निरीक्षण केले. परेडचे संचालन पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, परीक्षाविधीन पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, सागर खर्डे यांनी यांनी केले. परेडनंतर लातूर पोलीस दलाकडून मॉब डिसपर्सल, किट परेड, लाठी ड्रील, स्कॉड ड्रील, वाद्य पथक, बॉम्बशोधक व नाशक पथक, श्वान पथक या पथकांनी सादर केलेल्या प्रात्यक्षिकांची पाहणी केली. जिल्हा पोलीस दलातील पोलीस अंमलदार तसेच सेवानिवृत्त पोलीस अधिकारी, अंमलदार यांच्या आयोजित स्नेहसंमेलनात उपमहानिरीक्षक उमाप यांनी पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या अडचणी जाणून घेतल्या व तत्काळ उपायोजना करण्याचे आदेश दिले. पोलीस अधीक्षक कार्यालयात जिल्ह्यातील विविध ८० गुन्ह्यांतील जप्त करण्यात आलेला सोन्या-चांदीचे दागिने, दुचाकी, चारचाकी वाहन तसेच मोबाइल असा जवळपास ६५ लाख रुपयांचा मुद्देमाल संबंधितांना सुपूर्द करण्यात आला.

# प्रादेशिक उपायुक्तांच्या हस्ते सुगम्य यात्रा उपक्रमाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.८ फेब्रुवारी -** केंद्र शासनाने दिव्यांग व्यक्तींचा सार्वजनिक ठिकाणी अडथळा विरहीत सुलभ वावर होण्याच्या दृष्टीने सुगम्य यात्रा कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद लातूर व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र यांच्यामार्फत लातूर येथील सिध्देश्वर मंदिर येथे आायोजित सुगम्य यात्रा २०२५ या उपक्रमाचे उदघाटन समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे व्यंकट लामजने, दिव्यांग कल्याण विभागाचे राजू गायकवाड, बाळासाहेब वाकडे, लातूर शहरातील दिव्यांग शाळेतील मुख्याध्यापक, कर्मचारी व देव दर्शनासाठी आलेले सर्व भाविक भक्त यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमामध्ये अविनाश देवसटवार यांनी लातूर जिल्ह्यातील ग्रामदैवत सिध्देश्वर मंदिर, गंजगोलाई तसेच इतर सर्व मंदिरे, शहरातील शासकीय इमारती, नगर पालिका, महानगर पालिका, सिनेमा गृहे, प्रेक्षणीय स्थळे, ग्रंथालये, बाजारपेठा इत्यादी ठिकाणी दिव्यांग व्यक्तींसाठी अडथळा विरहीत करण्याच्या दृष्टीने समाजाने संवेदनशील होऊन दिव्यांगासाठी सुलभ व सहज वावर होण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाचे सूत्र संचलन राजू गायकवाड यांनी तर आभार बाळासाहेब बाकडे यांनी केले. यावेळी अनेकांची उपस्थिती होती.

# सर्वोत्तम राज्यस्तरीय पुरस्काराचे वितरण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.८ फेब्रुवारी -** येथील सर्वोत्तम सोशल टीमच्या वतीने राज्यभरातील शिक्षण, आरोग्य, ग्राम, कृषी, महसूल, क्रीडासह विविध क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या प्रतिभावंतांना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

शहरातील विश्व पॅलेस येथे आयोजित समारंभाच्या अध्यक्षस्थानी शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय अधिकारी रोहिणी नन्हे-विरोळे, डायटच्या प्राचार्य भागीरथी गिरी, शिक्षणाधिकारी संजय पंचगले, ॲड. तुषार शिवशरण, उत्तम शेळके, पत्रकार शशिकांत पाटील यांची उपस्थिती होती.

तहसीलदार सौदागर तांदळे, गटविकास अधिकारी अमोल ताकभाते, शिवकुमार बिराजदार, गटशिक्षणाधिकारी सुरेश गायकवाड, निलेश घुगे, पोलीस निरीक्षक दत्तात्रय साळुंखे, विश्वंभर पल्लेवाड , महावीर यादव, आदिंना सन्मानित करण्यात आले.

# वृक्ष लागवड आवश्यक :माजी आ. पटेल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.८ फेब्रुवारी -** सध्या सगळीकडे तापमानामध्ये मोठी वाढ होत असल्याने हवेतील गारवा संपत येत आहे. तसेच तापमानाची वाढ थांबवायची असेल तर लोखंड, वीज याचा वापर कमी करावा लागेल. बांबूसह इतर झाडे लावली पाहिजेत. त्याशिवाय तापमानात घट होणार नाही, असे प्रतिपादन कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी येथे शुक्रवारी केले.



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने आयोजित लातूर येथील श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेच्या परिसरात तिसऱ्या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाला प्रारंभ झाला. यावेळी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अभय साळुंके, मनसेचे महाराष्ट्र शेतकरी सेनेचे प्रदेशाध्यक्ष संतोष नागरगोजे, किशोर सरकार, नमाज अली, सुमन धस, बंडू कुठे, दिलीप गायकवाड, प्रशांत बारई यांची प्रमुख उपस्थिती होती.

पाशा पटेल म्हणाले, शेतीला चांगले दिवस आणायचे असतील तर शेतकरी जगला पाहिजे. सध्या लागणारी वीज आणि विजेला लागणारा कोळसा यामुळे तापमानामध्ये भरमसाठ वाढ होत आहे. त्यामुळे बांबूचे व इतर झाडे लावणे सध्या गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी आधुनिक शेती करताना त्यातील बारकावे समजून घ्यावेत, असे आवाहनही त्यांनी केले. प्रास्ताविकात संतोष नागरगोजे यांनी प्रदर्शनाची भूमिका विशद केली यावेळी भागवत शिंदे, रेखाताई नागराळे, शिवकुमार नागराळे, संजय राठोड, मनोज अभंगे, रवी सूर्यवंशी, रणवीर उमाटे, सचिन शिरसाट, किरण चव्हाण, प्रीतीताई भगत, भागवत कांदे, अंकुश शिंदे, पांडुरंग कदम, वाहेद शेख उपस्थित होते. सूत्रसंचालन बालाजी कांबळे यांनी केले. आभार नरसिंग भिकाणे यांनी मानले.

# सोयाबीन उत्पादकांना सरसकट भावफरक द्या: उपसभापती सोमवंशी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.८ फेब्रुवारी -** बाजारातील कमी झालेले भाव आणि सरकारच्या खेरदीतील गोंधळामुळे शेतकऱ्यांना खुल्या बाजारात सोयाबीन विकावे लागले. त्यामुळे हमीभावापेक्षा किमान ९०० ते एक हजार रुपये कमी भाव मिळाला. सोयाबीन उत्पादकांना दिलासा देण्यासाठी सरकारने हा भाव फरक शेतकऱ्यांच्या खात्यात थेट जमा करावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य बाजार समितीचे उपसभापती संतोष सोमवंशी यांनी केली आहे.



देशातील सोयाबीनचे भाव मागील तीन वर्षांपासून सातत्याने कमी होत आहेत. त्याचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. यंदा तर बाजारात हमीभावही मिळाला नाही. शेतकरी हमीभावाच्या अपेक्षेने सरकारी खरेदीकडे डोळे लावून बसले होते. मात्र सरकारच्या खेरदीतील गोंधळ पाहून बहुतांशी शेतकऱ्यांनी खुल्या बाजारातच कमी भावात सोयाबीन विकावा, अशी वेळ सरकारने आणली. एकतर शेतकरी विविध संकटात आहे. शेतकऱ्यांना उत्पादन कमी मिळाले. त्यातच बाजारभाव नसल्याने शेतकरी आडचणीत आले आहेत.

शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली नसल्याने आणि बाजारात भाव नसल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या. शेतकरी आत्महत्या वाढत आहेत. असे झाले तर शेतकरी पुढच्या हंगामात सोयाबीनचे पीक घेणार नाहीत. आपले पंतप्रधान खाद्यतेलात आत्मनिर्भर होण्याच्या गप्पा मारतात. पण सोयाबीन उत्पादकांना देशोधडीला लावून आत्मनिर्भर कसे होणार? हा प्रश्न पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी स्वतःला विचारायला हवा.

सोयाबीन उत्पादकांना सरकारच्या आधाराची यंदा गरज आहे. सरकारने खुल्या बाजारात सोयाबीन विक्री केलेल्या शेतकऱ्यांना भाव फरक द्यावा. जेणेकरून शेतकऱ्यांना हमीभाव तरी मिळेल. असे ते म्हणाले.

## दयानंद महाविद्यालयाचे संस्कार परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.८ फेब्रुवारी -** दयानंद वाणिज महाविद्यालयात गांधी रिसर्च फाउंडेशन जळगावच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या गांधी विचार संस्कार परीक्षा २०२४-२५ मध्ये बी कॉम प्रथम वर्षातील विद्यार्थिनी कु. वेदिका पोपट आडसूळ व तृतीय वर्षातील विद्यार्थिनी कु. ऋतुजा हनुमंत पौळ ने लातूर जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळवून सुवर्णपदक पटकावले आहे.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांनी सत्कार करून गौरव केला. यावेळी डॉ. गणेश लहाने, डॉ. बाळासाहेब चव्हाण, डॉ. मनीषा आष्टेकर, डॉ. साईनाथ उमाटे, प्रा. मेरवान राठोड आदी उपस्थित होते.

# संशयित हृदयरोगी बालकांची तपासणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.८ फेब्रुवारी -** राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील अंगणवाडी व शालेय विद्यार्थी यांच्या तपासणीत ६९ बालके संशयित हृदयरोगी असल्याचे आढळून आले होते. त्यानुसार शुक्रवारी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, डॉ. अशोक सारडा, डॉ. श्रीधर पाठक, डॉ. आनंद कलमे यांच्या मार्गदर्शनाखाली मोफत टू-डी इको तपासणी झाली.

शिबिराचे उद्घाटन आरोग्य उपसंचालक डॉ. अर्चना भोसले-किर्दक यांच्या हस्ते करण्यात आले. बालकांची तपासणी हृदयरोगतज्ज्ञ डॉ. बी.जी. दुबे यांच्या हॉस्पिटलमध्ये मोफत करण्यात आली. पुणे येथील बालहृदयरोग तज्ज्ञ डॉ. पंकज सुगावकर यांनी ही तपासणी केली असता २९ बालकांवर शस्त्रक्रिया करणे गरजेचे असल्याचे स्पष्ट झाले.

बालकांवर पुणे येथील हॉस्पिटलमध्ये मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. यशस्वितेसाठी अमोल झेंडे, डॉ. जगदाळे, डॉ. सुरनर, डॉ. उगले, डॉ. गोपाल वैजवाडे, राजेंद्र सोनकांबळे आदींनी परिश्रम घेतले.

# माता रमाई असीम त्यागाचे प्रतीक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.८ फेब्रुवारी -** माता रमाई या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सुविद्य पत्नी होत्या. माता रमाईंच्या त्यागामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विश्वातील अद्वितीय व्यक्तिमत्त्व तथा भारतीय घटनेचे शिल्पकार होऊ शकले. त्यामुळे माता रमाई आंबेडकर या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील असीम त्यागाचे प्रतीक होत, असे प्रतिपादन भिक्खू पय्यानंद थेरो यांनी केले.



त्यागमूर्ती माता रमाई यांची १२७ वी जयंती डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे साजरी करण्यात आली. त्यावेळी भिक्खू पय्यानंद थेरो यांनी मार्गदर्शन केले. पुढे ते म्हणाले, माता रमाई आंबेडकर यांनी आपल्या आयुष्यात बाबासाहेबांच्या कार्याला पाठिंबा देण्यासाठी अनेक कष्ट आणि त्याग सहन केले. गरीबी, अपार दुःखाचा सामना करत, त्यांनी बाबासाहेबांना त्यांच्या ध्येयात पूर्ण साथ दिली. त्यांच्या या त्यागामुळेच बाबासाहेब समाजासाठी स्वतःला संपूर्णतः झोकून देऊ शकले, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी प्राचार्य डॉ. संजय गवई, भारतीय बौध्द महासभेचे जिल्हाध्यक्ष एम. एम. बलांडे, प्रा. विश्वनाथ आल्टे यांनीही मनोगत व्यक्त केले.

यावेळी विजय चौधरी, अनिरुध्द बनसोडे, राहुल शाक्यमुनी, शिवाजी सोनकांबळे, कुमार सोनकांबळे, सुधाकर कांबळे, विक्रम शिरसाठ, रवी गायकवाड, विनय जाकते, उदय सोनवणे, ज्योतीराम लामतुरे, नील धावारे, नीलेश बनसोडे, विशाल वाहुळे, मिलिंद धावारे, बालिका जोगदंड, शकुंतला नेत्रगावगर, बेबीताई कांबळे, कविता धावारे, त्रिशला घोडके, अस्मिता शाक्यमुनी, अनुसया कांबळे, सुमन उडानशिव, पंचशीला भडके, शारदा लामतुरे यांच्यासह धम्मसेवक ग्रुप व भारतीय बौध्द महासभेचे पदधिकारी, सदस्य, उपासक - उपासिकांची उपस्थिती होती.

## आंब्याच्या बागेला आग; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.८ फेब्रुवारी -** बोरवटी शिवारातील एका आंब्याच्या बागेला, तुरीच्या बनिमीला अज्ञाताने आग लावल्याची घटना घडली. यामध्ये शेतकऱ्याचे जवळपास तीन लाखांचे नुकसान झाले आहे. याबाबत लातूर ग्रामीण पोलिस ठाण्यात गुरुवारी गुन्हा दाखल आहे.

फिर्यादी उदय बिपीनचंद्र चामले (वय ५७ रा. बोरवटी ता.जि. लातूर) यांची शिवारात शेती आहे. शेतातील तूर काढून बनीम रचण्यात आली होती. दरम्यान, अज्ञातांनी आंब्याच्या बागेसह तुरीच्या बनिमीला पेटवून दिले. या आगीत आंब्याची बाग, तुरीची बनीम जळाली असून संबंधीत शेतकऱ्यांचे जवळपास तीन लाख रुपयांचे नुकसान झाले अशी माहिती पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांनी दिली. या प्रकरणी पुढील तपास सहायक फौजदार कोतवाड करीत आहेत.

# सोयाबीन खरेदीला एक महिन्याची मुदतवाढ द्यावी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.८ फेब्रुवारी -** सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्रावरील खरेदीची मुदत ७ फेब्रुवारी २०२५ रोजी संपल्यानंतर खुल्या बाजारात सोयाबीनचे दर प्रतिक्विंटल एक हजार रुपयांपर्यंत खाली गेल्यामुळे शेतकरीवर्ग प्रचंड अडचणीत आणि तणावाखाली आला आहे. या परिस्थितीत शासनाने हमीभावाने सोयाबीन खरेदीसाठी एक महिन्याची मुदतवाढ द्यावी, अशी मागणी माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस व पणन मंत्री जयकुमार रावल यांच्याकडे केली आहे.



यावर्षी राज्यात ५० ते ६० लाख मॅट्रिक टन सोयाबीनचे उत्पादन झाले असून सोयाबीन हमीभाव केंद्रावर आतापर्यंत केवळ १० ते १२ लाख मेट्रिक टन सोयाबीनचीच खरेदी झाली आहे. शासनाने ठरवून दिलेला सोयाबीन खरेदीचा हमीभाव ४ हजार ८९२ रुपये असून आज हमीभाव खरेदी केंद्रावरील खरेदी थांबल्यानंतर खुल्या बाजारात ३ हजार ९०० रुपयांच्या खाली सोयाबीन विकले जात आहे. शासनाने हमीभाव खरेदी केंद्र सुरू करण्यापूर्वीच शेतकऱ्यांना ऑनलाइन पध्दतीने सोयाबीनची नोंदणी करण्यास सांगितले होते. प्रत्यक्षात उशिराने सुरू झालेल्या हमीभाव खरेदी केंद्रांवर अत्यंत धीम्या गतीने खरेदी सुरू राहिली, मध्यंतरी बारदाना नाही म्हणून काही काळ ही खरेदी बंद ठेवण्यात आली, ३१ डिसेंबरपर्यंत नोंदणी झालेले सर्व सोयाबीन खरेदी केले जाईल, असे सांगितले, नंतर ही मुदत ६ फेब्रुवारीपर्यंत वाढवण्यात आली. या कालावधीत केवळ दहा ते बारा लाख क्विंटल एवढ्याच सोयाबीनची खरेदी झाली आहे. सद्य परिस्थितीत हमीभाव केंद्रांवर मोठ्या प्रमाणात सोयाबीन पडून असून, ज्या शेतकऱ्यांना मेसेज गेला नाही त्याच्या घरीही सोयाबीन शिल्लक आहे. नोंदणी झालेल्या ५० टक्के सोयाबीनची खरेदी झाली नाही. त्यामुळे किमान नोंदणी झालेले सोयाबीन शासनाने एक महिन्याची मुदतवाढ देऊन खरेदी करणे आवश्यक आहे, असे आमदार देशमुख यांनी मुख्यमंत्री व पणन मंत्र्यांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे.

लातूर
# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपचा विजय : उदगीरात जल्लोष


**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.८ फेब्रुवारी -**

दिल्ली केंद्रशासित प्रदेशाच्या पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला मोठे यश मिळाले आहे. दिल्लीमध्ये भारतीय जनता पक्षाला मिळालेल्या यशाबद्दल उदगीर भाजपाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकात फटाके वाजवून जल्लोष साजरा करण्यात आला.



यावेळी भाजपचे शहराध्यक्ष मनोज पुदाले, राहुल केंद्रे, बस्वराज बागबंदे, उत्तरा कलबुर्गे, शिवशंकर धूपे, उदय ठाकूर, गणेश गायकवाड, अमोल अंकुले, आनंद बुंदे, रामेश्वर पवार, लखन कांबळे, मोतीलाल डोईजोडे, बापूराव येलमटे, दत्ता पाटील, दिलीप मजगे, संजय पाटील, आनंद साबणे, शिवकर्णा अंधारे, मारुती कोटलवार, चेतन सूर्यवंशी, सचिन सूर्यवंशी, व्यंकट काकरे, रवी कासले, सुजित जीवने, धनराज जाधव यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# ग्रामीण भागात साखरेच्या तुलनेत सेंद्रिय गुळाला मागणी



**तभा वृत्तसेवा / रियाज मोमीन**
**वलांडी, दि.८ फेब्रुवारी -**

अलीकडच्या काळात आयुर्वेदात गुळाला महत्त्व प्राप्त झाल्याने गूळ साखरेपेक्षा अधिक भाव खाऊन जात आहे. गत वर्षी गूळाला ६० रूपये प्रति किलो व ते १०० रूपये किलो इतके बाजारभाव होते. सद्य:स्थितीत गुळाचा डाग दर ७० रुपये किलोपासून गूळाच्या वड्या १४० रुपये किलोपर्यंत आहे. पूर्वीच्या तुलनेत आता गुळाची मागणी वाढत आहे. गूळाच्या वड्यांना फार मोठ्या प्रमाणात मागणी वाढली आहे.

कर्नाटक व आंध्रप्रदेश येथे गूळाचे वड्या व गूळाचे ढेपाचे नमूने देण्यात आले आहेत. गुळाची मागणी यंदा महाराष्ट्रात अधिक वाढल्याने परराज्यात माल देण्याची आवश्यकता पडत नाही. सध्या निलंगा, उदगीर, लातूर, धाराशिव, छत्रपती संभाजी नगर, नांदेड सह ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात गूळाला मागणी वाढली आहे. सध्या साखरेच्या दरात वाढ होत आहे. गुळाचा दरही साखरेपेक्षा अधिक आहे. तरीही गूळ हा साखरेपेक्षा आरोग्यास चांगला असल्याने साखरेपेक्षा गुळाचा वापर चांगला, असे सांगितले जाते.

गुळामध्ये अनेक पोषक घटक मिळतात. कारण गुळामध्ये लोह, मॅग्नेशियम, पोटॅशियम, मँगनिज, व्हिटॅमिन बी, कॅल्शिअम, जस्त, फॉस्फरस व तांबे यासरखी अनेक महत्त्वाची पोषकतत्त्वे असतात.

त्यामूळे गूळ शरीरासाठी फायदेशीर ठरतो. या शिवाय सणासूदीत घराघरांत अनेक गोडधोड पदार्थ बनवले जातात. शिवाय, कामाची मरगळ झटकण्यासाठी अनेकांना चहा हवाच असतो. युवा पिढीचा देखील गुळाच्या चहाकडे कल वाढत आहे.

कोणी साखरेचा, तर कोणी गुळाचा घेतात. दरम्यान, मागील काही दिवसांपासून साखरेच्या दरात वाढ होताना दिसत आहे.

### गूळ अन्न पचनास योग्य

साखरे पेक्षा सेंद्रीय गूळ शरीरासाठी खूप फायदेशीर ठरते. दैनदिन आहारानंतर गूळाचे एक वडी किंवा तुकडा खाल्याने अन्न पचणास मदत होते. गूळाचे सतत सेवन केल्याने शरीरास लोह, मॅग्नेशियम, पोटॅशियम, जस्त, तांबे, यासारखी अनेक पोषक तत्व शरीरास उपयोगी ठरतात.

**-डॉ. श्रुती गरड,** वलांडी

### आयुर्वेदिक ठरतो सेंद्रिय गूळ

गुळाला आयुर्वेदिक महत्व आहे. या उलट उसापासून साखर बनवताना विविध प्रकारची प्रक्रिया केली जाते. तसेच केमिकल्स वापरले जातात. त्यामुळे साखर खाणे आरोग्यास धोकादायक आहे. साखर खाल्लयाने शुगर, चरबी वाढते, तर गूळ खाणे आरोग्यास लाभदायक ठरतो.

**- कुमार पाटील,** शेतकरी, धनेगाव







अनेक जण गुळाचा चहा पीत असल्याचे दिसून येत आहे.

गुळ हा साखरेपेक्षा महाग आहे; परंतु तो आरोग्यवर्धक असल्याने गोड म्हणून गुळाचा वापर करणे फायदेशीर ठरत आहे. त्यामुळेच आता अनेक ठिकाणी गुळाचा स्पेशल चहाच्या विक्रीत मोठ्या प्रमाणावर वाढ होताना दिसून येत आहे. गुळाचे सेवन करणे अगदी फायदेशीर आहे. आधी गूळ गरिबांसाठी आणि साखर श्रीमंतीचे लक्षण समजले जायचे; परंतु साखरेत कोणतेही पोषक घटक नसून यामुळे आरोग्याचा विचार करता नागरिक आरोग्यासाठी हितकारक असलेल्या गुळाकडे वळले असल्याचे व्यापाऱ्याशी केलेल्या चर्चेवरून दिसून येत आहे. आधी गुळाचा चहा कोणी घेत नव्हते, सद्य:स्थितीत गुळाचा चहा प्रतिष्ठेचा बनला आहे.

ग्रामीण भागामध्ये तर पूर्वीपासून गुळाचा वापर होत होता. साखर महाग असल्याने परवडण्यासारखी नसल्याने सर्रास गुळाचा वापर केला जायचा. ज्यांच्या घरी साखरेचा चहा ते प्रतिष्ठित समजल्या जायचे आजच्या घडीला हे गणित पूर्णपणे उलटे झालेले दिसून येत आहे.

## अवैधरित्या वाळू वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त

### शिरूर अनंतपाळ तहसीलची कारवाई...



**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.८ फेब्रुवारी -**

तालुक्यातील उजेड व ढोबळेवाडी मांजरा नदीपात्रातून रात्री बेरात्री चोरीच्या मार्गाने वाळूउपसा करून अवैधरित्या वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर २ फेब्रुवारी रोजी शिरूर अनंतपाळ तहसीलचे नायब तहसीलदार यांनी कारवाई केली.

मागच्या अनेक दिवसांपासून रात्री बेरात्री चोरीच्या मार्गाने ढोबळेवाडी येथील दीपक गोविंदराव वाघमोडे हा व्यक्ती प्रशासनाच्या डोळ्यात माती घालून वाळू विक्री करत होता. ही माहिती शिरूर अनंतपाळ महसूल एकचे नायब तहसीलदार पथक प्रमुख लालासाहेब कांबळे सहाय्यक गणेश राठोड, कोतवाल सुधीर गायकवाड, कृष्णा कल्ले, अजित गुगळे यांनी अचानकपणे धाड टाकून ट्रैक्टर पकडला.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९९६ चे कलम ४८ (७) (८) या कायद्याच्या नियमानुसार वाहन क्रमांक एम एच २४/४२३२ या ट्रॅक्टर जप्त केली त्याची किंमत १ लाख व महसूल विभागाचा दंड २९ हजार ४३८ रुपये १ लाख २९ हजार ४३८ असा दंड लावण्यात आला व नंतर शिरूर अनंतपाळ तहसील ट्रॅक्टर जमा केला. याबाबत अधिकचा तपास पोलिस करीत आहेत.

## केळगाव येथे विविध विकास कामांचा शुभारंभ



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.८ फेब्रुवारी -**

तालुक्यातील केळगाव येथे प्रमुख मान्यवरांच्या हस्ते जनसुविधेअंतर्गत अनेक प्रभागातील विविध विकास कामांचा शुभारंभ करण्यात आला.

तालुक्यातील केळगाव येथे आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या प्रयत्नातून केळगावला मोठ्या प्रमाणात विकास निधी प्राप्त झाला आहे. येथील विविध विकासकामांचे भुमिपुजन माजी पालकमंत्री आ. संभाजीराव पाटील-निलंगेकर यांच्या हस्ते करण्यात आले होते.

या विकास कामाला प्रत्यक्ष सुरुवात दि.५ फेब्रुवारी रोजी झाली. यामध्ये जनसुविधा व तांडा वस्ती सुधार योजनेअंतर्गत येथील इंदिरा नगर भागातील व अहिल्याबाई होळकर चौक, आनंदमुनी विद्यालयाच्या पाठीमागील भागातील नवीन वस्तीत, वसंत नगर तांडा या भागात सिमेंट कॉंक्रेट रस्त्याचे जवळपास एकूण सत्तर लाखांच्या कामाचा केळगाव येथील सरपंच कोडांबाई कांबळे, उपसरपंच सुधाकर चव्हाण, रिपाईचे जिल्हा उपाध्यक्ष अंकुश ढेरे, वीरेंद्र पाटील, प्रा. रोहीत बनसोडे, वैभव पाटील, दिपक पाटील, भंपू चव्हाण, शिवाजी राठोड, समिदंर काळे, छत्रगुण काळे, सुभाष कांबळे, राजकुमार राठोडकर यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. यावेळी प्रमुख मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

या विविध विकास कामांचा शुभारंभ प्रसंगी श्रीहरी परळे, एकनाथ बनसोडे, प्रकाश कांबळे, हरि मुंजाळे, माधव कांबळे यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

## सांस्कृतिक कार्यक्रम, शालेय साहित्य वाटपाने पानगांवात रमाई जयंती उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.८ फेब्रुवारी -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धांगिनी त्याग मुर्ती माता रमाई यांची जयंती शालेय विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाने, शालेय साहित्यांचे तसेच खीर दान वाटप करून पानगांवात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

पानगांव (ता.रेणापूर) येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या येथील आंबेडकर नगरात पवित्र अस्थी आहेत.

या पवित्र अस्थीच्या ठिकाणी शुक्रवार (दि.७) रोजी सकाळी तथागत भगवान गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी कलश, आणि त्याग मुर्ती माता रमाई यांच्या प्रतिमेचे मुख्याध्यापिका एस.आर. चव्हाण यांच्या हस्ते पुष्पांनी, धुपांनी पुजन करून सामुहिक पंचशील त्रिशरण ग्रहण करून अभिवादन करण्यात आले.



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंबर २ शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना माजी सैनिक पंडीतराव आचार्य यांच्या वतीने वही, पेन आणि मिठाईचे वाटप करण्यात आले. रात्री आठ वाजता शालेय विद्यार्थ्यांच्या भाषण स्पर्धा, बुद्ध, भिम, रमाई आणि देशभक्ती गितांवर तीन तासांचे सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले.

या कार्यक्रमा दरम्यान वैशाली महिला मंडळाच्या ज्योती आचार्य, प्रणिता आचार्य, अनिता आचार्य, मालन आचार्य, मिना कांबळे, सपना आचार्य, कालींदा गोडबोले, प्रेमला आचार्य, आरती आचार्य, लक्ष्मी आचार्य, नंदीनी आचार्य, सत्यशिला आचार्य, संगीता आचार्य, सुवर्णा कांबळे यांच्यासह आदि महिलांनी जागेवरच खीर दान वाटप केले.

याप्रसंगी रमाई जयंती करिता पुढाकार घेणाऱ्या वैशाली महिला मंडळास गोरोबा आचार्य, गौतम गोडबोले विष्णु आचार्य, रत्नराज आचार्य, पवन आचार्य, नारायण आचार्य यांच्यासह आदिंनी सहकार्य केले.

## स्व. रोहित लाल यांच्या स्मरणार्थ शैक्षणिक साहित्य वाटप

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.८ फेब्रुवारी -**

एखाद्या व्यक्तीच्या महान कार्यामुळे आपण त्यांची जयंती, पुण्यतिथी किंवा त्यांच्या स्मरणार्थ विविध कार्यक्रम आयोजित करतो, असे मत प्रा. पवन सूर्यवंशी यांनी व्यक्त केले. जीवन प्रयाग फाऊंडेशन उदगीरच्या वतीने सक्सेस कोचिंग क्लासेस येथे स्व. रोहित लाल यांच्या चतुर्थ पुण्यस्मरण दिनानिमित्त व्याख्यान व शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रारंभी लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे, लहुजी वस्ताद साळवे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. या व्याख्यान व साहित्य वाटप कार्यक्रमात मंचावर उपस्थित कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. महालिंग मठपती, प्रमुख पाहुणे नितीश शिरशे, प्रमुख वक्ते प्रा. पवन सुर्यवंशी, कार्यक्रम प्रमुख रुद्राक्ष लाल उपस्थित होते.

## ईडिसा खो-खो स्पर्धेत राजीव गांधी पॉलीटेक्निकच्या संघ विजेता

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.८ फेब्रुवारी -**

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई अंतर्गत येणाऱ्या पदविका महाविद्यालयचे आंतर पदविका अभियांत्रिकी विद्यार्थी क्रीडा संघटना जी टू झोन स्पर्धेचे आयोजन श्री वेताळेश्वर शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत ११ संघानी सहभाग घेऊन चुरशीच्या लढती दिल्या. या अटीतटीच्या झालेल्या स्पर्धेत राजीव गांधी इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटेक्निकच्या संघाने विजेतेपद पटकावले आहे. तर लातूरच्या पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाने उपविजेतेपद मिळवले.



कार्यक्रमाला उपस्थित प्रमुख पाहुणे म्हणून लातूर-रेणापुरचे तालुका क्रीडा अधिकारी एस.एस. कराड, ईडिसाचे सचिव जी.बी सुडे, प्राचार्य संतोष मेदगे, प्रा.जे.सी राठोड, प्रा.एस.आर. मुधोळकर, प्रा.ओ.एस. परोडवाड यांच्या हस्ते खो-खो स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या स्पर्धेतील विजेत्या संघाना संस्थेचे सचिव वेताळेश्वर बावगे, प्राचार्य संतोष मेदगे, प्राचार्य डॉ. श्रीनिवास बुमरेला, प्राचार्य डॉ. वीरेंद्र मेश्राम, योगिता बावगे, प्राचार्य माधव सोनहिवरे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. पंच सुजित माळी, प्रकाश अहिरे, नंदकुमार थडकर, अविनाश मते यांचा शाल व ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी क्रीडा प्रमुख डी.पी. पाटील, शुभम गवळी, मनदीप सवाई, पंचाक्षरी एस.एम., तडके के.डी. आदी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# वलांडी आठवडी बाजारात भाजीपाल्याचे दर घसरले; शेतकरी चिंतेत

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.८ फेब्रुवारी -**

तालुक्यातील वलांडी येथे आठवडी बाजार दर शुक्रवारी असतो. याच आठवडी बाजारात दिवाळी सना सूदीत दोन ते तीन महीन्याअगोदर टोमॅटोचे दर २०० ते २५० पार होते. त्यामुळे सामान्य जणतेचे व गृहिनींचे आर्थिक बजेट कोलमडले होते. मात्र सध्या या ऊलट झाला आहे.जगाचा पोशींदा शेतकरी राजा संकटात सापडला आहे. तर सामन्य जणतेला दिलासा मिळालेला दिसत आहे.

वलांडी सिमावर्ती भाग असल्याने नागरीक आठवडी बाजार खरेदीसाठी कर्नाटकातून वलांडी बाजारात येऊन भाजीपाला व जिवन आवश्यक वस्तू खरेदी करतात व ३० ते ३५ गावाचे आर्थिक व्यवहार व उलाढाल वलांडी बाजारपेठेतूनच होते. दोन ते तीन महिन्यापूर्वी टोमॅटोचे दर २०० ते २५० पार होते.



तर सध्या वलांडी आठवडी बाजारात टोमॅटोचे भाव १५ ते २० रुपये इतके आहेत.

दोन महीन्यापुर्वी टोमॅटोच्या दराने उच्चांकी गाठल्याने शेतकऱ्यांचा टोमॅटो शेती करण्याकडे कल वाढला होता.

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी टोमॅटोची उच्चांकी पाहता टोमॅटोची लागवड केली. मात्र सर्वत्र टोमॅटोची आवक वाढल्याने टोमॅटोच्या दरात घसरण झाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे.

शेतकऱ्यांना आपला पिकविलेला माल नाविलाजाने कवडीमोल विक्री करावा लागत आहे.सध्या बाजारात भाजीपाल्याची आवक वाढल्याने दरात मोठी घसरण झाली आहे.

भाजीपाला घरात साठवून ठेवू ही शकत नाही व बाजारात विक्रीसाठी आणायला वाहतूक खर्च ही परवडत नाही.

### दोन महीन्यापूर्वीचे भाजीपाल्याचे दर

टोमॅटो २०० ते २५० रू किलो.
कांदा ५० ते ६० रू किलो.
बटाटा ३५ ते ४० रू किलो.
लसुन ३५० ते ४०० रू किलो.
शेवगा १२० ते १३० रू किलो.
मैथी ३० ते ४० रू पेंडी.
लिंबू १५० ते २०० रू किलो.
वरणा ८० ते १०० रू किलो.
पालक ७० ते ८० रू किलो.
गोबी १०० ते १२० रू किलो.
कोथींबीर २० रू पेंडी.

### सध्या भाजीपाल्याचे दर

टोमॅटो १० ते १५ रू किलो.
कांदा २५ ते ३० रू किलो.
बटाटा ३० ते ३५ रू किलो.
लसुन १०० ते १५० रू किलो.
शेवगा ९० ते १०० रू किलो.
मैथी २० ते २५ रू पेंडी.
लिंबू ६० ते ७० रू किलो.
वरणा ७० ते ८० रू किलो.
गोबी ७० ते ८० रू किलो.
कोथींबीर १० रू पेंडी.
असे दर आहेत.

सध्या आठवडी बाजारात आणलेला भाजीपाला खरेदी करून बाजारात आणून विक्री करण्यास परवडत नाही. विक्रीसाठी आणलेला माल विक्रीनंतर गाडीभाड्य साठी परवडत पण नाही. भाजीपाल्यांची आवक वाढल्याने भाजीपाल्याच्या दरात घसरण झाली आहे. त्यामूळे शेतकऱ्यांवर आर्थिक नूकसानीचा सामना करावा लागत आहे.

**- शेख कासीम,**
भाजीपाले विक्रेते

तीन ते चार महिन्यापूर्वी ज्या टोमॅटोने शेतकऱ्यांना लखपती बनवले. आता त्याच टोमॅटोने शेतकऱ्यांना आर्थिक अडचणीत टाकण्याचे काम केले आहे. शेतकरी सध्या कर्जबाजारी झाला आहे.